# रसराज

## १९९१ - ९२



नि
रो
प

स
मा
रं
भ



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष कला विद्यार्थी



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष कला विद्यार्थी



प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थी

# रसराज

वार्षिक अंक १२ वा

१९९१-९२

शिक्षण विकास मंडळ
देवगड

श्री. स. ह. केळकर
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय

◆ संपादक मंडळ

प्राचार्य डॉ. आर. जी. बागूल / अध्यक्ष
प्रा. वसंत कांबळे / कार्यकारी संपादक

◆ सहाय्यक संपादक

प्रा. सुरेश कांबळे
प्रा. महेंद्र कामत
प्रा. श्रीमती लता वळसंगकर
प्रा. नागेश दप्तरदार
प्रा. कु. उत्तरा नाईक
प्रा. दत्तात्रय पाटील

# अंतरंग

## मराठी


**पायरीवरचं स्वप्न** / मृणाल काळे / १
**मोडलेलं मोवाड आणि शासन यंत्रणा** / सुनील खडपे /५
**रुपयाचे अवमूल्यन** / मिनल घाटे / ८
**वैद्यकशास्त्रातील प्रगती** / समीर जाधव / ९
**शारजाह क्रिकेट स्पर्धा– एक दृष्टीक्षेप** / संजय खाडचे / १२
**रशियातील स्थित्यंतरे** / अजित पुरळकर / १४
**दुर्गाबाईंचे ललित लेखन** / माधवी लोंबर / १८
**सुटका** / पुष्पलता इळकर / २०
**संगीत सम्राट पंडित–कुमार गंधर्व** / प्रमोद कोयंडे / २३
**मिळेल का ती आजी !** / शैलेश राऊळ / २७
**सुधारकांचे अग्रदूत लोकहितवादी** / संजय कोळंबकर / २८
**मराठी संस्कृतीचा उपासक : शाहीर** / संगीता जाधव / ३०
**कॅन्सर** / वैजनाथ कदम / ३३
**भारतातील दहशतवाद** / ज्योती खाडये / ३५


## कविता


**कृपाळू** / कल्पना पळसुले / ३८, **अनाम पक्षी** / मृणाल काळे / ३८
**गुलाब पुष्प** / ज्योती घाडी / ३९, **मध्यान्ही नंतर** / हेमंत कुळकर्णी / ३९
**कैफियत** / स्वाती देवधर / ३९, **कधी पाहतो** / समीर जाधव / ४०
**पुन्हा तू यावास** / अजित पुरळकर / ४०, **दुर्भागी जीवन** / सुनीता जाधव/४१
**भरकटलेली कविता** / विद्यागौरी ओगले / ४१, **दुःख** / ज्योती घाडी / ४२
**पुण्य** / दिलीप मेस्त्री / ४२ **मनःस्ताप** / आनंद कदम / ४२,
**साग** / भाग्यवती राजम / ४३, **अंत माणुसकीचा** / पुष्पलता इळकर / ४३,
**तू अशीच यावीस** / आनंद कदम / ४३
**नवयुग** / मृणाल काळे / ४४, **व्यथा** / पुष्पलता इळकर / ४४
**सागर** / निळकंठ मराठे / ४५, **जीवन** / सुमन वरवडेकर / ४५
**मीलन** / मिलींद करंगुटकर / ४५ **लोकहितवादी स्मृतीशताब्दी संदेश**/४६

## English

**Love Song of J. Alfred Prufrock, Eliot's Controversial Imagery** / Milind Bhide / 1

**Vivekanand– A Man of Self Confidence** / Jeetendra Rane / 4

**Pollution– A Terrible Problem!** / Minakshi Kulkarni / 5

**Narmada Project** / Prasad Joshi / 9

**Isac Newton** / Manik Joshi / 12

**Karmaveer Bhaurao Patil– A man of Action** / Dileep Mestry / 13

## Poems

**Song of Love** / Ajita Khamkar / 16

**Relations** / Bhagyavati Rajam / 16

**How Beautiful Is The Night!** / Vikas Warik / 17

**When I See ......!** / Dileep Mestri / 17

**A Ghost tree** / Vaishali Joil / 17

**Money** / Vikas Warik / 18

**What Is It?** / Nilkanth Marathe / 18

# विद्यार्थी संपादकीय



मित्रांनो,

आजच्या या धकाधकीच्या विज्ञान युगात नीतीमूल्यांची सर्वत्र घसरण होत असताना शिक्षण ही एकच गोष्ट अशी आहे की जी मानवाला त्याच्या अधःपतनापासून वाचवू शकते. या शारदेच्या मंदिरातच त्याच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण होत असते व त्याची सुरुवात ही शाळेपासून होते. तेथूनच त्याच्या बुद्धीचा कस पारखला जातो. पण शालेय जीवनात विद्यार्थी हा बहुतांश पुस्तकी ज्ञानातच गुरफटलेला असतो.

त्याचं एकूण विश्वच सिमीत असतं. परन्तु कॉलेजची पायरी चढल्यावर तो जगाकडे डोळसपणे पाहू लागतो. तो केवळ चाकोरीबद्ध पुस्तकी ज्ञानातच गुरफटून न राहता जीवनज्ञान, समाजकारण, राजकारण यामध्येसुद्धा पुरता रस घेऊ लागतो. त्याच्यातील सुप्त गुणांना विकसित करण्याच्या अनेकविध संधी कॉलेजविश्वात असतात. त्याच्या अंगी जगाला समर्थपणे तोंड देण्याची हिंमत Self ability, Self Confidence निर्माण होऊ लागते आणि नवजीवनाच्या उंबरठ्यावर असताना आपल्या व्यक्तीत्वास एक प्रत्ययकारी आकार आणि स्थैर्य लाभण्यासाठी तो मनाशी आखाडे बांधू लागतो. थोड्याफार फरकानं सर्वांच्याच जीवनात काळाची ही सीमारेषा म्हणजे आयुष्यातील एक Turning Point ठरू शकतो.

साहित्याच्या दालनातसुद्धा इथे कित्येकांची लेखणी धारदार कसदार बनू लागते. वाङ्मयीन भाषेचं बाळकडू त्याना इथेच मिळत जातं व इथूनच उद्याचे लेखक, कवी निर्माण होऊ लागतात. अर्थात आमचं कॉलेज तरी ह्या गोष्टीला कसं बरं अपवाद ठरेल ?

आम्हा विद्यार्थ्यांमधूनच साहित्यदालनांत प्रवेश करु पाहणाऱ्या अभ्यासक विद्यार्थ्यांच्या कथा, कविता, ललितलेख आदि साहित्य प्रस्तुत वार्षिक रसराजमध्ये आम्ही समाविष्ट केलं आहे. साहित्यातील बहुरंगी प्रांतात डोकावून विद्यार्थ्यांनी आपल्या लेखणीची किमया आणि सामर्थ्य दाखवून दिल आहे. रसराजचा हा वार्षिक अंक आपण चाळल्यावर माझ्या आग्रही प्रतिपादनाची आपणास प्रचिती यावी.

आमच्या प्रामाणिक प्रयत्नांतून साकार झालेला हा वार्षिक साहित्याविष्कार आपणास खचितच भावेल. याबद्दल मला यत्किंचितही संदेह वाटत नाही. अर्थात आमचे लाडके प्राचार्य आणि प्राध्यापकवर्ग यांचे अमूल्य मार्गदर्शन आणि अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींचे सक्रीय सहकार्य लाभल्यामुळेच आम्ही हा अंक सकस साहित्यानं नटलेला, जास्तीतजास्त दर्जेदार आणि आकर्षक करु शकलो.

आम्हास उपकृत करणाऱ्या सर्वांचेच मनःपूर्वक आभार !

**विनय परब**

**प्रथम वर्ष वाणिज्य**

# संपादकीय

**मित्र हो!**

'रसराज' चा वार्षिक अंक आपल्या हाती देताना मला अत्यंत आनंद होत आहे. सन १९९१–९२ या शैक्षणिक वर्षात माझ्याकडे प्रथमच या अंकाच्या संपादनाची जबाबदारी सोपविली गेली. आणि वर्षभर भित्तीपत्रकाचे अनेक अंक प्रकाशित करुन त्यातीलच काही महत्वाच्या लेखांचे आणि वार्षिक अंकाच्या दृष्टीनेही इतर कांही लेखांचे संकलन करुन हा अंक आपल्यासमोर ठेवत आहोत.

आज सुशिक्षीत बेकारीच्या समस्येमुळे भारतातील तरुण वर्ग अतिशय त्रासलेला आहे. खेड्यातील सुशिक्षित मुंबई. कलकत्ता इत्यादीसारख्या मोठ्या शहरांकडे नोकरीसाठी धाव घेतो आहे. आणि शहरातील तरुण दुबई, इराण, इराक यासारख्या परदेशी नोकरीच्या शोधार्थ भटकतो आहे. प्रयत्न करुनही शेकडा नव्वदपेक्षा जास्त तरुणांना चांगली नोकरी मिळत नाही आणि शेवटी दुर्दैवाने तो गैरमार्गांचा बळी ठरतो. तर कित्येक सुशिक्षीत तरुण आज या बेकारीच्या स्थितीला कंटाळून व्यसनाधीनतेकडे वळलेले आढळतात.

ब्राऊन शूगर, कोकेन, चरस, मद्य इत्यादी व्यसनांच्या आहारी गेलेल्या लोकांची संख्या भारताच्या नव्वद कोटी जनतेपैकी सात कोटीहून जास्त आहे. ही खरोखरच अतिशय चिंतेची बाब आहे. यामध्येही तरुणवर्गाचे प्रमाण अधिक असल्याचे आढळते. याशिवाय शिक्षण घेत असलेल्या तरुणांमध्ये सुद्धा काही अंशी ही व्यसनाधीनता असल्याचे दिसते. विशेषत: शहरी विभागात हे चित्र स्पष्ट दिसेल. ब्ल्यू फिल्म पाहण्याच्या गुन्हेगारी प्रकरणाच्या ज्या केसीस न्यायालयात जातात त्यामध्येही तरुणांचेच प्रमाण जास्त, बलात्कारासारख्या गुन्हेगारी कृत्यातही तरुण वर्गच पुढे. अशा या भरकटलेल्या तरुण पिढीपुढे आज जुने आदर्श हास्याचे किंवा रहस्य कथांचे विषय ठरले आहेत. चित्रपटातील हिरो आणि खलनायक हे त्यांचे आदर्श बनले आहेत ही फारच खेदाची गोष्ट आहे. व्हीडीओच्या दुनियेनं, व्यसनाधिनतेनं, आणि गुन्हेगारी कृत्यांनी या तरुण पिढीला अजगरी विळखा घातला आहे. तरुण पिढीने वेळीच जागे होणे, आपला चुकीचा मार्ग सोडून योग्य मार्गावर येणे ही काळाची गरज ठरली आहे. वेळ अजूनही गेलेली नाही. भारतातील अंतर्गत प्रश्नांच्या आणि सार्वभौमत्वाच्या दृष्टीने विचार करता तरुण वर्गाने जागृत राहणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

सद्याच्या शिक्षणाने नेमके कोणते फायदे होतात? ही शिक्षण व्यवस्था काय साध्य करु पाहते? असे प्रश्न फक्त बेकारांच्या पुढेच निर्माण होतात असे नाही; तर आजभारतातील कित्येक विचारवंत सुद्धा 'आजची शिक्षण व्यवस्था दिशाहीन आहे का?' असा प्रश्न उपस्थित करुन त्याच्याविषयी चिंतन करीत असलेले आढळतात.

'विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास घडवून त्यात प्रगतीशील बदल करणे' हेच तर शिक्षणाचे मूलभुत अंग आहे. पण शिक्षण घेतल्याने आपण नेमके काय मिळवितो? आजच्या शिक्षणाला किंमतच राहिलेली नाही. अशी शिक्षणाबद्दलची नकारात्मक संकल्पना समाजमनावर ठसलेली आहे. कारण सद्याच्या परिस्थितीत शिक्षणाचा संबंध नोकरीशीच लावला जातो. पण शिक्षण घेऊन पात्रतेची नोकरी मिळत नाही. समाजात 'सुशिक्षित बेकार' असे कित्येक तरुणाना हिनवून घ्यावे लागते.

परंतु 'शिक्षण आणि नोकरी' असा सहसंबंध न लावता आपल्या वर्तनात कोणकोणते प्रगतशील बदल होत गेले आहेत याकडे जेंव्हा आपण अंतर्मुख होऊन पाहतो तेंव्हा आपल्यात घडलेले बदल हे शिक्षणाचेच प्रतीक आहे याची जाणीव होईल. इतरांच्या पेक्षा आपल्यात स्वत:बद्दलचा आत्मविश्वास निर्माण होतो. मनात आणू ते करुन दाखविण्याची जिद्द निर्माण होते. विचारात तर्क सुसंगतता येते. आपल्यातील सृजनशीलता जागृत होते. मानवतावादी विचारांनी आपण भारुन जातो. सत्याची बाजू नेहमीच उचलून धरण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या गहन सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करतो. हे सर्व कशाचे प्रतीक आहे?......शिक्षणाचे!

या विद्यार्थीदशेतच आपण आपल्यातील सुप्त गुणांचा विकास घडवून आणावयाचा आहे. आपल्या अंगी असलेली वक्तृत्वशैली, अभिनय, गायन, इत्यादी गुणांचा विकास घडविण्याचेही हे क्षेत्र आहे. इथेच आपणाला वेगवेगळ्या शास्त्रांचं ज्ञान मिळत. आपल्या देशाचा आणि संपूर्ण जगाचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास पहाता येतो आणि संतांच्या व विचारवंतांच्या वचनांचा ( विचारांचा ) आपल्यावर योग्य ठसा उमटतो. आपल्यासमोर आदर्श उभे केले जातात. या आदर्शांचीच जपणूक करण्याचा प्रयत्न आपण करावयाचा असतो. प्रयत्नाशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होत नाही हे तितकेच सत्य आहे. म्हणून काठावर बसून पोहणाऱ्यांना पाहून समाधान मानून चालणार नाही. जर या भवसागरात पोहायचे असेल तर प्रश्नांच्या पाण्यात प्रथम उडी मारावी लागेल आणि त्यावर मात करीत आपला ध्येयरुपी किनारा गाठावा लागेल. कोणत्याही क्षेत्रात पदार्पण करताना आपल्यातला 'मी' घाबरत असतो त्या 'मी' चा आत्मविश्वास जागा करणे शेवटी आपल्या प्रयत्नावरच अवलंबून असते हे विसरुन चालणार नाही.

आपल्या महाविद्यालयातील गुणी, होतकरू विद्यार्थ्यांनी आपले वेडेवाकडे बोल तुमच्या समोर मांडण्याचा 'प्रयत्न' केला आहे. कथा, कवितांच्या लेखनाबरोबरच क्रीडा, विज्ञान विषयक आणि इतर वैचारिक लेखातून आपले विचार त्यांनी मांडले आहेत. 'रसराज' हे या विचारांच्या प्रकटीकरणाचे एक व्यासपीठ आहे. या अंकात अंतर्भुत असलेले साहित्य आपणाला आवडेल व आपण आमच्या विद्यार्थ्यांना जरुर प्रोत्साहन द्याल अशी अपेक्षा आहे.

आपला स्नेहांकित

**प्रा. वसंत कांबळे**

# आभार

'रसराज' च्या कार्यसिद्धीनंतरचा हा गोड भाग, केवळ उपचार म्हणून नव्हे तर अंतरीचे उसळते कृतज्ञता भाव व्यक्त करण्यासाठीच.

विद्यार्थ्यांनी नेहमीप्रमाणेच आमच्या आवाहनाला प्रतिसाद देवून लेखन सहकार्य केलं, याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

यावर्षी आम्ही प्रथमच 'रसराज वार्षिक अंक मुखपृष्ठ स्पर्धा' आयोजित केली होती. या स्पर्धेलाही चांगलाच प्रतिसाद मिळाला. यातील प्रथम क्रमांक मिळविलेल्या मुखपृष्ठाची वार्षिक अंकासाठी निवड केली आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. रविंद्र ठाकूर (प्रथम वर्ष विज्ञान) याने तयार केलेले हे मुखपृष्ठ वाचकांना आवडेल यात शंका नाही. तसेच 'रसराज' च्या प्रकाशित होणाऱ्या भित्तीपत्रकाच्या मुखपृष्ठाचे काम श्री. सुनिल खडपे (प्रथम वर्ष वाणिज्य) व चंद्रशेखर कल्याणकर (बारावी कला) या विद्यार्थ्यांनी पाहिले. या विद्यार्थ्यांस हार्दिक धन्यवाद!

प्राचार्यांचे मार्गदर्शन, संपादक मंडळातील सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी प्रतिनिधी आणि इतर सहकारी प्राध्यापक या सर्वांचे रसराजला वेळोवेळी सहकार्य लाभले आहे.

या अंकाला अमेय प्रिंटिंग प्रेस, जामसंडे यांचे रेखीव मुद्रण मिळाले आहे.

मुखपृष्ठ व फोटोंच्या संदर्भात आनंद ऑफसेट प्रिंटर्स, कोल्हापूर यांचे सहकार्य लाभले आहे.

महाविद्यालयाच्या कर्मचारी वर्गानेदेखील वेळोवेळी सहाय्य करुन अंक यशस्वीरित्या प्रकाशित करण्यात सहकार्य केले आहे.

या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

**प्रा. वसंत कांबळे**

## आमचे स्फुर्तीस्थान



**माननीय श्री. शां. कृ.**
**तथा बापूसाहेब पंत वालावलकर**
अध्यक्ष, शिक्षण विकास मंडळ, देवगड

## आमचे प्राचार्य



**डॉ. आर. जी. बागूल**

# अभिमान

## तृतीय वर्ष कला व वाणिज्य प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


संगीता बर्वे


अरविंद दळवी


सुरेखा जोशी


शैलेंद्र कदम


देवदत्त कोयंडे


वैजयंती मराठे


प्रवीण सनये


शरचंद्र डगरे


दामोदर जोशी


शोभा जोशी


बाळकृष्ण मुणगेकर


भरत पराडकर


प्रदीप पारकर


संदीप फडके


विमल बापट


मुक्ताबाई कोचरेकर

# अभिमान

## तृतीय वर्ष कला व वाणिज्य प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


गुरुनाथ सागवेकर


पद्मा तेली


प्रकाश रानडे


संगीता राणे

## बारावी - परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


अर्चना देवधर


श्रीकृष्ण दुधवडकर


वैभवी दुखंडे


रवींद्रनाथ गुरव


सरीता जाधव


विलास कदम


विश्राम कदम


मृणाल काळे


सिताराम कणेरकर


शहिदा खान


मेधा पारकर


सुप्रिया फाटक

# अभिमान

## बारावी परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



किशोर पोयरेकर



दत्तप्रसाद रानडे



उज्वला तारी



रमाकांत वाडेकर



विजया धुरी



संतोष कणेरकर



नितीन महाडीक



शशिकांत परब



विनय परब



नेत्रा पराडकर



संजय वेलणकर



रेवती झरकर



भारती भनसारी



डिम्पल भानुशाली



चंद्रशेखर घाडी



मंगेश घाडी

# अभिमान

## बारावी परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


गीता गोखले


समीर जाधव


जगदीश जामसांडेकर


नंदकुमार कातळकर


सरला कुबल


प्रतिभा पेटकर


मनोज सहस्त्रबुद्धे


प्रमोद शेठ


प्रविण तारकर


रविंद्र ठाकूर


महेश तोरस्कर


राजश्री वेलणकर

## ● विशेष ●

शिवाजी विद्यापीठाची
एम. पी. एड्.
परिक्षा उत्तीर्ण


प्रा. बी. एम. माळी

आदर्श विद्यार्थी
पुरस्कार प्राप्त


वर्षा विड्ये

राज्यस्तरीय
भालाफेक स्पर्धा
४ था क्रमांक


शिवराम बापर्डेकर

विद्यापीठ
स्पर्धेसाठी निवड


गीता मेस्त्री

# नेतृत्व.... - वरिष्ठ विभाग



**सुरेंद्र मणचेकर**
जनरल सेक्रेटरी



**पद्मा जोशी**
विद्यार्थिनी प्रतिनिधी



**भाऊराव जुवाटकर**
विद्यापीठ प्रतिनिधी

## - वर्गप्रतिनिधी मंडळ -



**सुरेंद्र मणचेकर**
तृतीय वर्ष कला



**भाऊराव जुवाटकर**
तृतीय वर्ष वाणिज्य



**सत्यवान पाटणकर**
द्वितीय वर्ष कला



**प्रकाश केसव**
द्वितीय वर्ष वाणिज्य



**सदानंद रहाटे**
द्वितीय वर्ष विज्ञान



**विजय नेसवणकर**
प्रथम वर्ष कला



**विनय परब**
प्रथम वर्ष वाणिज्य



**प्रमोद वालकर**
प्रथम वर्ष विज्ञान

## जनरल चँपियनशिप - (वरिष्ठ विभाग)



**विठोबा गोलतकर**



**गीता मेस्त्री**

विभागून



**सुजाता पाटणकर**

# नेतृत्व....

## कनिष्ठ विभाग



**प्रविण सावंत**
जनरल सेक्रेटरी



**अंजली मोंडकर**
विद्यार्थिनी प्रतिनिधी

## - वर्गप्रतिनिधी मंडळ -



**अभय पवार**
बारावी कला (अ)



**प्रविण सावंत**
बारावी कला (ब)



**नंदकिशोर जाधव**
बारावी वाणिज्य



**प्रफुल्ल राणे**
बारावी विज्ञान



**विश्वास दहिबांवकर**
अकरावी कला (अ)



**शिवराम बापर्डेकर**
अकरावी कला (ब)



**प्रविण मेस्त्री**
अकरावी वाणिज्य



**प्रविण सावंत**

## जनरल चँपियनशिप
## ( कनिष्ठ विभाग )



**अंजली मोंडकर**

# निरोप.....



**प्राचार्य आर. ए. कुलकर्णी यांना हृद्य निरोप**

*"देवगडात आज महाविद्यालयाचा जो पसारा वाढला आहे त्याचे सर्व श्रेय प्राध्यापक, विद्यार्थी व संस्थाचालक आणि नागरिक यांनाच आहे. मी फक्त साधन आहे. ही ज्ञानाची गोपूरे उभी करण्यात मी फक्त दिशा दर्शविली. प्राचार्य म्हणून काम करीत असताना प्रसंगी सामदंडाचा वापर केला. पण दाम व भेद नीती कधीच अवलंबीली नाही. उलट सर्वांशी स्नेहाचे नाते जोडण्याचाच मी प्रयत्न केला.*

*यापुढे तुमच्या सहवासाशिवाय माझं जीवन सुनं सुनं होणार आहे. तुम्हा सर्वांचे श्रम मी कधीच विसरणार नाही. प्राचार्य पदाची खुर्ची सोडली तरी यापुढेही अध्यापन व विद्यार्थ्यांसाठी काहीतरी लिहिण्याचे प्रयत्न करीन."*

**प्राचार्य – आर. ए. कुलकर्णी**

# स्वागत.....



नवनिर्वाचित प्राचार्य डॉ. आर. जी. बागूल यांचे स्वागत
व राष्ट्रीय एकता दिवस संयुक्त समारंभ

*"संत रामदासांनी ज्यांना काही जीवनात साध्य करायचं, त्यांनी फिरलं पाहिजे हा संदेश दिला होता. त्याप्रमाणे महाविद्यालयीन शिक्षणापासून ते प्राध्यापक म्हणून नोकरी करत असतानाही मी अनेक ठिकाणी फिरलो. माझं शिक्षणच खेड्यात झाल्याने ग्रामीण भागाविषयी मला ओढ आहे. विशेषत: कोकणाविषयीच्या आकर्षणातून व शैक्षणिक निकालांची उच्च परंपरा असलेल्या देवगडसारख्या कॉलेजमध्ये नोकरी करण्याची संधी मिळणार असल्यानेच मी शहरी नोकरी सोडून केळकर महाविद्यालयात आलो आहे. केळकर महाविद्यालय हे देवगडचे भूषण ठरावे यासाठी संस्थाचालक, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या सहकार्याने मी सर्वतोपरी प्रयत्न करीन."*

**प्राचार्य - डॉ. आर. जी. बागूल**

# अभिवृध्दी... - विज्ञान शाखा इमारत – उद्‌घाटन सोहळा



उद्‌घाटन

प्रमुख अतिथी
मा. श्री. भाऊसाहेब केळकर
बोलत असताना





शिक्षण विकास मंडळ, देवगड संस्थेचे अध्यक्ष मा. शां. कृ. तथा बापूसाहेब पंत वालावलकर बोलत असताना

शिक्षण प्रसारक मंडळ देवगड,
नियमक समितीचे अध्यक्ष
मा. आम. श्री. अमृतराव तथा दादा राणे
बोलत असताना



आणि तल्लीन श्रोतृवृंद



श्री. स. ह. केळकर महाविद्यालयाची ही टोलेजंग इमारत



आमच्या विज्ञान विभागाची वास्तू

# प्रौढ साक्षरता, प्रदर्शन व स्पर्धा



साक्षरता दिंडी



विज्ञान प्रदर्शन



भरतकाम, विणकाम स्पर्धा व प्रदर्शन



रांगोळी स्पर्धा व प्रदर्शन

# विविध उपक्रम....



एन्. एस्. एस. समिती



स्नेहसंमेलन समिती



फनी गेम्स्



रोज डे व प्रशस्ती पत्र

# स्ने ह सं मे ल न



एकांकिका - सारं कसं शांत शांत...



कोळी नृत्य



गीत गायन

# स्नेह संमेलन....

उत्कृष्ट गायक

उत्कृष्ट गायिका विभागून



दत्तप्रसाद रानडे



संध्या पांचाळ



मंजिरी लळीत

उत्कृष्ट अभिनय



विनीता खाडीलकर

उत्कृष्ट फॅन्सी ड्रेस



राज कांदळगांवकर

उत्कृष्ट नृत्य



कॉकटेल नृत्य

# बक्षीस वितरण




न्यायाधीश श्री. सुहास बर्वे बोलत असताना



पारितोषिक वितरण




आभार - सौ. बर्वे यांना श्रीफळ देताना प्राचार्य

# शोधक वृत्तीच्या परिपूर्तीसाठी



तृतीय वर्ष वाणिज्य
गोमंतकाच्या सुवर्ण भूमीत



प्रथम वर्ष विज्ञान
आंबोली शैक्षणिक सहल



प्रथम वर्ष विज्ञान
आंबोली शैक्षणिक सहल



द्वितीय वर्ष विज्ञान
कॅसल रॉक (कर्नाटक)
शैक्षणिक सहल

# सहवेदना

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी, माजी केंद्रीय कायदा मंत्री श्री. दिनेश गोस्वामी, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, अच्युत मेनन, प्रसिद्ध संगीतकार अरुण पौडवाल, प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडीत कुमार गंधर्व, अभिनेत्री दुर्गा खोटे, विनोदी अभिनेते आगा, समीक्षक व सौंदर्यशास्त्री श्री. द. ग. गोडसे, वा. ल. कुलकर्णी, लेखक उद्धव ज. शेळके, शरच्चंद्र चिरमुले, रणजीत देसाई, हिन्दी साहित्यीक डॉ. प्रभाकर माचवे, व श्री. शरद जोशी, कवी श्री. वा. रा. कांत, विनोदी लेखक श्याम फडके, लोककवी मनमोहन नातू, पत्रकार श्री. रामनाथ दुबे, एक्सप्रेसचे श्री. रामनाथ गोएंका तसेच ज्यांच्या नावाचे आमच्या महाविद्यालयास नामानिधान केले आहे त्या कै. सदाशिव हरी केळकरांच्या पत्नी श्रीमती उमाबाई सदाशिव केळकर, देवगडमधील प्रतिष्ठीत नागरीक श्री. शंकर रानडे, वकील, आमच्या संस्थेचे सदस्य आमदार श्री. आप्पासाहेब गोगटे यांचे जेष्ठ बंधू श्री. पांडूतात्या गोगटे, तसेच काळाच्या क्रूर पडद्याआड गेलेल्या इतर सर्व ज्ञात अज्ञात व्यक्तींना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

● ● ●

# स्नेह संमेलन....

उत्कृष्ट गायक

उत्कृष्ट गायिका विभागून



दत्तप्रसाद रानडे



संध्या पांचाळ



मंजिरी लळीत

उत्कृष्ट अभिनय



विनीता खाडीलकर

उत्कृष्ट फॅन्सी ड्रेस



राज कांदळगांवकर

उत्कृष्ट नृत्य



कॉकटेल नृत्य

# ब
# क्षी
# स

# वि
# त
# र
# ण




न्यायाधीश श्री. सुहास बर्वे बोलत असताना



पारितोषिक वितरण




आभार - सौ. बर्वे यांना श्रीफळ देताना प्राचार्य

# शोधक वृत्तीच्या परिपूर्तीसाठी



तृतीय वर्ष वाणिज्य
गोमंतकाच्या सुवर्ण भूमीत



प्रथम वर्ष विज्ञान
आंबोली शैक्षणिक सहल



प्रथम वर्ष विज्ञान
आंबोली शैक्षणिक सहल



द्वितीय वर्ष विज्ञान
कॅसल रॉक (कर्नाटक)
शैक्षणिक सहल

# सहवेदना

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी, माजी केंद्रीय कायदा मंत्री श्री. दिनेश गोस्वामी, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, अच्युत मेनन, प्रसिद्ध संगीतकार अरुण पौडवाल, प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडीत कुमार गंधर्व, अभिनेत्री दुर्गा खोटे, विनोदी अभिनेते आगा, समीक्षक व सौंदर्यशास्त्री श्री. द. ग. गोडसे, वा. ल. कुलकर्णी, लेखक उद्धव ज. शेळके, शरच्चंद्र चिरमुले, रणजीत देसाई, हिन्दी साहित्यीक डॉ. प्रभाकर माचवे, व श्री. शरद जोशी, कवी श्री. वा. रा. कांत, विनोदी लेखक श्याम फडके, लोककवी मनमोहन नातू, पत्रकार श्री. रामनाथ दुबे, एक्सप्रेसचे श्री. रामनाथ गोएंका तसेच ज्यांच्या नावाचे आमच्या महाविद्यालयास नामानिधान केले आहे त्या कै. सदाशिव हरी केळकरांच्या पत्नी श्रीमती उमाबाई सदाशिव केळकर, देवगडमधील प्रतिष्ठीत नागरीक श्री. शंकर रानडे, वकील, आमच्या संस्थेचे सदस्य आमदार श्री. आप्पासाहेब गोगटे यांचे जेष्ठ बंधू श्री. पांडूतात्या गोगटे, तसेच काळाच्या क्रूर पडद्याआड गेलेल्या इतर सर्व ज्ञात अज्ञात व्यक्तींना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

● ● ●

# ॥ मराठी विभाग ॥

परी प्रौढी न बोलों हो जी । तुम्हा सर्वज्ञांच्या समाजीं ।
देयावें अवधान हे माझी । विनवणी सलगीची ।।

ज्ञानेश्वरी, अध्याय ९–२

# पायरीवरचं स्वप्न

**मृणाल काळे**
प्रथम वर्ष कला

मेघना बागेत दौडत होती. स्वतःशीच काही बातचीत करीत होती. ती आता लहान आहे का ? चांगलं यंदा लग्न केलयं माझ्याशी ! पण असा निसर्ग पाहिला की लगेच अगदी भान विसरुन जाते.

किती प्रसन्न वातावरण ! तिची ही गोंडस उषा वातावरणाच्या कानाकोपऱ्यात दडून राहिली आहे. जणू काही अवनीनं रात्रीच्या अंधाराच्या औदासिन्याची कात टाकून पुन्हा नवयुवतीचं रुप पांघरुण मुग्धतेत हरवली आहे नुसती नव्या नवरीसारखी ! फुलांच्या सुगंधाचा आस्वाद लुटण्यासाठी हा वारा खटयाळपणे, हळुवारपणे फुलांशी क्रीडा करीत आहे. मधेच कुठूनतरी भिरभिरत एक फूलपाखरू टपकलं. वा! वा! रंगीबेरंगी इंद्रधनुष्य लवून ढगांचा निरोप फुलांना देण्यासाठी आलेला दिसतोय चालक !' त्याला पाहून 'इकडून तिकडे, तिकडून इकडे ही फुलपाखरे नाचती गडे,' झालं! या बाई त्यावर कवन रचून सुद्धा मोकळया ! गोड गुलाबी रंग लेवून त्या सौंदर्याच्या बागेत अनेक गुलाब पुष्पे मोहक गंध सोडत होती. त्या निसर्गातील छोटी बालिका बनून फुलपाखरांच्या तालात सूर धरु लागली होती. तिची तंद्री भंग झाली. जेव्हा मी हाक मारली, तेव्हा कुठे बाईसाहेब भानावर आल्या ! 'अगं मेघना आटप आता लवकर. आईकडे गावाला जायचय ना ! नाहीतर या कूजनात दंग होऊन मला विसरशील आणि स्वतःलाही ! मगतर तुझ्यापुढे माझा कोणताच इलाज चालणार नाही. म्हणून वेळेवरच जागी केली.'

'तुमच आपलं काहीतरीच ! सगळी तयारी झाली आहे म्हणून सहज बाहेर आले ! '

आम्ही तयारी करुन सकाळच्या प्रहरी आईकडे जाण्यासाठी उत्सुकतेने निघालो. तब्बल दहा वर्षांनी गावाला जाणार होतो. स्टँडवर बस सुटण्याच्या तयारीतच होती, बसबरोबर माझी विचारचक्रं सुरू झाली...

तेथे माझ्या बालपणाच्या आठवणी अगदी कानाकोपऱ्यात रुजल्या होत्या. ज्यावेळी सावत्र आईने घरातून बाहेर लोटलं होतं, तेव्हापासून आजतागायत आईलाच बरं वाटावं म्हणून मी गावात पाऊलही ठेवलं नव्हतं. सावत्र आई माझा द्वेष करते, तरी पण तिला माया ही असणारच ना ! मला ती काहीही बोलली तरी ते मला फार आवडेल. ती काय बोलली यापेक्षा बोलली हे मला महत्त्वाचं आहे. कारण मला बोलणारं, दोष लावणारं असं आहे तरी कोण ! आईसाठी घराबाहेर पडलो त्याक्षणीच मला घर मुकल्यासारखे झाले. परंतु आता जीव तिच्यावरच्या मायेमुळं ओढ घेतोय. मनात विचार येत होता, जर ती आपल्याकडे आली तर मी धन्य होईन. किशोर कसा वागतो तिच्याशी ? आईचा सख्खा मुलगा. मला भेटतो तो अनेकदा ! आईबद्दल विचारलं तर म्हणतो, 'तू अजून नाही बदललास. अरे आईने तुझे एवढे छळ केले, मला स्वतःचा मुलगा म्हणून कोड-कौतूक केले, आपणा दोघांना बोलण्यालाही बंदी केली. तरी आप्पांनी तुझं शिक्षण पुरं करुन स्वर्गवासी झाले ते उत्तमच झालं. नाहीतर आई फारच द्वेष करू लागली असती तुझ्याबद्दल ! मला तिच्याबद्दल काही वाटत नाही. जी सर्वांवर आईसारखी माया दाखवू शकत नाही ती आई कसली ? '

किशोर खरा गुणी मुलगा, पण आईविषयी मात्र चीड. कारण संपत्तीसाठी तिनेच त्याचीमाझी ताटातूट केली. किशोरने स्वतःच्या खाऊत, जेवणात, प्रेमात मला हिस्सेदार बनविला होता. आईला किशोरची ओढ

असेल पण तो तिला जवळ करील की नाही. ?
आज दहा वर्षांनी जातोय गावात, काय वातावरण
असेल तिथलं ? गाडीत याच विचारांच्या गोंधळाने
उभ्या मनावर पगडा बसविला होता माझी पत्नी
नेहमी आपल्याच तंद्रीत असायची.

'ओ चाय, चाय पाहिजे का चाय ऽऽऽ'
'सरबत घ्या सरबत – ओ साब–' ह्यांचा गलका
खिडकीपाशी आला तेव्हा त्या विचारांच्या कोळीष्टकी
जाळ्यातून माझी मान निघाली.
असेच रमतगमत प्रवास करीत माझी पत्नी व मी
घरच्या वाटेला लागलो.

आमचं गांव तसं निसर्ग सौंदर्याने नटलेलं. हिरवी
सृष्टी गावात सुखदपणे नांदत होती. गावात आता
खूपच बदल झाला होता. शानदार चौसोपी घरे
डौलात उभी होती. रस्ते सुधारले होते. येता-येताच
आमच्या गावाला कवेत घेऊन दुडूदुडू व अवखळपणे
सळसळणारी वेणू नदीही दिसली. मेघनाच्या
साहित्यिक निसर्गवेड्या मनाला हा परिसर
सुखवणारा होता. नदीला पाहिल्यावर तिच्या
काठाकाठावर बागडणाऱ्या माझ्या बालपणीच्या
आठवणी उफाळून आल्या. वाटलं असंच धावत जावं
नि नदीच्या फेसाळ पात्रात मनसोक्त डुंबावं,
किनाऱ्यावरच्या वाळूत लोळावं. चिमुकले मासे
हाताच्या ओंजळीत पकडावे. ओल्या वाळूत झरे
काढावेत. पण आता तर प्रौढपणाची लक्षणं
अंगा खांद्यावर ठेऊन त्याचंच ओझं झालं होत. गावाला
हिरवी शाल घालणाऱ्या नदीच्या पात्रात आत्ताही
अनेकजण अवखळपणे डुंबत होते. कोणी खेळत होते,
पाट काढीत होते. काही बायका बडबडत, गाणी
म्हणत कपडे धुणी करत होत्या. शेताच्या बांधातून
पाणी खळाळत होते. सुधारलेल्या गावात शहरी
औदासिन्य दिसत नव्हतं.

वाट ओलांडून नाविण्याने घरच्या अंगणात उतरलो.
बघितलं. लहानपणी बहरणारी फूलझाडं मेल्यागत
पडली होती. सिताफळीची पानं झडून गेली होती.
आनंदाच्या अतिरेकात गांव नहात होतं, तर इथे चार
वर्ष पाऊस नाही अशी दुष्काळी स्थिती होती. किशोर
बाहेर जाण्याच्या तयारीत होता. बाहेर त्याची
प्रत्युत्तरं ऐकू येत होती.

'आई हे बघ, कोणाचं चांगलं केलस तू आजवर ?
त्या मनोहरला छळलास, आप्पांना जाच केलास !
मनोहरशी माझ्या जीवाभावाच्या त्या रक्ताचं
नातं तोडू पाहिलस ! का ? त्या पैशासाठी ?
फक्त पैशासाठी ? काय मिळालं तुला ? अगदी
कैकर्याची मूर्त प्रतिमा आहेस. त्याला आपलंस करशील
त्या क्षणी तुझी जी सर्व पूर्व पापं असतील ती फेडली
जातील. मला तुला सूख द्यायचं होतं ना ! मग तू
आपलासा मानीत नाहीस ! तोपर्यंत मी नाही
असं समज.

'मनोहरचं नांव काढू नकोस. अरे माझ्याच्यानं काही
होत नाही आता ! तुझ्याशिवाय काही जगता येणार
नाही. त्यांना वाईट वागवलं ते तुझ्यासाठीच बाळा.
तुझ्यासाठीच सारे कष्ट काढले आणि असं अभद्र
बोलतोस ? नको रे जाऊ राजा ! आता या शेवटच्या
क्षणीतरी तुझ्यासाठी जीव नुसता तडफडतोय !
कुणाची तरी दृष्ट पडली माझ्या राजावर ! '

इतक्यात किशोर बाहेर आला आणि मला पहाताच
आश्चर्याने जवळजवळ ओरडलाच !

'अरे मनोहरदादा ! वहिनी ! ' पुढे येऊन मला
त्याने कडकडून मिठी मारली. आमचे कंठ सद्‌गदित
झाले. तो म्हणाला, 'मी येईन रे दादा ! आईला
अद्दल घडविण्यासाठीच मी बाहेर जातोय. मला नक्की
खात्री आहे, तू आईला जिंकशील. तुझ्यासारखे जीवन
मीही जगतो थोडे दिवस.'

'अरे पण...' आम्ही सांगण्या अगोदरच तो
वाऱ्यासारखा गेला सुद्धा. '

आम्ही घरात अनुभवी पाऊल ठेवलं तर गांव बदललं
होतं पण घर बदललं नव्हतं. ओटी, त्याखाली तो
झुलता झोपाळा, क्षणाक्षणाला कर्र कर्र आवाज करुन
बाणेदार मालकाची चाहूल देणारा ! मोकळ्या
लाकडी गजांच्या लांब-रुंद खिडक्या, समोरच्या लाल

भितींना प्रकाशमय करुन टाकणाऱ्या ! बाबांचा हार घातलेला प्रसन्न चेहरा, देवादिकांचे सुगंधात दरवळणारे फोटो. माजघराच्या एका कोपऱ्यात जुना पलंग, बहुतेक ती आईचीच शय्या असावी. इतक्यात साक्षात समोर आई.

' मातृ देव भव: ' समजून दोघेही खाली वाकलो. म्हटलं, ' आई रडू नकोस. तो येणार आहे परत. तुला कसा टाकील तो ! ' व लांबूनच नमस्कार केला. कारण पदस्पर्श होईपर्यंत ताड्कन फिरुन ती निघून गेली. तिच्या कपाळावरच्या शिरा रागाने तट्तट् करीत होत्या. इतक्यात ती कडाडली, ' अरे मनोहरा माझ्या किशोरला माझ्याबद्दल फितवून तू वाईट केलास. माझ्या जन्माचा दावेदार बनून मला छळायला आलास. आमच्या कष्टाने नोकरी लागली म्हणून बायकोबरोबर उड्या मारतोस शहरात. आज दहा वर्षांनी आमची आठवण झाली ? नाही आला असतास तर चाललं असतं. तुला काय वाटलं, म्हातारी थकली असेल म्हणून इस्टेट मिळते का पाहाण्यासाठी आलास ! पण ही म्हातारी तशी हटणार नाही. दमडी सुद्धा मिळायची नाही...... चालता हो ऽऽऽऽ आल्या पावली ! '

एवढं बोलताना लगेच तिला धाप लागली. खोकल्याच्या चळीनं लगेच ती घायाळ झाली. मी काही करण्याचा प्रयत्न केला, पण मला ती काहीच करु देईना. वातावरण एकदम बदललं. आम्हाला पाणी तर सोडाच, साध बसा, असं सुद्धा माझ्या घरानं म्हटलं नाही. आई किशोरच्या आठवणीनं तडफडत होती, बरळत होती.

' बाळा तू काय केलस हे ! मला टाकून गेलास ! मला तुझा दुरावा साहवत नाही. माझ्या सुखाच्या आड येणाऱ्या मन्या चालता हो ! आता काही गरज नाही ..... मेली आई तुझी ! '

त्या लाल भितींना गंज चढला होता. त्यांनाही करुणेचा कैफ आल्याप्रमाणे भासत होता. आईची ती विफल स्थिती पाहून मला फार वाईट वाटलं. मेघनाला हे नवीन असल्याने ती गप्प होती. बिचारीच्या कर्कश वादळाचं काहूर तिच्या नसानसात भिनल्यासारखं वाटत होतं. गंभीर मुखवटा पांघरुन एकटक ती आईच्या पुत्र वियोगीत चेहऱ्याकडे पहात जणू तिच्या साहित्यातील एका मातेची मूर्ती साकारीत होती, मनात चितारत होती. मी स्वत:ला सावरुन आईचं सांत्वन केलं. 'आई तू शांत हो जरा विश्रांती घे. मन:स्ताप करुन घेऊ नको कारण मला संपत्ती नको आहे. आई फक्त तू हवी आहेस, मला तुझी काळजी आहे. या आजारात इथं एकटी नकोसं राहू. आमच्याकडे राहायला चल तू. आम्ही व्यवस्थित सारं काही करू तुझं. किशोरची तुझी भेट घडवून आणू.'

'आहे माझा मुलगा: व्यवस्थित विल्हेवाट लावील माझी. मी नाही दुसऱ्याकडे भीक मागत इस्टेटीसाठी, डबोल्यासाठी सगळी गोड बोलून येतात. माझ्या मुलाला तू फसवणार आहेस. तुझं ते शहर घाल खड्ड्यात. . . . . '

एवढ्यात खोकला असह्य होऊन ती बेशुद्ध पडली. लगेच मी धावत जाऊन शेजारच्या उमाताईंकडून कांदा आणून तिला शुद्धीवर आणले. अंगात ताप भरला होता. अंग ठणकत असल्याने तो काष्ठ झालेला देह हुंकार काढीत होता. आईची अस्पष्ट बडबडही थांबली होती. मी मिठाची घडी तिच्या डोक्यावर ठेवली.

सगळी तयारी उमाताईनीच केली. दहा वर्षापूर्वीची ती उमाताई . . . . . आता हळूहळू केस पिकू लागले होते. पण चेहऱ्यावरचा तजेला कांही ओसरला नव्हता. मला पाहाताच तिला खूप आनंद झाला. हींच आई मला लहानपणी खाऊ देत असे. माया देत असे. तिला उमाळा आला होता. आम्हा दोघांना तिने अक्षरश: पोटाशी धरले.

तोपर्यंत मी आल्याचं समजताच माझी सारी मित्रमंडळी घरी जमा झाली होती. आनंदानं बेहोष होत आम्ही एकमेकांना कडकडून भेटलो. मधलं दहा वर्षाचं अंतर केव्हाच विसरुन गेलो. त्यांच्या मदतीनचं डॉक्टर आणला. मानसिक ताण हेच कारण ठरलं होतं. माझ्या घरी मला पाणीही मिळणार नाही ही खात्री असलेल्या माझ्या मित्रांनी थर्मासमधून

चहा आणला होता, आणि जेवणाचीही व्यवस्था केली.

डोंगरातली प्रेमळ आक्का, जांभळ, करवंद, बोरं प्रेमानं देणारी, लगेच धावत आली. आणि समोर दत्त म्हणून उभी राहिली. दोन्ही हात कमरेवर ठेवून रोखून पहात म्हणाली, ' पोरा, केवढा रे वाढलास ताडामाडासारखा, अं ! आता या लक्ष्मीला नीट सांभाळ, नाहीतर याद राख ! ' असं म्हणून मेघनाला जवळ घेतलं.

' अरे किशोर नाही भेटला ना तुला. तो तर डोकेफिरु, तुझ्यावर खूपच जीव लावतो लेकाचा. मायेनं आलास हाच मोठेपणा. बाबा येते हो मी. काय लागलं सवरलं तर मागायला संकोच नकोस करू. बरं ! येते सूनबाई. सर्वांवर सारखी माया करते तीच खरी आई हो ना ? ' असं काही बरळत ती आक्का निघून गेली.

यावेळी हे वाक्य आईच्या मनाला एक वेगळीच संवेदना देवून गेलं. तिच्या मनातला ओलावा डोळ्यातून पाझरु लागला. मायेच्या वाक्यांना पोरक्या असलेल्या या घराचा कानाकोपरा चेरी फुलल्याप्रमाणे आनंदानं बहरून गेला. मित्र बोलत होते.

' अरे, आता किशोर असता तर मजा आली असती ना रे ! ' संतोष बोलला.

मी आईला उत्तेजन देऊन बोललो, ' तो नक्की परत येईल. पण तुमचे उपकार कसे मानू, तुमच्या भेटीचा, आईच्या भेटीचा हा अविष्कार प्राणाहूनही श्रेष्ठ आहे, मोलाचा आहे. '

इकडे मातृसेवा चालली होती. तीही आता थकली होती. मित्रमंडळी पलंगाला घेर धरुन बसली होती.

' मी आधी आईला जेवण देणार आणि उरेल ते आम्ही दोघं खाणार. हो की नाही रे. '

'बरोबर. आम्ही आज सर्वांनी डबे आणले आहेत. वहिनीला त्रास नको म्हणून.' तोपर्यंत मेघना माझ्या सर्व दोस्तांशी गप्पा मारण्यात रंगली होती. आई यावेळी काहीही न बोलता आमचे भाव आपल्या भावविश्वात साठवून ठेवत होती. माझ्यावरचं मित्रप्रेम पाहून तिलाही उचंबळून आलं होतं.

मी सर्वांना खाऊ वाटला. माझ्या आईनेही घेतला. माझ्या खादाड मित्रांनी केव्हाच सगळा फस्त केला. तेवढ्यात आमच्या सगळ्या वहिन्या डबे घेऊन आल्या. मी मस्करीत म्हटले, ' अहो वहिनीबाई, आमच्या खादाड मित्रमंडळीला पोटभर देत नाही काय ? बिचारे अगदी भूकेले होते. '

' असू दे हो, त्यांनी खाल्लं की आम्हाला मिळतं. ' ' विचारसरणी आध्यात्मिक आहे नाही ! ' मग खळखळून हशा पिकला. घराच्या भिंतीही मला जरा हसल्यासारख्या वाटल्या. त्या हास्यकल्लोळातच भोजन आटोपले. प्रथम मी माझ्या हाताने आईला भरविले. तिने माझा हात आपल्या हाती घेतला. या मूक प्रतिसादाने दुप्पट जोम माझ्या अंगी संचारला.

यानंतर सकाळ, संध्याकाळ नियमितपणे मित्र जेवण घेऊन येत. त्यांचा आग्रह म्हणजे विचारू नका. अगदी दक्षतेने वहिनीला त्रास द्यायला न लावता स्वतःच तसदी घेत.

'वहिनी, आज माझा चहा हं ! स्पेशल. साखर मी टाकली व पूड हिने.'

असेच पाच सहा दिवस गेले. आमची मातृसेवाही जोरात चालू होती. त्यात आम्ही कुठेही खंड पडू दिला नाही.

पण माझं मन नक्की सांगत होतं की, आई नक्की बदलतेय. आता हळूहळू तिची तब्बेत सुधारत आहे. एक दिवस आम्ही मित्रमंडळी समवेत जेवण घेत होतो, तितक्यात किशोर धावतच आला आणि मला आनंदानं मिठी मारून म्हणाला,'मला नोकरी लागली बरं. याचं सगळं श्रेय तुला आहे. तुझ्या मनीऑर्डरमुळे मी एवढं उच्च शिक्षण घेतलं. त्यातूनच आईचं औषधपाणीही व्यवस्थित चाललं. आई, एवढंच नव्हे तर कॉलेजच्या प्रत्येक वर्षाच्या फिचे पैसेही त्यानंच भरले. हे मला आज समजतय तरी म्हणत होतो, स्वतः कर्ज काढून पैसे भरणारा कोण हा अनामिक.

बघ आई दादा स्वार्थी नाही तुझ्यासारखा! दानशूर आहे. मला आता बिलकूल तोटा नाही पैशाला. अरे ५०००/- रु. पगार आहे कंपनीत मॅनेजर म्हणून जॉईन झालोय. या चारपाच महिन्यात एका अनामिक दानशूराचं कर्ज मी फेडणार आहे आणि खोलीही परत मिळवून देणार आहे.

आता आईचे डोळे खाडकन् उघडले. ती म्हणाली, 'अरे मनोहरा का सारं हे लपवून ठेवलस माझ्यापासून. माझंच चुकलं सारं. आता हा किशोर तसाच तूही मला आणि ही सूनबाई' आईनं आमची डोकी कुरवाळली. आपल्या हातानं आम्हा तिघांना घास दिला. प्रसंग कॅमेरॅने घेऊन फोटो पेपरात छापण्यासारखा होता. पण एवढं चांगलं छापायची सवय वर्तमान-पत्रवाल्यांना नाही. आज मला प्रथम प्रेमाचा घास मिळत होता. हृदय नुसते प्रेमाने उचंबळून आले होते. मातृप्रेमाची महती पटत होती. क्षणाक्षणाला बहरत होती. आणि या मायेच्या कल्पवृक्षाला आमचे मित्र, वहिनी, मी, पत्नी व किशोर सर्वांच्या डहाळ्यांना प्रेमाची पालवी फुटली. ते जेवण, ते प्रसंग मी कधीच विसरणार नव्हतो.

पण तो साठवावा लागणार होता फक्त मनात ... साकार करण्यासाठी ! कारण हे स्वप्न होतं. तो एक आभास होता. सावत्र आईनं लाथेने बाहेर काढलेला मी—इतका मोठा नव्हतो. पण आईबद्दल प्रेम खास होते. तिने मात्र कधी पटवून घेतलं नव्हतं. वडील गेल्यानंतर माझी पिडा बाहेर काढली गेली होती. घराच्या पायरीवर रडता-रडताच मी झोपी गेलो होतो. सकाळच्या किलबिलाटात एक पाखरु माझ्या रडक्या तोंडावर शिटताच मला जाग आली. तोंडात आईचा घास नव्हता...... हाकलल्याचं 'प्रेम प्रतीक' होतं. रात्रीच्या मारानं निखळत आलेला एक दात होता. पण आता मला इथून जायचं होतं. खूप दूर. स्वप्नात ठरवलेल्या ध्येयाकडे...... नोकरीसाठी ! माझं 'पायरीवरचं स्वप्नं' साकार करण्यासाठी !

★★★

---

# मोडलेलं मोवाड आणि शासन यंत्रणा


**सुनील खडपे**

प्रथम वर्ष वाणिज्य


३० जुलै १९९१ रोजी झालेल्या भयानक अतिवृष्टीमुळे मुख्यत्वेकरून विदर्भातील अमरावती व नागपूर जिल्ह्यांत हाहाकार उडाला. याचा परिणाम मोवाड येथे बादळी पावसाने व महापुराने जे थैमान घातले त्यात केवळ संसारच नव्हे, तर शेकडो माणसे वाहून गेली. गोरगरीबांचे शेतीचे बैलही वाहून गेले. उभारलेली शेती उद्ध्वस्त झाली. असा हा भयानक प्रकार महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास पानशेतपेक्षाही जबरदस्त होता. किंबहुना आजवर असा हाहाकार उडाला नाही हेच खरे.

३० जुलै १९९१ ची सकाळ आपल्या आयुष्यात उगवणार नाहीच अशी अंधूक कल्पनासुद्धा २९ जुलैच्या संध्याकाळी मोवाडकरांना नव्हती. पाऊस मुसळधार कोसळतच होता. गावात कमी अधिक प्रमाणात पाणी शिरत होतं. प्रचंड पावसाबरोबरच प्रलयंकारी पूर आला. आणि लहान मुलांनी खेळतांना उभारलेला पत्त्याचा बंगला कोसळावा तसं मोवाड हे गाव कोसळून पडलं. पत्त्याचा बंगला त्याच जागेवर पुन्हा बांधता येतो. मोवाडचं मात्र तसं नाही. 'शासनाच्या अक्षम्य बेपर्वाईचा कळस !

ष्या शब्दात या शोकांतिकेचे वर्णन करता येईल. सन १९४८, १९५१, १९६१, १९७१, १९७५, १९८१ आणि १९८६ अशा ७ वर्षी मोवाड या गावाला पुराचा तडाखा बसला. तरीही कुणी सावध झालं नाही.

मोवाड हे नागपूर, अमरावती आणि मध्यप्रदेशातील बैतुल या तीन जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेलं असून नागपूरपासून ९१ कि. मी. अंतरावर आहे. संत्री व कापूस या पिकांचे उत्पन्न येथे होत असल्याने आजूबाजूच्या १००–१२५ गावांची आर्थिक उलाढाल या मोवाडवर अवलंबून होती. या गावाची दुर्घटनेसमयी सरकारी आकडेवारीप्रमाणे ७८५२ इतकी लोकवस्ती होती.

मोवाड हे गाव वर्धा आणि कोलार या दोन नद्यांनी वेढलं गेलेलं होतं. कोलार आणि वर्धा नदीचा संगम तर अगदी मोवाड गावच्या पायथ्याशीच होतो. वर्धा नदीचा वेढा तर अक्षरशः गावाभोवती ९०अंशाचा कोन करुन वळलेला! या कोनाजवळच ४० ते ४५ वर्षापूर्वी संत तुकडोजी महाराज यांनी श्रमदानाने बांधलेला बंधारा आहे. हा बंधारा समूळ वाहून गेल्यामुळेच मोवाडमध्ये किमान ६०० लोकांचे बळी गेले. कोलार व वर्धा नदीच्या पाणलोट क्षेत्रात २९ जुलैच्या रात्री अनुक्रमे ४७९ मि. मि. व ३५५ मि. मि. पाऊस पडला. या भागात एकूण चुडामण, बेलशक्ती, जीवना, धवलगिरी, कोलार या नद्या वर्धा नदीलाच मिळतात. २९ जुलैच्या रात्री झालेल्या पावसामुळे सर्वच नद्या दुथडी भरून वाहू लागल्या. पाऊस चालूच होता. दोन्ही नद्यांच्या मध्यभागी वसलेल्या मोवाड गावापेक्षा नद्यांच्या पाण्याची पातळी ४ मीटरने जास्त होती. प्रचंड पावसामुळे नद्यांची पातळी अमर्याद वाढलेली. मध्यप्रदेशातील मुलताईजवळील चांदोरा धरणातील पाणी कोलार नदीत तर नागोठाणे धरणातील पाणी चुडामण नदीत सोडण्यात आले. आणि मोवाड भोवतीचा पाण्याचा वेढा अधिकच हिंसक बनला. गावात सगळ्यात मजबूत तिनमजली इमारत बंडू गुप्ता यांची होती. त्यानंतर रामाच्या देवळाचा परिसर सुरक्षित समजला जातो या इमारतीत १५० व रामाच्या देवळात २०० लोकांनी आसरा घेतला होता. रात्री बाराच्या सुमारास पाणी गळ्यापर्यंत चढले. मोवाड गावाच्या पोलीस चौकीचे हेडकॉन्स्टेबल समाधान इंगळे यांनी तेवढ्या पाण्यातून आपल्या ५ मुली आणि पत्नीला बंडू गुप्ताच्या इमारतीत हलविले. आणि त्यानंतर किमान १०–१२ जणांना मदतीचा हात दिला. आणि मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. पण तोही त्याच मृत्यूच्या कराल दाढेत सापडला.

मोवाड गावच्या आयुष्यात उषःकाल होता होता काळरात्र पसरली. पहाटे ४ ते ६ या वेळात पहिली प्रलयंकारी लाट आली. पहिल्या लाटेनं मोवाड उद्ध्वस्त करण्यास प्रारंभ केला आणि पुढील लाटांनी असंख्य बळी घेऊन हे काम पूर्ण केले. पाण्याचा वेग एवढा प्रचंड होता की, बंडू गुप्ता यांची सिमेंट कॉंक्रीटने बांधलेली ३५ ते ४० फुट उंचीची तीन मजली इमारत वाहून गेली. या इमारतीतील १५० व रामाच्या देवळात किमान २०० लोकांनी आसरा घेतला होता त्यापैकी एक सुद्धा वाचला नाही. बचावलेल्या लोकांचे म्हणणे असे आहे की, गावातील किमान १००० लोक वाहून गेले. परंतु आजही मृतांचा सरकारी आकडा १५० च्या वर सरकलेला नाही.

३० जुलैला दुपारी ४ पर्यंत मोवाडपासून अवघ्या ९१ कि. मी. अंतरावर असलेल्या नागपूर शहरात या संदर्भात विशेष माहिती नव्हतीच. मोवाड गावात पाणी शिरले आहे एवढीच माहिती मिळालेली होती. आणि मोवाड गावात पाणी शिरणे ही काही नवीन बाब नव्हती. संध्याकाळी सहा वाजता ग्रामीण पोलीस कंट्रोल रूमने प्रसिद्धी माध्यमांना गावात काहीतरी भयंकर घडले आहे अशी बातमी दिली व प्रसिद्धी माध्यमांत धावपळ सुरु झाली. परिस्थितीची भीषणता लक्षात घेऊन प्रसिद्धी माध्यमे खडबडून जागी झाली होती. सायंकाळी साडेसातच्या सुमारास पोलीस उपमहानिरीक्षकांचा हवाला देऊन पी. टी. आय. या वृत्तसंस्थेने देशभर ही बातमी प्रसृत केली आणि ५०० लोक बुडाले असा आकडा दिला.

ही दुर्घटना घडून तब्बल २५ ते ३० तास उलटले होते आणि मोवाड नावाचे गाव ८० टक्के वाहून

गेले होते. उरले होते ते केवळ अवशेष. ते सुद्धा चिखलात अडकलेले, ढिगाऱ्यात लपलेले. माणसं वाहून गेली, घरं वाहून गेली, लहान मुलं वाहून गेली. अन्नधान्य, पैसा, दागदागिने, गुरं ढोरं सर्व काही वाहून गेलं. एवढी मोठी बाजारपेठ पण प्रत्येक दुकान वाहून गेलं. बँक, हँडलूम सोसायटीची चार मजली इमारतही वाहून गेली. भर पावसात अश्रुही बुडून गेले. हे दारुण दृष्य पाहून प्रत्यक्ष काळही थिजला असेल, हृदये दुभंगून गेली असतील.

लष्कराचे जवान आणि पोलीस हातात साहित्य घेऊन मदतकार्यात गुंतले होते. ८० ते ९० कुटुंबे नामशेष झाली होती. सापडलेले मृतदेह उचलण्यासाठी जवानांना स्ट्रेचर उपलब्ध करुन दिले नव्हते, पूरग्रस्त मात्र त्या अवशेषात आपले आईवडील, बहीण, भाऊ, मुलगा-मुलगी, बायको यांचा शोध घेण्यात गुंतले होते. गावात फिरताना प्रत्येक पावलाक्षणिक कुणाच्या प्रेतावरुन तर चालत नाही ना ? अशी त्यांची विलक्षण स्थिती झाली होती. नदीच्या पात्रात साचलेला १२ ते १५ फूट उंचीचा गाळ उपसला गेला असता तर अनेक मृतदेहांचा तपास लागला असता. पण तसे मदतकार्य झालेले नव्हते. त्या उध्वस्त गावाची ही भीषण चेष्टाच होती.

सरकारच्या बेजबाबदारपणामुळेच मोवाडची भयंकर दुर्घटना घडली. या दुर्घटनेला सरकारचा बेजबाबदारपणाच पूर्णता: कारणीभूत आहे. १९६१ साली जोगळेकर समितीने या संपूर्ण गावाचं पुनर्वसन करावं, अशी शिफारस केली होती. परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले त्यामुळेच ही दुर्घटना घडली. मोवाडचे पुनर्वसन तरी व्हायला हवे होते किंवा पुनर्वसन होतच नसेल तर बंधाऱ्याची उंची तरी वाढविली जायला पाहिजे होती. ३० वर्षांनंतर आलेल्या महापूराने मोवाड उध्वस्त झाले. १९८९ पासून या बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम रोजगार हमी योजनेतून करण्यात येत होते. बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम करणारे कंत्राटदार बोंडी, मोहगावचे श्री. गवई आणि कुकडी पांजरा येथील श्री. गेडाम हे होते. याच, कंत्राटदारांनी बंधाऱ्याला मोठमोठी भगदाडे पाडून ठेवली होती. त्यामुळे बंधारा कमकुवत झाला होता. पण स्थानिक आमदार श्री. सुनील शिंदे यांनी कंत्राटदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यास स्पष्ट नकार दिला. दिनांक १४।७।८७ ला बंधाऱ्याच्या माती आणि पिचिंगच्या कामासाठी ४ लाख २६ हजार रुपये खर्चाची प्रशासकीय मंजूरी मिळाली तरीसुद्धा हे काम झालेले नाही. हे सर्वमान्य असूनही या प्रकरणी सरकार जबाबदार नाहीच अशी ठाम भूमिका घेणाऱ्या सुनील शिंदे यांच्या नावाने गावातल्या वाचलेल्या लोकांनी अक्षरश: तळतळाट केला.

जिल्हाधिकारी गुरुमूर्ती बेडगे आणि पोलीस अधिक्षक रामराव बच्छेवार हे दोघे आणि त्यांचे २–४ साथीदार वगळता मोवाड प्रकरणातील शासकीय पातळीवरील मदतकार्य साफ बनाव होता. सारी शासकीय यंत्रणा मुख्यमंत्री येणार म्हणून त्यांच्या तयारीत मग्न होती. दुर्घटनेनंतर तब्बल ४० तासांनी मुख्यमंत्री, पालकमंत्री, महसूलमंत्री आणि आमदार आपद्ग्रस्तांचे अश्रु पुसण्यासाठी पोहोचले. आणि तासाभराने निघूनही गेले एका भीषण दुर्घटनेनंतर सरकार पातळीवरील ही बेपर्वाई क्रूर स्वरूपाचीच होती. मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी तर संपूर्ण मोवाड गावची पाहणी करण्याची माणुसकीही दाखवली नाही. खुर्ची टाकून ते बसून राहिले ! लोक पावसात भिजत असतांना मुख्यमंत्र्यांच्या डोक्यावर मात्र छत्री धरण्यात आली होती. संसार उध्वस्त झालेल्या, आप्तस्वकीयांना आपल्या डोळ्यांसमोर मृत्युच्या आधीन झालेलं पाहणाऱ्या या लोकांना सरकारकडून अपेक्षा होती ती मदतीची, सांत्वनाची. मुख्यमंत्री आणि त्यांच्या बरोबरच्या एकाही मंत्र्याने ती पूर्ण केली नाही. सरकारच्या अक्षम्य बेपर्वाईचा बळी म्हणून मोवाडच्या या घटनेची भारताच्या इतिहासात काळ्याकुट्ट अक्षरात नोंद होईल. या महापूरात शेकडो लोकांची आहुती पडली. हजारो घरे कोसळली. हजारो हेक्टर्सवरील पिके वाहून गेली. परंतु त्याचा अंदाज शासनाला आला नाही. गाळाचे ढिगारे दीर्घकाळ उपसले गेले नाहीत. शेकडो लोक बळी पडल्यावरही सरकारने ही अवहेलना थांबवली नाही. बळी पडलेले ते अतृप्त आत्मे तळतळाट करतील, शिव्या–शाप देतील. मोवाडच्या पुनर्वसनातही सरकार अजून चालढकल करत आहे. आता तरी सरकार मोवाड गावचं पुनर्वसन करण्याची ठोस पावले उचलेल काय ?

★★★

# रुपयाचे अवमूल्यन

**मिनल घाटे**
बारावी कला

भारत एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आहे. आणि त्याबरोबरच आर्थिक पारतंत्र्याच्याही उंबरठ्यावर आहे. भारताची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. जणू काय अर्थव्यवस्थेवर आर्थिक संकटच आले आहे. त्यावर उपाय-योजना म्हणूनच की काय रुपयाचं अवमूल्यन केलं गेलं आहे. अमेरिकेचा डॉलर, ब्रिटनचा पौंड, स्टर्लिंग, जर्मनीचा ड्यूशमार्क, जपानचा येन आणि सोविएत रशियाचा रुबल या सर्वांच्या तुलनेत साधारणतः २० टक्के रुपयाची किंमत कमी झाली आहे. या अवमूल्यनाचा नेमका अर्थ काय ? ते कोणत्या कारणासाठी केले आहे ? त्याचे फायदे व तोटे कोणते ? हे अवमूल्यन सहेतुक आहे का ? अवमूल्यनाची दिशा दाखवली कुणी ? या अवमूल्यनाने नक्की हित साधले जाणार आहे का ? असल्यास कोणाचे ? याचा परिणाम कोणाकोणावर होईल ? या सर्व प्रश्नांची चर्चा करणे आवश्यक आहे.

भारतीय रुपयाचे अवमूल्यन हे जुलै महिन्याच्या पहिल्या--दुसऱ्या आठवड्याच्या दरम्यान झाले. 'लोककल्याणाकरिता रुपयाचे अवमूल्यन' असे प्रतिपादन केले आहे. रुपयाचे अवमूल्यन म्हणजे परकीय चलनाच्या तुलनेत भारतीय रुपया अधिक स्वस्त होणे होय. उदाहरणार्थ, ज्या अमेरिकन डॉलरसाठी आपण पूर्वी १८ रु. देत होतो त्याच अमेरिकन डॉलरला आता २६ रु. मोजावे लागणार आहेत. तसेच ब्रिटनच्या एका पौंड, स्टर्लिंगसाठी ४१.५९ रु. द्यावे लागणार आहेत. या अवमूल्यनामुळे परकीय वस्तूंची आयात करण्यासाठी आपल्याला रुपयांमध्ये अधिक किंमत द्यावी लागणार आहे. म्हणजेच आपली आयात महागणार आहे. मात्र इतर देशांना भारतीय वस्तूंची आयात करणे स्वस्तात होणार आहे. परिणामतः आपली निर्यात वाढणार आहे एकूण विचार करता आयात वस्तू महागणे आणि निर्यात स्वस्त होणे, यामुळे आयात–निर्यात व्यापारात थोड्याफार प्रमाणात समतोल साधला जाईल. व्यापारात तुटीचा प्रश्न भेडसावत राहणार नाही. निर्यातीला उत्तेजन मिळाल्यामुळे साहजिकच परकीय चलनाच्या साठ्यात वाढ होईल.

अवमूल्यन करण्यामागे फक्त एक व्यापार तूट भरून काढणे एवढाच दृष्टीकोन नाही. तर भारताजवळची परकीय गंगाजळी आटत अगदी तळाशी गेली आहे. विदेशी कर्जाचे ओझे डोईजड झाले आहे. कर्जाच्या व्याजासहित परत फेडीत देशाला बरीच रक्कम खर्च करावी लागते. परदेशात राहणाऱ्या भारतीयांकडून मिळत असलेले परकीय चलन कमी होत चालले आहे. परदेशाकडून भांडवलाची गुंतवणूक अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे. देशातील जनता अंतर्गत भाववाढीच्या चटक्यांनी होरपळली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या अर्थसंकल्पाच्या वार्षिक तुटीची चढती वेल या सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन देश आर्थिक पेचप्रसंगात सापडला. नाणेनिधीने कर्ज देण्याची हमी दिली. पण तोपर्यंत काय ? यासाठी तातडीची गरज म्हणून केंद्रसरकारने देशाकडील जमा सोन्यापैकी ४०० कोटी रुपयाचे ४४.६१ टन सोने जागतिक बाजारात विकून तेवढीच वेळ मारुन नेली.

भारताने नाणेनिधीकडे कर्जाची मागणी केली. काही अटींवर कर्ज देण्याचे IMF ने मान्य केले. त्यापैकी ' रुपयाचे अवमूल्यन करा ' ही एक अट होती. याशिवाय सबसिडी कमी करावी, संरक्षण खर्चात, खाजगीकरणाला अधिक वाव, नोकरशाहीवरील खर्च कमी करावा वगैरे पण अवमूल्यनाचे अनिष्ट परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार नाहीत का ? काही औषधांचे Side effects जाणवतात. तसाच हा देखील परिणाम आहे. रुपयाच्या अवमूल्यनामुळे

सर्वच वस्तूंची आयात महागणार आहे. बहुतेक वेळा आयात वस्तूंचा वापर देशाच्या अर्थव्यवस्थेतील उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून केला जातो. अशावेळी आयात वस्तूंच्या किंमती वाढल्या म्हणजे अंतीम वस्तूंच्या किंमतीसुद्धा भडकणार आहेत. उदाहरणार्थ, खतांच्या किंमतीत वाढ झाली तर त्याचा तडाखा शेतकऱ्यांना बसणार हे त्रिकालाबाधित सत्य आहे. कारण IMF चा सल्ला सबसिडी कमी करा म्हणजे शेतकरी अडचणीत. त्यातच तो कर्जबाजारीही असतो म्हणजे शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होईल.

पेट्रोल हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने वंगण आहे. आपण पेट्रोल व पेट्रोलियम पदार्थांची आयात करतो. अवमूल्यनामुळे पेट्रोलच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होईल, पेट्रोलसारख्या वस्तूंची आयात महागल्यामुळे त्याच्या खरेदीत कपात होण्याऐवजी आयात निर्यात व्यापारातील तफावत वाढण्याचा संभव आहे. तसेच वाहतूक खर्च देखील वाढणार. म्हणजे अर्थव्यवस्थेत चलनवाढ होण्याची दाट शक्यता आहे.

अवमूल्यन हा एकच रामबाण उपाय संयुक्तिक वाटत नाही. या उपायाबरोबरच इतर अनेक पूरक उपाय जारी करणे आवश्यक आहे. अवमूल्यनामुळे भारतीय माल परदेशांना स्वस्त मिळेल म्हणजे निर्यात वाढेल हे खरे. पण हा माल चांगल्या दर्जाचा असणे जरुरीचे असल्याने वस्तूचा दर्जा वाढविला पाहिजे. यासाठी तशा प्रकारचे तंत्रज्ञानही आवश्यक आहे. त्यामुळे रुपयाच्या अवमूल्यनाचे फायदे पदरात पाडून घेता येतील.

सध्याची अर्थव्यवस्था आज गिऱ्हाईकी तंत्रज्ञानाच्या उद्योगधंद्यावर विसावलेली आहे. हा अर्थव्यवस्थेचा साचा संपूर्ण बदलणे आवश्यक आहे. निर्यात वाढेल. सरकारी खजिन्यातील तूट कमी होईल. तसेच प्रशासनावरील खर्च शक्य असेल तेवढा कमी करणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पातील त्रुटी व तूट दिवसेंदिवस वाढत न जाता कमी होणे गरजेचे आहे. यासाठी निर्णय घेताना आणि त्याची अंमलबजावणी करताना शिथिलता नको. यासाठी लोकनेत्यांजवळ दूरदृष्टी असली पाहिजे.

★★★

# वैद्यकशास्त्रातील प्रगती

**समीर जाधव**

प्रथम वर्ष विज्ञान

आज आपण एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आहोत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वैज्ञानिक प्रगतीचा सर्वात जास्त फायदा झाला तो वैद्यकशास्त्राला. पेनिसिलीनसारख्या प्रतिजैविकांचा शोध, सल्फा औषधी, आणि क्ष-किरण, समस्थळी, इलेक्ट्रॉनिक्स्, श्रवणातील ध्वनी यासारख्या अभियांत्रिकी शास्त्रातील घडामोडींनी तर वैद्यकशास्त्राचा पूर्णपणे कायापालट केला. आज मेंदूत विद्युतप्रस्थ खुपसून मेंदूतील प्रक्रियांचे आलेख चित्रनलिकेवर बघायला मिळतात. एखादा अवयव न फाडता शरीरांतर्गत रोगांचे स्वरुप कळून येते.

कॅटस्कॅन (कॉम्प्युटराईज्ड ट्रान्सवर्स ॲक्शीयल होमोग्राफी) युएस् (अल्ट्रासोनोग्राफी) फो (फायबर ऑप्टीक एंडोस्कोपी) आर. आय्. (रेडिओन्यूक्लाइड इमेजिंग) झ्युमाटोग्राफी किंवा एन्. एम्. आर्. (न्यूक्लिअर मॅग्नेटिक रेझोनोन्स) स्पेक्ट्रोस्कोपी, थर्मोग्राफी ही नावे वैद्यक शास्त्रातील

प्रगतीचे द्योतक आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाने शरीराला इजा न करता, आपल्याला विशेष कष्ट न देता शरीरातील घडामोडींची सहज माहिती मिळवली जाते.

वरील प्रकारच्या सर्व आधुनिक तंत्रज्ञानामुळे रोगनिदानाचे मार्ग सोईस्कर बनले आहेत. या सर्व तंत्रामध्ये शरीरात काही संदेशलहरी पाठवल्या जातात. त्यात क्ष-किरण, ध्वनीलहरी, प्रकाशलहरी यांचा समावेश असतो. शरीरातून बाहेर पडणाऱ्या संदेश लहरी परत मिळवल्या जातात. त्यातील फरक पाहिला जातो. म्हणजेच त्या परावर्तीत झाल्या, शोषल्या गेल्या, पुनःप्रक्षेपित झाल्या इ. बघितले जाते व संगणक या माहितीची छाननी करतो व प्रतीमा-दर्शकावर आपलं म्हणणं मांडतो. मग डॉक्टर रोग-निदान करतात.

**कॅटस्कॅन तंत्र–** वैद्यकशास्त्रात हे जे शरीरात डोकावयाचे नवीन मार्ग प्राप्त झाले आहेत त्यात कॅटस्कॅनचा नंबर वर आहे. कॅटस्कॅनला मराठीत 'संगणकी शरीरछेद प्रतीमा' असे म्हणतात. गॉडफ्रे न्यूबोल्ड हौन्सफिल्ड व कॅलन मॅकलिऑड कॉरमॅक हे कॅटस्कॅन यंत्राचे निर्माते. कॅटस्कॅन तपासणीमध्ये रुग्णाला एका टेबलावर झोपवले जाते आणि मेंदू वड्यासारख्या भोकातून आरपार घालवला जातो. या काळात शरीराभोवती एक क्ष-किरण शलाका फिरवली जाते या शलाकेच्या विरुद्ध बाजूस शोधक यंत्रणा असते. शरीरातील उत्तींनी यातील किती क्ष-किरण शोषून घेतले याचा शोध लावला जातो. हा प्रकार अनेक वेळा केला जातो. दरवेळेस रुग्णाची टेबलापासून उंची वाढविण्यात येत असते. ही माहिती संगणकाला भरवण्यात येते. यामुळे डॉक्टरपुढे शरीराचे आडवे छेद घेतल्यासारख्या प्रतीमा उभ्या केल्या जातात. निरनिराळ्या उंचीवरील छेदचित्रांचे रुग्णाच्या शरीरांतर्गत अवयवांचे त्रिमीत चित्र संगणक डॉक्टरांच्या नजरेसमोर उभा करतो. त्यामुळे रोगनिदान करणे सोपे जाते. मेंदू आणि मज्जारज्जूंच्या दुखण्याचं निदान याबाबतीत कॅटस्कॅनने क्रांती केली आहे.

मेंदूतील सूज, गळू, गाठ, रक्ताच्या गुठळ्या यांच्यातील बदल कवटी न उघडताच कळू शकतो. गाठ किंवा ट्यूमर कुठे आहे, ते पसरलय का, त्याने किती भाग व्यापलाय, ते काढायचं झाल्यास कशी शस्त्रक्रिया तात्काळ करता येईल ही माहिती कॅटस्कॅनमुळे झटकन मिळते. शस्त्रक्रियेनंतर शस्त्रक्रियेचे परिणाम काय झालेत, ती यशस्वी झाली की नाही हेही कॅटस्कॅनमुळे कळू शकते. मूत्रपिंड, स्वादुपिंड, यकृत, प्लीहा या अवयवांची दुखणी विशेषतः कर्करोग प्रथमावस्थेत असताना कळून आल्यास त्यावर उपाय योजना चटकन होऊ शकते.

**श्रवणातीत ध्वनींचा वैद्यकीय उपयोग –**
दर सेकंदास ५ ते ७ कोटी स्पंदने निर्माण करणारे यंत्र म्हणजे श्रवणातीत ध्वनी यंत्र. समजा एखादी पितळी गोळी शरीरात घुसली असल्यास आणि मुख्य म्हणजे ती चेहऱ्यासारख्या भागात असल्यास शस्त्रक्रिया करणे अवघड असते कारण गोळी हाडाच्या मागे असल्यामुळे क्ष-किरण निकामी ठरतात, गोळी पितळी असल्यामुळे चुंबक वापरणे उपयोगाचे नसते. अशावेळी श्रवणातीत ध्वनी यंत्रणेचा उपयोग महत्त्वाचा ठरतो. श्रवणातीत ध्वनी जखमेच्या दिशेतून सोडल्यास त्यांचे प्रतिध्वनी हाडाची जागा, गोळीची जागा व्यवस्थित दाखवतात. गोळी किती खोलवर आहे व तिने व्यापलेली जागा समजते त्यामुळे शस्त्रक्रिया करणे सोपे जाते. श्रवणातीत ध्वनीतंत्रात वापरण्यात येणारी यंत्रणा म्हणजे सूईच्या अग्राएवढे टोक मध्ये बसवलेला चिमटा असतो. याला 'श्रवणातीत ध्वनी चिमटा' असे म्हणतात. या चिमट्याच्या दोन्ही टोकांमध्ये बसवलेली सूई हा एक रुपांतरकारक (ट्रान्सड्यूसर) आहे. हा रुपांतरकारक श्रवणातीत ध्वनीची एक शलाका निर्माण करतो. ती विशिष्ट दिशेने सोडतो आणि मग या श्रवणातीत ध्वनीचे अडथळ्यावर आपटून येणारे प्रतिध्वनी ऐकतो. रुपांतरकारकाचे टोक निमुळते असते म्हणजेच सूईच्या टोकाएवढे. हा संपूर्ण चिमटा डोळ्यात घालून डोळ्यात घुसलेली उपद्रवकारक वस्तू बाहेर काढता येते. श्रवणातीत ध्वनी शरीरात रडारचे काम करतो.

मेंदूसारख्या गुंतागुंतीच्या अवयवामध्ये अनावश्यक गळवं किंवा गाठींची माहिती श्रवणातीत ध्वनीयंत्रणेमुळे मिळते. अपघातात केशनलिका फुटतात व रक्त साकळते व नंतर त्याचे वाईट परिणाम होतात व मनुष्य अशा वेळी बेशुद्ध

होतो अशा वेळी ही यंत्रणा उपयोगी पडते.

श्रवणातीत ध्वनीचा वैद्यकीय उपयोग करुन घेण्याची कल्पना सर्वप्रथम सुचली व्हिएन्नातील डॉक्टर कार्ल दुसिक यांना. यकृत, आतडी, प्लीहा मूत्रपिंड यांसारख्या नाजूक भागांचे चित्र श्रवणातीत ध्वनीमुळे आपल्यासमोर उभे राहते.
श्रवणातीत ध्वनीयंत्रणा क्ष-किरण यंत्रणेपेक्षा श्रेष्ठ ठरते ती खालील कारणांवरुन–
क्ष-किरण तपासणीत किरणोत्सर्गाचा शरीरावर थोडा-थोडा परिणाम होतो पण तसा परिणाम श्रवणातीत ध्वनी यंत्रणेमुळे झाल्याचे अद्याप आढळले नाहीत. प्लास्टिक, रबर इ. वस्तू क्ष-किरण तपासणीत आढळत नाहीत त्या श्रवणातीत ध्वनी परिक्षणात आढळतात.
श्रवणातीत ध्वनी आलेखाचे तंत्र आता इतके प्रगत झाले आहे की त्यामुळे शरीरांतर्गत अवयवांची प्रतीमा टी. व्ही सारख्या पडद्यावर मिळू शकते याला 'बी-स्कॅन' असे म्हणतात. लिव्हरला आलेली सूज या यंत्रणेमुळे कळू शकते. श्रवणातीत ध्वनी यंत्रणेमुळे हृदयाचा आकार रोहिणी व नीला यावर बसणारे क्षारांचे अवसाद, झडपांवर नजर ठेवून हृदयविकाराच्या झटक्यावर नियंत्रण ठेवता येइल असा विश्वास वाटतो. इटलीत पादुआ विद्यापीठात एका रुग्णाच्या मेंदूवर तीन दिशांनीं श्रवणातीत ध्वनीलहरी सोडून मेंदूतील ट्युमर नष्ट करण्यात संशोधक यशस्वी झाले, तर १९८१ मध्ये गर्भाशयातील २३ आठवडे वयाच्या गर्भाच्या डोक्यात पाणी होत आहे हे निदान या यंत्रणेने करुन या यंत्रणेच्या सहाय्याने गर्भात सूई खुपसून पाणी काढण्यात आले व मेंदूची वाढ व्यवस्थित होऊ शकली.

## प्रकाशकीय धाग्यांचा वैद्यक शास्त्रात उपयोग

प्रकाशकीय धागे एका नळीत असतात. गाभा व आवरण असे नळीचे दोन भाग असतात गाभा सुसंगत तर आवरण असंगत प्रकाश परावर्तीत करते. डॉक्टर गाभ्याला डोळा लावून सुसंगत प्रकाशात शरीराचा अंतर्भाग डोळ्यांनी बघू शकतात. त्यामुळे शरीरांतर्गत अवयवांचे छेद घेणे, छोट्या शस्त्रक्रिया, कर्करोगग्रस्त गाठीत किरणोत्सर्गी खुपसने, रक्त गोठवणे, अनावश्यक द्रव बाहेर काढणे इ. शक्य होते.

'झ्युमॅट्रोग्राफी किंवा आण्विक चुंबकीय संवादन वर्णपट' असे लांबलचक नांव असलेली यंत्रणा अणुवैद्यक शास्त्रात नव्याने प्रगत होतेय. चुंबकीय क्षेत्र शरीराभोवती निर्माण करुन रोगनिदान करण्याचे तंत्र प्रगत होत आहे. डायनामिक स्पेशल स्कॅनर नावाचे यंत्र जे हृदय, फुफ्फुस व रक्ताभिसरणात्मक हालचालींचे त्रिमित चित्र निर्माण करू शकेल. अशी सध्या यंत्रणा निर्माण होत आहे.

वैद्यक क्षेत्रातील ही २० व्या शतकातील आधुनिक प्रगती व त्यातील नवे नवे संशोधन अजूनहीं सुरू आहे. महाभयानक रोगांवरहीं हे वैद्यक शास्त्र निश्चितच इलाज काढेल यात शंका नाहीं.

★★★

# शारजाह क्रिकेट स्पर्धा – एक दृष्टीक्षेप

**संजय खाडये**
तृतीय वर्ष कला

शारजाहच्या रखरखणाऱ्या वाळवंटाला क्रिकेटच्या नंदनवनाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. एवढेच नव्हे तर ही स्पर्धा बक्षिसांच्या खैरातीमुळे, महान क्रिकेटपटूंच्या गौरवामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या महाशक्तीही येथे हजेरी लाऊ लागल्याने क्रिकेट जगतात ही स्पर्धा एक आकर्षण ठरली आहे.

याच धर्तीवर १९९१ च्या शारजाह स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भारत, पाकिस्तान व वेस्टइंडीज हे संघ सहभागी झाले. भारत पाकिस्तान हे पारंपारिक प्रतिस्पर्धी या स्पर्धेत असल्याने यावेळी वेगळीच चुरस निर्माण झाली होती.

शारजाहमध्ये भारतीय आणि पाकिस्तानी क्रिकेटशौकीन भरपूर असल्यामुळे ज्या ज्या वेळी या दोन संघात सामने होतात त्या त्या वेळी लोकांच्या भावना उचंबळून येतात. दोन्ही बाजूचे समर्थक आपल्या खेळाडूंना जोरदार प्रोत्साहन देतात. त्यामुळे वेस्टइंडीज या ठिकाणी तिऱ्हाईतासारखा वाटतो आणि अशा वेळी या दोन संघात अंतीम लढत नसेल तर त्या स्पर्धेची चुरस जवळ जवळ संपल्यासारखीच वाटते.

अशा पार्श्वभूमीवर या स्पर्धेला सुरुवात झाली. भारताने या स्पर्धेत सुरुवातीच्या तीन्ही सामन्यात चांगलाच पराक्रम दाखवून व सांघिक भावनेच्या जोरावर हॅट्रीक साधून अंतीम फेरीत आपले स्थान निश्चित केले. पण दुसऱ्या बाजूला केवळ सरासरीच्या जोरावर पाकिस्तानचा अंतीम फेरीतील प्रवेश निश्चत होणार होता.

२३ ऑक्टोबर रोजी झालेला सामना पाकिस्तानचा अंतीम सामन्यात प्रवेश करण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा होता. आदल्या दिवशी रात्री पडलेल्या दवामुळे सामना चालू होण्यास अर्धा तास विलंब झाला. त्यामुळे हा सामना ४५ षटकांचा ठेवायला हवा होता परंतु पाकिस्तानला किमान १९८ धावा काढता याव्यात यासाठी स्पर्धा आयोजकानी स्पर्धेचे नियम ऐनवेळी धाब्यावर बसवून खेळाची वेळ वाढवून दिली. याचा परिणाम म्हणून शेवटची पाच षटके भारताला काळोखात खेळावी लागली. त्यावेळी स्टेडीयमवरचे दिवेही लागले होते. खेळाडूंनी मंद प्रकाशाबद्दल (bad light) तक्रार करूनही पंचानी ती फेटाळून लावली. भारताला या सामन्यात हार पत्करावी लागली. अर्थात या पराभवातसुद्धा सन्मानता होती.

एकंदरीत पाकिस्तानचा अंतीम फेरीत प्रवेश झाला. २५ ऑक्टोबर रोजी अंतीम सामन्यात भारत, पाकिस्तानचे सलग पाचव्या जेतेपदाचे स्वप्न उद्ध्वस्त करणार असे अनेक क्रिकेट तज्ञांनी आपले मत व्यक्त केले होते. परंतु पंचांच्या पक्षपाती कामगिरीमुळे पाकिस्तानच्या अकिब जावेदला सहज हॅट्रीक साधता आली. त्यामुळे भारतीय क्रिकेट संघाला शारजाह विश्वचषक गमवावा लागला. मात्र या ऐतिहासिक पराभवाने शारजाह स्टेडीयमवर सुहास्य मुद्रेने आलेल्या आणि दूरदर्शनकडे डोळे लावून बसलेल्या असंख्य भारतीयांचे चेहरे निराशेने काळवंडून गेले.

थोडक्यात आयोजकांनी ही स्पर्धा केवळ क्रिकेटच्या प्रेमासाठी भरवलेली नव्हती तर उभय देशातील क्रिकेट शौकिनांच्या भावना ओळखून निव्वळ पैशासाठी ही स्पर्धा भरवली होती. आयोजक हे पाकधार्जिने आहेत याचे प्रदर्शन आपल्याला या स्पर्धेच्या माध्यमातून वेळोवेळी झाले. त्यामुळे शारजाह क्रिकेट स्पर्धा ही सरळ सरळ फसवणूक ठरली आहे.

शारजाह चषक पाकिस्तानने जिंकला आणि भारतीय क्रिकेट संघ रिकाम्या हाताने मायदेशी परतला. पण शारजाह क्रिकेट स्पर्धेमधुन अनेक प्रश्न निर्माण झाले. ज्या भारतीयांनी भारत पाकिस्तान अंतीम लढत पाहिली त्या सर्वांनी श्रीलंकेच्या पंचांनी पाकिस्तानच्या बाजूने पक्षपाती पंचगिरी केली अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यामुळे शारजाह क्रिकेट स्पर्धेत जाण्यापूर्वी भारताने अनेकदा विचार करावा.

पाकिस्तान संघाला पराभव पचवता येत नाही. पराभव समोर आला की त्यांची रडवेगिरी चालू होते. त्यासाठी मग ते मिळेल त्या मार्गाने; मग तो चांगला असो अथवा वाईट, विजयासाठी धडपडतात. माईक गॅटिंग-शकूर राणा प्रकरण, श्रीकांतवर झालेला हल्ला, न्यूझिलंड-वेस्टइंडीज यांच्या पाकिस्तान दौऱ्यावेळी पाकिस्तानी गोलंदाजांनी चेंडू हेतुपूर्वक खराब करुन घेतलेले बळी, प्रतिस्पर्धी संघ विजयाच्या समीप आला की पाकिस्तानी प्रेक्षकांकडून मैदानामध्ये होणारी दगड, बाटलीफेक ही पाकिस्तानी रडवेगिरीची काही उदाहरणे आहेत. यामुळे पाकिस्तानला पराभव पचवता येत नाही असे म्हणणे योग्य ठरेल. शारजाह क्रिकेट स्पर्धेमध्ये यंदा स्वच्छ क्रिकेटचा निखळ आनंद उपभोगता येईल असे वाटत होते. भारतीय संघाने चांगली कामगिरी करूनही शेवटच्या क्षणी या संघाला न्याय मिळाला नाही. अंतीम लढत जातीयवादी आणि धार्मिक दृष्टीकोनातून लढविली गेली. पाकिस्तान विजयी झाल्यानंतरही जातीय भावना अतिशय तीव्र होती व ती जाहिररित्या व्यक्त केली गेली. ही बाब भारतीय अधिकारीसुद्धा अमान्य करत नाहीत. शारजाहमध्ये जे पाकिस्तानी नागरिक आहेत त्यांनी अत्यंत हीन वर्तन केले. भारतीय क्रिकेट शौकिनांना उद्देशून वापरलेली भाषासुद्धा न ऐकवणारी होती. एवढेच नव्हे तर व्ही. आय. पी. कक्षातून भारतीय अभिनेत्री सिमी गरेवाल बाहेर पडत होती त्यावेळी काही पाकिस्तानी युवक तिची छेडछाड करीत होते. ही घटना पाहून खुद्द सत्कारमूर्ती म्हणून आलेल्या पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटू वासिम रानाने काढलेले उद्गार बोलके आहेत. तो म्हणतो, 'राष्ट्रीय भावनेचा एवढा जबर पगडा लोकांवर का असतो तेच मला समजत नाही.' शारजाहमधील वातावरण बिघडले आहे याचा उल्लेखही तो करतो.

अतिमहत्वाच्या भारतीय व्यक्तीनासुद्धा संयोजकांकडून चांगली वागणूक मिळाली नाही. भारतीय राजदूतांना तर काही काळ बसायलासुद्धा जागा मिळाली नाही. त्याचप्रमाणे भारतीय क्रिकेट अध्यक्ष, मंत्री श्री. माधवराव शिंदे यांचे जेव्हा शारजाह विमानतळावर आगमन झाले तेव्हा त्यांचे स्वागत करण्यासाठी कुणीही उपस्थित नव्हते. याबद्दल भारताने निषेधाचा चकार शब्दसुद्धा काढला नाही. यापुढे आपण शारजाहला कधीही येणार नाही अशा अनेक प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या.

तसेच भारतीय संघ जर या पद्धतीने हरणार असेल तर भारताने येथे आपला संघ पाठवू नये. कारण आम्हाला खूपच मनःस्ताप सोसावा लागतो, असे शारजाहमधील भारतीयांचे म्हणणे आहे.

मुळातच माधवराव शिंदे यांनी या दौऱ्यास मंजुरी दिली नव्हती पण नंतर त्यांच्यावर दबाव आल्यामुळे हा दौरा आयोजिला गेला. तसेच अरब धनिकानी पेट्रोडॉलरचे अमिष दाखवून भारतीयांना आपली चरणधूळ झाडायला लावली. अंतीम लढतीत पंच पाकिस्तानच्या बाजूने होते असे भारतीय अधिकारी सुद्धा मान्य करतात. एरवी अझर, सचिनला ज्या पद्धतीने बाद ठरविलं गेलं ती पद्धतच चुकीची होती. असे अझरसुद्धा मान्य करतो. पंचांनी अंतीम सामान्याच्यावेळी पक्षपातीपणा का करावा याला सुद्धा काही कारणे आहेत. श्रीलंकेमध्ये भारतीय लष्कराने केलेली कारवाई यासारखी ताजी घटना लक्षात घेता त्या देशातील पंचांकडून निःपक्षपाती पंचगिरीची अपेक्षा बाळगता येत नाही. हे सत्य आपणास नाकारता येत नाही.

लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे भारतीय क्रिकेट

मंडळातील बहुतांशी सदस्य उपस्थित राहूनही त्यांना संबंधीत प्रकाराबद्दल आवाज का उठविता आला नाही ? ते स्पर्धा नियमांसंदर्भात अज्ञानी होते की काय ? असा प्रश्न आपल्या समोर उभा रहातो.

वरील सर्व गोष्टींचा सारासार विचार करता यंदाची शारजाह क्रिकेट स्पर्धा ही वादग्रस्त ठरली. अर्थात या सर्व स्पर्धेचे निकाल रद्द ठरवावेत अशी रास्त मागणी आंतरराष्ट्रीय क्रिकेट बोर्डाकडे एका भारतीय अधिकाऱ्याने केली आहे. असं जरी असलं तरी या स्पर्धेतील घडलेल्या घटना क्रिकेट या खेळाला काळीमा फासणाऱ्या ठरल्या हेच खरे !

★★★

---

# राशीयातील स्थित्यंतरे

**अजित पुरळकर**

द्वितीय वर्ष कला

क्रांतीकारक सामाजिक शक्ती, क्रांतीचा इतिहासक्रम आणि क्रांतीचा आशय याबाबतीत मार्क्सवादी विचाराने प्रेरित होऊन रशियातील बोल्शेविक क्रांतीचा झुंजार नेता व सोविएत सत्तेचा संस्थापक व्लादिमीर इलियच लेनिन आणि समाजातील सर्जन शक्तींना मोकळ्या वाटा करुन देऊन ज्या थरातील होतकरु मुलांना जीवनात फार मोठी आशा नव्हती. त्यांच्या मनाची क्षितीजे अफाट वाटावीत इतकी रुंद करुन आपल्या पराक्रमी पुरुषार्थाच्या बळावर रशियाचा कायापालट करणारा, समाजवादी तत्वांवर बलशाली राष्ट्राची उभारणी करणारा रशियाचा लोहपुरुष जोसेफ स्टॅलिन.

सोविएत संघराज्याच्या इतिहासाला आधुनिक जगात आगळेच महत्व प्राप्त झाले होते. मागासलेल्या झारकालीन रशियाचे अल्पावधीतच एका उद्योगप्रधान व प्रगत राष्ट्रात परिवर्तन घडवून आणणारे व नाझी भस्मासुराचे कंबरडे मोडून जगाला त्या संकटातून मुक्त करण्यात सर्वाधिक मौलाची कामगिरी बजावलेले राष्ट्र म्हणून केवळ नव्हे तर समाजवादी तत्वज्ञानाला प्रत्यक्ष व्यवहारात प्रथमच मूर्त स्वरूप देऊन जागतिक राजकारणात समाजवादाची पायाभरणी करणारे व एक महासत्ताक म्हणून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावणारे राष्ट्र म्हणून सोविएत रशियाचे स्थान महत्वाचे होते. तसेच तंत्रविद्या, अवकाश विज्ञान, क्रीडा अशा अनेक क्षेत्रात हे राष्ट्र आघाडीवर असल्याची साक्ष सत्तर वर्षांचा सोविएत रशियाचा इतिहास देत आहे. सैद्धांतिक मतभेद, त्यातून उद्भवलेले परस्परविरोधी राष्ट्रगट, राजकीय व आर्थिक स्पर्धा आणि कटुता अशा कोणत्याही कारणांकरिता या राष्ट्राच्या इतिहासाकडे दुर्लक्ष करणे उचित होणार नाही.

रशियाच्या इतिहासाची पाने चाळत असताना प्रथम कटाक्ष जातो तो लेनिन, स्टॅलिन आणि ट्रॉटस्की या रशियाच्या स्तंभांकडे. या महान क्रांतीकारकामुळे रशियाची उभारणी महासत्ताक म्हणून झाली.

लेनिनचा जन्म १८७० साली झाला. स्वभावाने दांडगट, खोडकर व स्वच्छंदी असलेल्या लेनिनने वयाच्या १६ व्या वर्षी क्रांतीकारकाचा पेशा अंगीकारला. त्याला कारण होते ते म्हणजे झारचा खून करण्याचा कट केल्याच्या आरोपावरुन त्याचा ज्येष्ठ भाऊ अलेक्झांडरला फाशी दिली गेली. झारच्या जुलमी राजवटीमुळे तारुण्यात पदार्पण करणाऱ्या लेनिनच्या संवेदनशील मनावर ही घटना खोलवर

कोरली गेली. झारशाही ही प्रतिगामी व जुलमी राजसत्ता आहे व ती उलथून टाकणे हे त्याच्या जीवनाचे ध्येय अलेक्झांडरच्या हौतात्म्याने निर्माण केलेल्या प्रचंड भावनात्मक दडपणाखाली आपोआपच तयार झाले होते. स्टॅलिनचा जन्म १८७९ साली झाला. गरिबीच्या खोल दरीत सापडलेला स्टॅलिन लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचा होता. झारशाहीच्या जुलमी राजवटीमुळे त्याने कुमारवयातच रशियन क्रांतीसाठी स्वतःला झोकून दिले.

ट्रॉटस्कीचे खरे नांव लेव देवीदोविच ब्रोन्स्टीन असे होते. युक्रेनमध्ये निकोलेच जिल्ह्यात एका ज्यू शेतकरी कुटुंबात त्याचा जन्म झाला. आर्थिक अडचणींमुळे त्या कुटुंबाचे जीवन साधे, काहीसे असंस्कृत व कष्टप्रद होते. झारशाहीच्या त्रास्यातून त्याने रशियाच्या बांधणीसाठी मार्क्सवादाचा स्विकार करुन क्रांतीकारकाचा पगडा डोक्यावर घेतला.

लेनिन, स्टॅलिन आणि ट्राटस्की हे मार्क्सवादाच्या विचाराने एकत्र आले होते. लेनिनला मार्क्सवादी सिद्धांतामुळे क्रांतीची शास्त्रशुद्ध योजना सापडली होती. झारशाहीविरुद्ध क्रांतीकारकांच्या बैठका, वर्तमानपत्र वगैरे कारणामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. हद्दपारीची शिक्षाही भोगावी लागली होती. क्रांतीकारी संघटना स्थापन करतेवेळी वेगवेगळ्या संदर्भात बदनामी झाली. पैसा उभारण्यासाठी त्यांनी दरोड्यासारखे तंत्रही अवलंबिले होते आणि त्या पैशातून त्यांनी वर्तमानपत्रे प्रसिद्ध केली. याबद्दल त्यांची बदनामी झाली व त्यांनी ती निमूटपणे सहनही केली.

रशियात यशस्वी क्रांती घडवून आणण्यासाठी लष्करी धरतीची गुप्त संघटना आवश्यक होती हे लेनिनने प्रतिपादन केले परंतु क्रांती घडवून आणण्यासाठी कामगारांनी पुढाकार घेतलेला होता. आणि हळूहळू लेनिनच्या अधिपत्याखाली या झारशाहीचा नाश केला. लेनिन शिवाय बोल्शेविक क्रांती झाली नसती तर सोविएत रशिया अस्तित्वात आला नसता. सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीत अशी संघटना बांधण्याचे व तिचे मनोधैर्य कायम टिकविण्याचे सर्व श्रेय लेनिनकडेच जाते. म्हणजेच एका व्यक्तीची इच्छाशक्ती एक राज्य संपादन करण्याइतकी ताकदवान ठरली असे मानणे वावगे ठरणार नाही. सुतळीच्या तोड्यापासून लेनिनला राज्यसत्तेच्या बांधणीस सुरुवात करावी लागली. क्रांतीकारक लेनिनने हळूहळू सर्व विरोधी पक्षांवर बंदी घातली. विरोधी वृत्तपत्रे बंद केली. विरोधकांची कत्तल केली आणि गुप्तहेर खाते अधिक बळकट केले. या गोष्टी मात्र निर्विवाद आहेत.

१९१७ पर्यंतच्या काळात ज्यावेळी सत्ता हाती येण्याची अंधुकशी शक्यताही कोठे दिसत नव्हती त्यावेळी झारशाहीच्या वरवंटाखाली चिरडल्या जाणाऱ्या क्रांतीकारकांच्या वाट्याला येणाऱ्या सर्व हालअपेष्टा, दुःखे व धोके पत्करून झारशाहीच्या पतनाकरिता त्याने केलेले परिश्रम हे त्या निष्ठेचे द्योतक होते. एवढेच नव्हे तर लेनिनच्या मृत्युनंतर स्टॅलिनने आपले उर्वरित जीवन त्याचे गुण, शक्ती, बुद्धी व क्षमता ही सर्व रशियाच्या उन्नतीसाठी व साम्यवादाच्या साफल्यासाठी खर्ची पाडली. अत्यंत मोजक्याच नेत्यांपैकी स्टॅलिन हा एक अग्रगण्य नेता होता. अत्यल्प काळात समाजवादी तत्व प्रणालीच्या आधारावर राष्ट्राची उभारणी करणे व राष्ट्राला संपन्न करून स्वसंरक्षणासाठी सज्ज करणे हे त्याच्या जीवनाचे ध्येय होते. या त्याच्या ध्येयाच्या आड येणाऱ्यांची त्याने कधीही पर्वा केली नाही.

जगातील पहिली समाजवादी क्रांती १९१७ साली रशियामध्ये घडली. त्यात सिंहाचा वाटा होता तो लेनिन आणि स्टॅलिन यांचा. हे ऐतिहासिक सत्य केवळ रशियन नागरिकांनी त्यांचे पुतळे फोडून नष्ट करण्याचा जरी प्रयत्न केला असला तरी रशियाच्या इतिहासाची पाने तशीच चिरंतन राहतील. लेनिन, स्टॅलिनची ऐतिहासिक साक्ष देण्यासाठी लेनिन ही श्रमिकांची व शोषितांची सिंहाची डरकाळी होती. १९१७ साली लेनिनने क्रांती घडवून १९२१ साली सोविएत रशियाची घटना निर्माण करून युरोप व आशियात पसरलेला जगातील सर्वात विशाल बलाढ्य देश निर्माण केला होता व हा देश इतका सुपरपॉवर होता की अमेरिकेचाही थरकाप होत होता.

मात्र गोर्बाचेव्हने या सुपरपॉवरला सुरुंग लावून त्याचे तुकडे करून फेकून दिले. हे रशियाच्या दृष्टीकोनातून नक्कीच घातक आहे तर अमेरिकेच्या दृष्टीकोनातून मात्र हे विधायक म्हणावे लागेल. जगातील सर्वात यशस्वी युद्धनेता असे मार्शल स्टॅलिनचे एकमुखाने नाव घेतले जाते. स्टॅलिनने हजारो माणसे मारली. याचा गहजब जगाने केला असला तरी हिटलरने केलेली ज्यू लोकांची अमानुष हत्या, रुझवेल्टने हिरोशिमा, नागासाकी या जपानी शहरांवर अणुबॉंब टाकून केलेले हीन कृत्य याची जगाचा इतिहास आजही साक्ष देत आहे. दुसऱ्या महायुद्धात स्टॅलिनच्या सैनिक असलेल्या पुत्राला जर्मनीने ताब्यात घेतले व त्या मोबदल्यात जर्मन सेनानी सोडविण्याची अट स्टॅलिनला घातली अन्यथा तुमच्या सैनिक पुत्राला ठार करू असे सांगितले. त्यावेळी स्टॅलिनने जर्मनीला निरोप पाठविला की, "सैनिकाच्या बदल्यात सैनिकच सोडता येईल, सेनानी नव्हे." त्यानंतर जर्मनांनी स्टॅलिनच्या पुत्राला ठार केले. अशा या देशप्रेमी क्रांतीकारकांचे देशप्रेम शब्दात सांगणे म्हणजे जमीनीवरुनच आकाशाला हात लावण्याचा प्रयत्न केल्यासारखे होईल. स्टलिन हा जरी हुकूमशहा असला तरी तो केवळ राष्ट्राच्या ध्येयासाठी जगत होता व इतरांना जगवत होता. कित्येकांना ठारही करत होता. जणू काय त्याने सोविएत रशियाच्या उद्धारासाठीच त्या भूमित जन्म घेतला होता असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

सोविएत राज्य उभारण्यास लेनिन आणि स्टॅलिन यांचा सिंहाचा वाटा होता. हे ऐतिहासिक सत्य आहे. या सत्यासाठी त्यांनी भयंकर गरीबी भोगली होती. क्रांतीयुद्धात एकदा स्टॅलिनचे सैन्य घेरले गेले असता स्टॅलिन घोड्याचे मांस खाऊन लढला होता तो फक्त सोविएत रशियासाठीच.

संपूर्ण जगाला हलवून सोडणारा स्टॅलिन महान नेता, योद्धा असूनही सर्वसामान्य जीवन जगत होता. ही त्यावेळची खरी वस्तुस्थिती होती. असा हा धूर्त, क्रूर माणूस जगातील थोर व बलाढ्य राष्ट्राचे तीस वर्षे नेतृत्व कसा करू शकला हेच खरे रहस्य आहे. क्रांतीनंतर रशियन समाज निस्त्राण झाला होता. म्हणून स्टॅलिनच्या हाती सत्ता आली होती. हे तितकेसे न पटणारे स्पष्टीकरण होऊ शकते. मात्र हे खरे की, पार्टीतल्या राज्यकर्त्या नोकरशाहीला असाच हुकूमशहा हवा होता. अविवेकी धाडस करू शकणारा पण तेवढाच निश्चयी आणि व्यवहारी असा! पक्षाने निमुटपणे व चिकाटीने त्याचे अनुयायित्व केले आणि एकाहून एक मोठे जय पक्षाला मिळवून दिले. म्हणजे एकंदरीत त्यावेळची परिस्थितीच रशियाच्या हुकूमशाहीला पोषक अशी होती.

रशिया हा स्टॅलिनने घडविला आणि आजही त्याचे पिशाच्च सोविएत रशियावर घिरट्या घालीत आहे त्याला दिलेले शिव्याशाप लक्षात घेऊनही असे म्हणावे लागते की आजही रशियाच्या समाजाचे सामाजिक आणि आत्मिक अधिष्ठान स्टॅलिनचेच आहे सारासार विचार करता स्टॅलिन हा सैतान होता जो एका अमूर्त आणि केवळ कल्पनेतच शक्य अशा ध्येयाशी भिष्मप्रतिज्ञेसारखा एकनिष्ठ राहात असताना व्यवहारात मात्र यश ही एकच कसोटी मानीत होता. त्यासाठी त्याने लोकांचे जीवसुद्धा घेतले. एका संपूर्ण राष्ट्राचे ऐहिक, आत्मिक जीवन निपटून काढले. स्टॅलिन हा रशियाला मिळालेला शाप होता की वरदान असा विचार केला तर तो रशियाचा शाप होता पण त्या शापातही वरदान अंतर्भूत होते असे म्हणावे लागेल.

अमेरिकन साम्राज्यशाहीला चोख उत्तर म्हणजे रशिया होता. रशियाच्या एका ध्येयासाठी सारे आयुष्य घालविणारा लेनिन ध्येय सिद्धीस पोहचून, यशस्वी होऊन त्याच्या जीवनाचा शेवट शोकांत ठरला हा दैवदुर्विलास म्हणावा लागेल. आणि आजच्या या रशियाची वाताहात म्हणजे 'ऐतिहासिक शोकांतीकाच' होय.

गोर्बाचेव्ह यांच्या सत्ताच्युतीमुळे सारे जग हादरले. १९१७ सालच्या सोविएत क्रांतीनंतरची ही दुसऱ्या क्रमांकाची घटना. ३१ डिसेंबर १९२२ साली 'सोविएत युनियन' अस्तित्वात आला. त्यानंतर सत्ता बदलत बदलत शेवटी १९८५ साली सोविएत युनियनची सर्व सूत्रे मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या हाती आली. कम्युनिस्ट जगातील दबलेले श्वास खुले करण्यासाठी गोर्बाचेव्ह यांनी अनेक प्रयत्न केले. त्यासाठी त्यांना काही कमवाव लागलं; काही

गमवावं लागलं.

२५ डिसेंबर १९९१ साली गोर्बाचेव्ह ह्यांनी राजीनामा दिल्यानंतर अकरा प्रजासत्ताकांच्या नेत्यांनी नव्या राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या करारावर स्वाक्षऱ्या करून सोविएत युनियनचे अस्तित्व संपुष्टात आणले. सोविएत युनियनची औपचारिक समाप्ती झाली आणि सोविएत युनियनचा लाल ध्वज उतरविला गेला. गोर्बाचेव्हनी सोविएत युनियनमधील सामान्य लोकांना न्याय मिळवून दिला. सामान्य लोकांचे जीवन जखडून टाकणारी व्यवस्था मोडीत काढण्यात आली. लाखो एकर जमीन खाजगी मशागतीसाठी देण्यात आल्यामुळे शेतीची सुधारणा करण्याच्या मार्गातील अडथळा दूर झाला. सहकारी व संयुक्त अशी मालकी कारखानदारीसही मुभा मिळून सरकारीकरणाने जी उत्पादनशक्ती क्षीण झाली होती ती मोकळी झाली. क्रांतीनंतर लष्करावर सर्वात अधिक भर देण्यात आला होता. आणि युद्धानंतर मूलूखगिरीवर क्रांतीच्या प्रसारासाठी युरोप, आफ्रिका अशा खंडात लष्कर धाडण्यात आले. विशिष्ट सिद्धांताच्या नावाखाली हे लष्करी सामर्थ्य संपादन करताना आर्थिक स्थिती खालावली. त्यातच युरोप, अमेरिका आणि जपान यांनी इलेक्ट्रॉनिक्समध्ये प्रचंड प्रगती केल्यामुळे सोविएत युनियन अधिकच मागे पडला. प्रस्थापित व्यवस्थाही टिकणे शक्य नव्हते. मग ती सुधारण्याचे दूरच रशियन गोर्बाचेव्ह यांनी हीं वास्तव परिस्थिती ओळखली. आणि बदल करण्यास विरोध करणाऱ्या अनेक पदाधिकाऱ्यांना तोंड देत असताना देशातच उभारलेल्या या भिंती खाली आणल्या. अमेरिकेशी स्पर्धा करताना सोविएत युनियनची दमछाक झाली. आणि लोकांचे राहणीमान अधिकच घसरले. शेवटी गोर्बाचेव्ह यांनी ही स्पर्धा थांबविली. याचे परिणाम म्हणून पूर्व युरोपात बदल झाले. पण अण्वस्त्रांच्या लढाईचे जे संकट जगापुढे होते तेही क्षीण झाले. युद्धोत्तर काळातील संघर्षाचे वातावरणच गेल्यामुळे सर्व जगाने सुटकेचा सुस्कारा टाकला. याचे सर्व श्रेय गोर्बाचेव्ह यांच्याकडेच जाते. देशांतर्गत मात्र आर्थिक आघाडी त्यांना सावरता आली नाही.

गोर्बाचेव्ह यांनी ज्या व्यक्तीस्वातंत्र्य, घटक राज्य स्वातंत्र्याच्या आणि लोकशाहीच्या मुलभूत सुधारणा घडवून आणल्या त्या कितीही वरकरणी स्वागतार्ह वाटल्या तरी त्यांनी निर्माण केलेल्या समस्येमुळे 'भिक नको पण कुत्रा आवर' अशी सोविएत युनियनची अवस्था झाली. जागतिक शांतता आणि स्थैर्य यांनी गोर्बाचेव्ह यांना इतके झपाटले होते की, त्यांच्यातल्या खाजगी प्रेरणेच्या पुरस्कारामुळे अमेरिकन सम्राज्यवाद्यांशी अत्यंत धक्कादायक अशा तडजोडी करण्याचा सपाटा लावला. त्यांनी त्यांच्या व्यवहारीवादाने जी एकतर्फी शरणागती अमेरिकन साम्राज्यवाद्यांपुढे पत्करली त्याचीच ही काही उदाहरणे- अण्वस्त्रासारख्या मोक्याच्या शस्त्रागारात अमेरिकेकडून अधिक शस्त्रास्त्रे मोडीत काढणे, फ्रान्स आणि ब्रिटन यांच्या अण्वस्त्र शस्त्रास्त्रासंबंधी तसेच अमेरिकेच्या घातकी नाविक क्षेपणास्त्रांविरोधी मूग गिळून राहणे. साम्राज्यशाहीविरोधी साऱ्या जगातील पुरोगामी शक्तिच्या लढ्याकडे पाठ फिरवणे व क्युबाची मदत कमी करणे. इराकी युद्धात अमेरिकेस मदत करून दोस्तीचा घात करणे वगैरे.

गोर्बाचेव्ह यांच्या ह्या अपयशामुळे सार्वत्रिक वैफल्य पसरले. लोकशाही स्वातंत्र्याची परिणती, स्वैराचारी प्रकृतीच्या आक्रमक उठावात झाली. वंशवाद, प्रादेशिकवाद वगैरे गोष्टींमुळे घटकराज्ये फुटीरतावादी शक्तीच्या आहारी गेली आणि तेथेच सोविएत युनियनच्या विघटनाच्या प्रक्रियेची ठिणगी पडली. अर्थात ही प्रक्रिया गोर्बाचेव्ह यांनीच सुरू केली. आणि ती हाताबाहेर जात असल्याचे दिसताच पश्चिम युरोपीय भांडवलशाही देशांकडे सहाय्यासाठी याचना करू लागले. ज्या साम्राज्यवादी शक्तींचा मुकाबला सोविएत युनियनने आजवर केला आणि कम्युनिस्ट राष्ट्रांचे समांतर जग निर्माण केले, त्याच सोविएतवर ही पाळी यावी? इतिहास कशी फसवणूक करतो याचे दुसरे उत्तम उदाहरण असू शकेल काय? याची शंका आल्यावाचून राहात नाही. गोर्बाचेव्ह यांनी अफगाणिस्तान, मध्य अमेरिका, द. आफ्रिका आणि पूर्व जर्मनी अण्वस्त्रयुक्त क्षेपणास्त्र बंदी, अंतराळयुद्ध इत्यादी समस्यांवर अमेरिकन साम्राज्यवाद्यांशी लाजीरवाणी तडजोड केली. स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्याचे जतन आणि संवर्धन यातच मानवाचे सर्वांगीण कल्याण आहे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण त्यासाठी वर्गलढ्याच्या क्रांतीकारक मार्गानेच वर्गविरहीत, शोषणरहित समाजरचना निर्माण करता येईल हे

मार्क्सवादानेच फक्त प्रतिपादन केले आणि सोविएत क्रांतीने मानवतेच्या इतिहासात तिला मूर्त रूप दिले. पण त्यासाठी जबर किंमतही मोजावी लागली. केवळ नितीनियमबद्ध आत्मसंयमानेच मार्क्सच्या मुक्तीचा मार्ग सापडू शकेल. हा आशावाद आजवरच्या समाज परिवर्तनाच्या इतिहासात भाबडा ठरलेला नाही काय?

अशा या सोविएत रशियाचा भारत अत्यंत ऋणी आहे असे मला वाटते. गोवा मुक्त करणे, भारतात जड उद्योगधंदे निर्माण करण्यास मदत करणे, तेल संशोधन, भारत–पाकिस्तान युद्धात नेहमी भारताच्या बाजूने उभे राहाणे, युनोमध्ये भारतविरुद्धच्या अँग्लो अमेरिकनांच्या मतलबी राजकारणाविरुद्ध व्हेटो वापर, 'काश्मिर हा भारताचा भाग आहे' हे साऱ्या जगाला युनोच्या भर सभेत खडसावून सांगणारा रशिया! शिवाय इतर अनेक गोष्टीत सहकार्य करणाऱ्या रशियाला सच्चा भारतीय नागरीक कधीच विसरु शकत नाही.

★★★

# दुर्गाबाईंचे ललित लेखन

**माधवी लोंबर**
बारावी कला

दुर्गाबाई भागवतांच्या ललित लेखनाचा विचार करताना मुख्यत: त्यांचे तीन संग्रह डोळ्यासमोर उभे रहातात. ते म्हणजे 'पैस', 'रुपरंग' आणि 'डूब'. बाईंच्या ललित लेखनात स्थल, काल, व्यक्ती, भावना, इ. चे. यांचे रुपरंग संवेदनशीलतेने टिपलेले दिसतात.

दुर्गाबाईंचे लेखनही साधी सुधी सहज घडलेली गोष्ट नाही. सृष्टी आणि माणूस यांच्यामधल्या संबंधाचा दृढ आणि उत्कट अनुभव घेताना त्यांच्या संवेदनक्षम आणि प्रतिभाशाली मनाचे शब्दातले ते प्रकटीकरण आहे. कमावलेले भाषाबळ आणि तीव्र बुद्धीमत्ता! संपन्न व्यक्तीमत्व आणि तेजस्वी प्रतिभा! समृद्ध संवेदनशीलता व चौफेर व्यासंग! ज्ञानाच्या विशाल आणि उदार हाताचा क्षणक्षणता स्पर्श आत्म्याला झाल्यानंतर जगाचे संदर्भ त्या उजेडात कसे लख्ख दिसतात ते पहावे दुर्गाबाईंच्या लेखनात.

बौद्धिकता आणि भावात्मता यांचे इतके अपूर्व मिश्रण बाईंजवळ आहे की थक्क व्हावे. ज्ञान उत्कट असते, सुंदर असते आणि करुणामयही असते याचा साक्षात्कारासारखा प्रत्यय त्यांचे लिखाण देते. उदा. द्यायचे तर 'रुपरंग' मधली त्यांनी रंगवलेली व्यक्तीचित्रे मानवी कृतीचा आणि हालचालींचा वेध घेणारी उत्सुकता त्यात आहे तीव्र निरीक्षण आहे. माणसाचे उपजत गुण व जीवनाशी तऱ्हेतऱ्हेने झगडत राहण्याची त्यांची प्रवृत्ती, यांच्या बद्दलचे कुतुहल तर आहेच आणि मुख्य म्हणजे माणूसजाती–बद्दलचा जिव्हाळाही आहे. 'रुपरंग' मधील माणसांची चित्रे त्यांच्या सहृदयतेमुळे हृद्य झाली आहेत आणि त्यांच्या शैलीमुळे जिवंत झाली आहेत. माणसाच्या व्यक्तीमत्वाचा गाभा पकडण्याची ताकद जशी त्यांना त्यांच्यामधल्या सहृदय मानवतेने दिली आहे तशी माणसाचे आयुष्य जवळून निरखून बघताना त्यातून जीवनाचा श्वास नेमका धरण्याची ताकद सुद्धा त्यांच्यामधल्या कणखर बुद्धीवादाने दिली आहे.

व्यासंग व प्रतिभा यांचा सुंदर मेळ बाईंच्या बहुतेक लिखाणात आढळतो.
पाऊस झडझडून पडून गेल्यावर सोनेरी ऊन पडावे तसा उत्कट भावात्मतेवर त्यांच्या व्यासंगाचा कोवळा तजेला पसरलेला दिसतो. बाईंनी खूप वाचले आहे. बरेच आपलेसे केले आहे.

'पैस' मधले तर सर्वच लेख अतिसुंदर आहेत. एखादी नदी, एखादे गांव, एखादे नाव, एखादे पुस्तक, एखादा माणूस, परंपरेत, साहित्यात, वर्तमानात, समाजमनात, कसे असते, आणि कसे बदलते, कसे भंगते आणि कसे टिकते याचा थक्क करणारा वेध बाईंना घेता येतो. त्यामुळे त्या लेखांना एकप्रकारचा टिकाऊपणा प्राप्त झाला आहे.

धर्म, शास्त्र आणि साहित्याचे खोल ज्ञान त्यांना आहे. लोकजीवनाचा स्पर्श त्या लिखाणात आहे. निसर्गाचे सूक्ष्म भान त्याना आहे आणि जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण त्या करतात. म्हणूनच धर्माचा शास्त्राशी जो संबंध आहे आणि जो समाजमनाशी संबंध आहे त्याच्या नेमक्या नाड्यांवर बोट ठेवणे बाईंना साधले आहे. शास्त्राचे साहित्याशी नाते काय ? हे उमगले आहे आणि हे सारे अखेर माणसाने निर्माण केले आहे. या जाणिवेतून त्यांच्यात खेळणारे आपलेच रक्त ओळखण्याची दुर्मिळ समज त्यांच्याजवळ आहे. त्यांच्या लेखनातले निसर्ग-माणूस संबंधीचे प्रेरक आणि उत्कट भानसुद्धा दुर्मिळच आहे. 'ऊनपारखी' 'यमुना', 'कालिंदी' 'फुलांचे काव्य' यासारख्या लेखामध्ये ते अगदी स्पष्ट जाणवेलच पण इतर सर्वत्रही या संबंधाचा मोकळा टवटवीतपणा पालवलेला दिसतो.

भाषेचा केवढा तरी प्रांत बाईंनी धुंडाळलेला आहे. संस्कृत – पालीपासून ते थेट इंग्रजी – बंगाली पर्यंत ! त्यामुळे अभिव्यक्तीची एक समृद्ध भूमी त्यांच्यासाठी आपोआप तयार झालेली दिसते आणि म्हणूनच बाईंचे लेखन भावसंपन्न व बौद्धिकतेचा कणखर गाभा असलेले आहे. त्यांच्या लेखनात बंदिस्तपणा नाही, कृत्रिमता नाही.

संस्कृतमधले असोत किंवा लोकबोलीतले, सगळे शब्द बाईंच्या लेखनाच्या ओघात एकमेकांशी मेळ घालत जातात शब्दांचे कोपरे झटकून तिथे एक छानसा दिवा लावणारी बाईंची खास शैली आहे.

★★★

# सुटका

**पुष्पलता इळकर**
बारावी कला

काळचाकुट्ट अंधारात संपूर्ण मुंबानगरी लुप्त झाली होती. आकाशात एकही तारा दिसत नव्हता. रस्त्यावरचे दिवे अंधारावर मात करू शकत नव्हते. वाहनांचे आणि कारखान्यातील यंत्राचे कर्कश आवाज कानावर आदळत होते. ही काळीकुट्ट रात्र संपता संपत नव्हती.

प्रकाशच्या शोधार्थ बाहेर गेलेले विलासराव रात्रीचे दोन वाजले तरी घरी परतले नव्हते. आज एकवीस दिवस झाले होते. त्यांच्या पायाला थार नव्हता. डोळयाला डोळा लागला नव्हता. शांता विमनस्क स्थितीत प्राण कंठाशी आणून त्यांची वाट पहात बसली होती. मामाची आठवण काढून सतत रडून आकांत करणारी छोटी गुड्डी तिच्या मांडीवर झोपली होती. भावाच्या भेटीसाठी शांता आतुर झाली होती. प्रकाशच्या आठवणीने रडून रडून कोरडया पडलेल्या नेत्रांना पुन्हा पाझर फुटला होता. तिच्या डोळयासमोर प्रकाशची गोजीरवाणी मूर्ती नाचत होती.

'आई, आई, मामा आला ग......!' गुड्डी झोपेत बरळली. आणि दचकून जागी झाली. शांताने तिला छातीशी कवटाळले. तिचे पटापट मुके घेतले. तिचा कंठ दाटून आला होता. त्या कोवळया पोरीची समजूत कशी काढावी हे तिला सुचत नव्हते आणि ती स्वतःचीही समजूत काढू शकत नव्हती. आईला रडताना पाहून गुड्डीही हमसून रडू लागली. 'आई पप्पा मामाला घेऊन अजून आले नाहीत? ते केव्हा येणार आहेत?'

शांताने पदराने तिचे डोळे पुशीत म्हटलं 'येतील हं, तू झोप बघू मामा आला ना की मी तुला उठवते.' शांताने पुन्हा एकदा तिचे मुके घेतले आणि तिच्या पाठीवर हात फिरवून तिला झोपवलं. पण स्वतः मात्र आतल्या आत कुढत बसली. प्रकाश शिवाय तिला काही सुचत नव्हते.

प्रकाशने परिस्थितीशी झुंज देऊन मोलमजूरी करून स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. शांतानेही लग्नापूर्वी त्याचे शिक्षण पूर्ण करण्यास हातभार लावला होता. त्याला बी. ए. फर्स्टक्लास मिळाला. पुढचं शिक्षण मनात असूनही त्याला पुरं करता आलं नाही. कारण आईवडील खूप थकल्याने संपूर्ण कुटुंबाच्या चरितार्थाची जबाबदारी त्याच्यावर पडली. आता नोकरी शोधणे त्याला क्रमप्राप्त ठरलं, परंतु वर्ष दोन वर्ष झालीं पण नोकरी काही मिळत नव्हती. मजुरी करुनच तो कुटुंबाची जबाबदारी पार पाडत होता

शांताचे पती विलासराव काही मोठया हुद्याच्या नोकरीला नव्हते. पण ऑफीसमधील अधिकाऱ्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध असल्याने त्यांच्या ओळखीने प्रकाशला भांडूपला एका ऑफीसमध्ये क्लार्कची नोकरी मिळाली.

प्रकाशच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्याच्या जीवनाला दिशा मिळाली होती. त्याच्या आयष्यातले कष्टमय जीवन संपले होते.

मुंबईला येऊन वर्ष झाले. तेथील दगदगीच्या जीवनाशी तो नुकताच कुठे रुळला होता पण नियतीला त्याचे सुख पहावले नाही.

नेहमीप्रमाणे तो त्या दिवशी १० वाजता ऑफीसमध्ये म्हणून गेला तो अद्याप परत आला नव्हता. तो अचानक कुठे बेपत्ता झाला? हे कोडे उलगडत नाही. ज्या ज्या शंका मनात येत होत्या त्याचे निरसन करण्यासाठी विलासराव सारखे

धडपडत होते. त्यासाठी त्यांनी पोलीसांचीही मदत घेतली परंतु त्यांच्या कोणत्याच प्रयत्नांना यश येत नव्हते.

शांताच्या आणि विलासरावांच्या मनाला घोर लागला होता. म्हाताऱ्या आई-वडिलांना काय कळवावे हे तिला सुचत नव्हते. प्रकाश बेपत्ता झाल्याचे कळताच कदाचित त्यांची प्राणज्योत मावळली असती. शांता गुड्डीच्या पाठीवरून हात फिरवून खिन्न मनाने बसली होती. ओठावर येणाऱ्या हुंदक्यांना ती बांध घालत होती. समोरच प्रकाशचा फोटो आपल्याशी हसत आहे असा तिला भास होत होता. ती त्याच्या फोटोकडे एकटक पहात राहिली आणि तिचा डोळा केव्हा लागला हे तिला समजले नाही.

तिला जाग आली तेव्हा सकाळचे सहा वाजले होते. वाऱ्याची गार झुळूक तिला चाटून गेली. काळ्याकुट्ट रात्रीचे राज्य संपत चालले होते. सुर्याच्या कोवळ्या किरणांनी खोली व्यापली होती. गॅलरीतील मोगऱ्याचा मधूर सुगंध तिला सुखावून गेला. रक्षाबंधन असल्याने चहुबाजुंनी मधूर संगीताच्या लहरी तिच्या कानावर आल्या "ये राखी बंधन है ऐसा" हे गाणे तिच्या कानात घुमत होते. का कुणास ठावूक या मंगलमय वातावरणाने तिच्या मनाला अंकुर फुटले. चेहऱ्यावर आशेचे स्मित उमटले होते. रात्रभर बसून पाठीतून येणाऱ्या कळाही तिला जाणवत नव्हत्या.

तिने गुड्डीला मांडीवरून खाली ठेवले आणि वर उठणार इतक्यात कुणीतरी धावत येऊन दारावरची कॉलबेल वाजवली. ती क्षणभर दचकली. विलासराव आले तर ते धावत का येतील हा प्रश्न तीच्या मनात उद्भवला आणि अनामिक भीतीने तिचे अंग शहारले. पण लगेचच तिची पावले दरवाजाकडे वळली आणि तिने दार उघडले आणि एवढे दिवस कोमेजलेल्या चेहऱ्यावर तेज उमटले.

प्रत्यक्ष प्रकाशच तिच्या पुढ्यात उभा होता. ती दोघं दुरावलेली भावंडे एकमेकांच्या कुशीत आली. दोघांचेही हृदय भरून आले. तिने त्याला घाबरून आत घेतले.

प्रकाशला घेऊन आलेला शीख लॉरीड्रायव्हर हे दृष्य पाहून पुरता भारावून गेला. त्याचे डोळे पाणावले. आज रक्षाबंधनाच्या दिवशी आपण दुरावलेल्या भावंडांची भेट घडवून आणली याबद्दल त्याला समाधान वाटत होते.

प्रकाशने त्याला आत येण्याची विनंती केली. पण त्याला तातडीने मुंबईला रवाना व्हायचे असल्याने तो थांबला नाही. जाता जाता तो प्रकाशला म्हणाला, "भाईसाब अब संभालके रहेना, थोडे दिन घुमना फिरना बंद करो. नही तो वो लोग तुम्हें फिरसे किडनॅप करेंगे" आणि 'अच्छा दीदी, अच्छा प्रकाशभाय मै चलता हूँ' असं म्हणत तो जायला निघाला. या इसमामुळे आपला भाऊ आपल्याला परत मिळाला हे कळताच शांताने त्याचे पाय धरले. त्याचे उपकार कसे मानावे हे तिला कळेना.

शांताला त्याने वर उठवले आणि म्हणाला 'बेहेनजी मेरे क्यू पाँव छुती हो। ये सब उपरवाले की कृपा से हुआ है। जो चाहता है वैसाही होता है। और हाँ, अब इसका खयाल रखना, मै चलता हूं।' असे म्हणत दोघांचाही निरोप घेऊन तो निघाला. शांता व प्रकाश दोघंही त्याला जिन्यापर्यंत पोचवायला गेली आणि दृष्टीच्या आड होईपर्यंत त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहिली.

एक लॉरीवाला आपल्या जिवाशी खेळला आणि दुसऱ्याने आपल्याला जिवदान दिले याचे त्याला कुतूहल वाटत होते.

त्या दिवशी ऑफिसमधून घरी परतण्यासाठी प्रकाश बस स्टॉपकडे चालला असता एका लॉरिवाल्याने त्याच्या बाजूला लॉरी थांबवली आणि आतील दोन इसमानी त्याला पेट्रोल पंप कुठे आहे असे विचारले तो त्यांना सांगत सांगतच नकळत त्यांच्या लॉरीत बसला. तो लॉरीत बसला एवढेच त्याला कळले, पुढे काय झाले ते मात्र त्याला समजले नाही.

ते इसम त्याला मुंबईपासून खूप दूर हैदराबादला घेऊन गेले. तेथे दाट जंगलात एका घरात त्याला कोंडून ठेवले. त्याच्यावर पहारा करण्यासाठी सतत एक पहारेकरी कार्यरत होता. रोज सकाळी तो त्याला टॉयलेटला बाहेर आणीत असे आणि पुन्हा

आत कोंडून ठेवी. दुपारी आणि रात्री त्याला खायला तो ब्रेड आणून देई.

वीस दिवस हा असाच क्रम चालला होता १६ व्या दिवसापासून त्याची गुंगी कमी होत चालली. आपल्याला किडनॅप केलं आहे हे त्याला कळून चुकले पण तो काहीच करू शकत नव्हता. आपण कुठे आहोत हेही त्याला समजत नव्हते. मरणाच्या भितीने त्याचा जीव गुदमरला होता.

विसाव्या दिवशी रात्री तो पहारेकरी त्याला खायला ब्रेड देवून गेला आणि अनवधानाने दरवाजाला कडी लावायला विसरला.

बाहेर कुणीतरी दोन व्यक्ती आपआपसात बोलत होत्या त्यांच्या बोलण्यावरून प्रकाशला कळले की ते लोक त्याला नव्वद हजार रुपयांना विकणार होते. आणि दुसऱ्याच दिवशी त्याला तेथून हलविण्यात येणार होते.

प्रकाशने हे ऐकताच मरणाच्या भितीने त्याचे अंग शहारले. त्याला एका जागेवर बसता येईना. तो खोलीतल्या खोलीत येरझाऱ्या घालू लागला. तो दरवाज्याकडे आला आणि त्याने आळस देण्यासाठी हात वर केला तोच त्याचा कोपर लागून दरवाजा किंचित उघडला. तो एकदम दचकला त्याने दाराच्या फटीतून बाहेर डोकावून पाहिले. त्याला बाहेर कुणीच दिसले नाही. पहारेकरी दरवाजा बंद करण्यास विसरला आहे हे त्याच्या लक्षात आले. आपल्या सुटकेसाठी हा क्षण अत्यंत मौल्यवान आहे असा विचार करून त्याने आपले सर्व धैर्य एकवटले. तो खोलीच्या बाहेर आला आणि दरवाजा बंद केला. एकवार त्या अंधारात त्याने सभोवती एक दृष्टीक्षेप टाकला. दूरवर एक दिवा मिणमिणता त्याला दिसला. आणि त्या दिव्याच्या रोखाने तो अंधारातून वाट काढत जिवाच्या आकांताने धावू लागला.

जवळजवळ दोन तासांनी तो मेनरोडवर येवून पोहोचला मध्यरात्र असल्याने रस्त्यावर वाहनांची वर्दळ कमी होती. दोन-तीन गाड्यांना त्याने हात दाखवून थांबवण्याचा इशारा केला पण ती भरवेगाने अंधारात नाहीशी झाली. आता काय करावे हे त्याला कळत नव्हते तेवढ्यात एक लॉरी येताना त्याने पाहिली. आपल्याला पळवून आणले तोच लॉरीवाला नसेल ना? अशी शंका त्याला आली तो भितीने थरथरू लागला.

एवढ्यात मध्यरात्री या निर्जन ठिकाणी कोण उभा आहे याची चौकशी करण्यासाठी त्या लॉरीवाल्याने लॉरी थांबवली. प्रकाशला क्षणभर आपल्या पाया-खालची जमीन सरकल्यासारखा भास झाला. तो अधिकच गर्भगळीत झाला.

तो ड्रायव्हर खाली उतरला आणि त्याने आस्थेने प्रकाशची चौकशी केली. त्याला अतिशय घाबरलेला पाहून ड्रायव्हरने त्याला विश्वासात घेतले आणि काय घडले हे जाणून घेतले. प्रकाशकडून सर्व हकीकत कळताच त्याच्या हृदयाला पाझर फुटला. तो मुंबईलाच चालला होता. प्रकाशला त्याच्या खोलीवर सोडण्याचे त्याने कबूल केले आणि त्याच्या उपकारामुळेच प्रकाश घरी आला.

शांता आणि प्रकाश बोलत बोलत खोलीत आले. मामाचा शब्द कानात पडताच गुड्डी झोपेतून ताडकन जागी झाली आणि धावतच प्रकाशकडे गेली. त्याने तिला उचलून घेतले आणि तिच्या गालाचा छान पापा घेतला. गुड्डीने लागलीच त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली.

'मामा, तू आम्हाला सोडून एवढे दिवस कुठे छानपैकी फिरून आलास? घरात सांगितल्या शिवाय कधी फिरायला जातात का? थांब आता पप्पा येवू देत मग तुला मारायलाच सांगते' प्रकाश काही न बोलता फक्त हसत होता. तिला काय सांगावे हे त्याला कळेना. 'पप्पा आले पप्पा आले. आता पप्पा मारणार' असं म्हणत गुड्डी प्रकाशच्या अंगावरून खाली उतरली आणि विलासरावांच्या पायाला विळखा घातला. 'पप्पा, आपला मामा घरी आला' असे ती सांगू लागली.

प्रकाशला पाहताच विलासरावांचा जीव भांड्यात पडला. पर्णहीन वृक्षाला पुन्हा पालवी आली होती.

सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. शांताने रक्षाबंधनाचा सोहळा अगदी उत्साहाने पार पाडला.

प्रकाशला मुंबईत राहणे धोक्याचे वाटू लागले. ते दुष्ट लोक आपल्यावर पाळत ठेवून पुन्हा किडनॅप करतील अशी भिती त्याला वाटत होती. मुंबई सोडायची म्हटल्यावर त्याला नोकरीवरही पाणी सोडावे लागणार होते. पण जिवापेक्षा त्याला नोकरीची पर्वा वाटली नाही. त्याने गावाला जायचे ठरवले. आपण पुन्हा दारिद्र्याच्या दरीत लोटले जाणार म्हणून त्याला दुःख होत होते. पण त्याने निश्चय केला. मोलमजूरी करून नुसतं पोटार्थी जीवन जगायचे नाही.

आपले शिक्षण झाले आहे. स्वकर्तृत्वाने आपले जीवन सुखी करायचे ही खुणगाठ बांधून चार दिवसांनी त्याने मुंबई सोडली.

★★★

# संगीत सम्राट – पंडित कुमार गंधर्व

**प्रमोद कोयंडे**

तृतीय वर्ष कला

संगीत क्षेत्रातील सम्राट, ख्यातनाम संगीततज्ज्ञ व आपले संपूर्ण जीवन संगीतमय करून टाकणारे 'पंडित कुमार गंधर्व' यांची जीवनज्योत १२ जानेवारी १९९२ रोजी मालवली. जसा पवन यावा, दिव्यातील ज्योत विझावी त्याप्रमाणे त्यांची जीवनज्योत विझून गेली आणि संगीत क्षेत्रातील महान कीर्ती तेवढी चिरंतन टिकून राहिली आहे. संगीतातील सूर आणि स्वर मुके झाले आहेत. स्वतंत्र गायकीने तळपणारा तारा निखळला आणि त्यांच्या जागी एक मोठी पोकळी निर्माण झाली. ही पोकळी भरून निघण्यासारखी नाही.

'माझ्या आयुष्यात मी समाधानी नाही. खऱ्या कलाकारानं समाधानी असूच नये. आजपर्यन्त मी बरीच वाटचाल केली. पण, अजूनही खूप काही करायचं आहे बरीच वाटचाल करायची आहे. आणि माझ्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मी कलेची सेवा करीतच राहाणार आहे.....' अशा प्रकारचे उद्‌गार पंडित कुमार गंधर्व यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या कांही दिवसात काढले. त्यांच्या जागी आत्मविश्वास काठोकाठ भरलेला होता आणि त्याच आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत कलेची सेवा केली. कोणताही कलावंत पूर्णत्वापर्यंत कधीच पोहचत नाही हे त्यांना चांगले माहीत होते. ते एके ठिकाणी बोलताना सांगतात की, 'अहो, ज्ञानसाधना कधीच संपत नाही. आयुष्य पुढेपुढे जात असते, तशी ज्ञानसाधना वाढत असते. जीवनात सतत पुढे जावे लागते.' या त्यांच्या उद्‌गारावरून आपल्याला कळते की, त्यांनी आयुष्यभर ज्ञानसाधना करून संगीतात अनेक तऱ्हेची परिवर्तने घडवून आणली व नवनिर्मिती केली.

अशा या थोर सर्जनशील संगीतकार व समर्थ गायकाचा जन्म सुलेभावी (जि. बेळगांव) येथे ८ एप्रिल १९२४ रोजी झाला. गायकाच्याच पोटी जन्मलेल्या कुमारांची बालवयातच संगीताशी जवळीक निर्माण झाली. कुमारांचे वडील कर्नाटकातील सुलेभाव गावच्या मंदिराचे पुजारी होते. त्यामुळे

बालपणापासूनच शास्त्रीय संगीताप्रमाणे भजनांची आवड कुमारांना लागली. कुमार गंधर्व यांचे खरे नाव शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकाली असे होते. त्यांनी वयाच्या सहाव्या वर्षी गायला सुरुवात केली. त्यामुळे गुरुकल्ल मठाच्या स्वामींनी त्यांना वयाच्या सातव्या वर्षी 'कुमार गंधर्व' ही पदवी बहाल केली.

कुमार गंधर्वांनी १९३६ पासून अकरा वर्षे ना. र. देवधर यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. देवधरांप्रमाणेच अंजनीबाई मालपेकर यांच्यासारख्या तज्ञ गुरुची साथ त्यांना लाभली. प्रा. देवधरांच्या 'देवधर स्कूल ऑफ इंडियन म्युझिक' मध्ये त्यांनी प्रवेश घेतला व संगीताचे अनेक धडे घेतले.

१९४७ मध्ये कुमारांचा विवाह झाला. त्यानंतर त्यांना क्षयाचा आजार जडला. तरीही ते सतत गात राहिले. १९४७ पासूनच मध्यप्रदेशातील 'देवास' येथे त्यांचे वास्तव्य होते. तेथेच त्यांचे संपूर्ण आयुष्य गेले.

मध्यप्रदेश सरकारने त्यांना 'कालिदास' हा सन्मान देऊन गौरव केला. शास्त्रीय संगीतातील त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा हा गौरव करण्यात आला होता.

कुमार गंधर्व यांनी माळवा भागातील लोकसंगीताचा सखोल अभ्यास केला. यातूनच नंतर 'अनुपराग विलास' हा ग्रंथ त्यांनी तयार केला. हिंदुस्तानी संगीतातील ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर, पतियाळा आणि किराणा या नामांकित व जगद्विख्यात घराण्याच्या 'पंचका' ची बांधिलकी जुगारून कुमारांनी स्वतःची स्वतंत्र शैली संगीत क्षेत्रात रुजवली. 'अनुपराग बिलासात' कुमारांनी १३६ बंदिशी बांधल्या, त्यातील १७ स्वतः कुमारांच्या आहेत. १९६५ मधील द्रुत, विलंबित, तीनताल या परंपरागत ख्याल गायकीबरोबरच कुमारांनी 'मध्यालय' रसिकात रुजविली.

संत कबीर, तुलसीदास आणि सूरदास यांचे दोहे गाण्यासाठी ते विशेष प्रसिद्ध होते. माळवा प्रांतातील विविध बोली भाषातील रचना त्यांनी गायल्या. एका कडव्यामध्ये सर्व शब्द वापरून शास्त्रीय संगीत गायनाची नवीन प्रणाली त्यांनी सुरु केली.

'सहेली', 'तोडी', 'मालवती', लग्नगंधर्व, या त्यांच्या स्वतःच्या शास्त्रीय संगीतातील रागरचना आहेत.

१९५९ मध्ये कुमार गंधर्व यानी 'कुमार संगीत अकादमी' ची स्थापना केली. शास्त्रीय संगीत गायनातील त्यांच्या अद्वीतीय कामगिरीबद्दल उज्जैनच्या विक्रम विद्यापीठाने, तसेच अखिल भारतीय गंधर्व विद्यापीठ मंडळाने त्यांना संगीतातील सन्माननीय 'डी. लिट.' ही पदवी अर्पण केली होती.

१९३६ मध्ये कुमार गंधर्व यांनी 'घन गरजने आये', 'गीतवर्षा' ह्या संगीत कार्यक्रमांचे आयोजन केले. १९६७ मध्ये 'त्रिवेणी' 'कबीर, सूरदास आणि संत मीराबाई यांच्या पदाचे विशिष्ट संयोजन त्यांनी केले. १९६८ मध्ये 'मला उमजलेले बालगंधर्व' द्वारे नटसम्राट बालगंधर्व यांना कुमार गंधर्वांनी श्रद्धांजली वाहिली.

१९६८ मध्ये 'गीत हेमंत,' १९६९ मध्ये 'ठुमरी टप्पा तराणा', १९७० मध्ये 'मालवा की लोकधुनें,' १९७१ मध्ये 'गीतवसंत,' तर १९७३ मध्ये कवी भा. रा. तांबे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'तांबे गीत रजनी', त्याच वर्षी 'तुलसी एक दर्शन' १९७६ मध्ये 'वसंतगीतांचे संयोजन,' 'राम दर्शनमाला'– 'राग गौडमल्हार दर्शन,' 'तुकाराम एक दर्शन' हे संगीत कार्यक्रम कुमार गंधर्व यांनी केले. संगीत क्षेत्रातील ह्या त्यांच्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक पदव्या त्यांना बहाल करण्यात आल्या.

भारत सरकारने 'पद्मविभूषण' हा किताब देऊन कुमार गंधर्व यांचा सत्कार केला. या सर्व मानसन्मानावरुन आपल्याला त्यांच्या संगीतातील कार्यांची व्याप्ती किती मोठी होती हे कळून येते.
'मी सतत पुढं पुढंच चालत राहतो. मागे बघणे माझ्या स्वभावात नाही.' अशा मोजक्या शब्दात त्यांनी आपल्या जीवनाचं आणि संगीत साधनेचं सार सांगितलं आहे असं म्हणावं लागेल.
मैफली गाजविणारा गवई, संगीताचा शास्त्रज्ञ, नवनिर्मितीची प्रचंड क्षमता असलेला संगीतकार, काव्यरचना करणारा भावकवी असे चतुरस्त्र कार्य

करणारे पंडित कुमारजी हे गेल्या अर्धशतकातले एकमेव संगीतकार आहेत. एवढं प्रचंड कार्य कोणाही संगीतकाराने केलेलं नाही ही वस्तुस्थिती आहे.

पंडित कुमार गंधर्व यांचे संपूर्ण आयुष्य हाच मोठा चमत्कार होता. त्यांच्या संपूर्ण जीवनात इतकी विलक्षण वळणं, आडवाटा आल्या की, त्याही बाबतीत ते अपवादात्मक ठरले. पण सर्व अडथळे, वळणं मोठ्या आत्मविश्वासानं पार करुन त्यांनी आपलं ईप्सित साध्य केलं आणि संगीत कलेला श्रीमंत केलं.

पंडित कुमारजी हे भारतात चालत आलेल्या घराणेशाही गायकीच्या विरुद्ध होते. म्हणूनच ते त्या वर्तुळातून बाहेर पडले. प्रचंड मेहनत, अभ्यास, व्यासंग व मनन-चिंतन करुन संगीत कलेचा मुलभूत अभ्यास करुन अत्यंत वैभवसंपन्न दिमाखदार अशी नवीन गायनशैली जी 'भाववादी सौंदर्यपूर्ण' शैली म्हणून ओळखली जाते ती रसिकांना दिली. ही देणगी म्हणजे संगीतकला व कलाप्रेमी यांना दिलेला अनुपम नजराणा आहे.

कोणतीही कला ही परिवर्तनशील, काळानुसार बदलणारी असेल तरच तीत जिवंतपणा राहतो नाहीतर ती निरस किंवा जुनाट होऊन मागे पडते. याची जाणीव पंडित कुमारांना होती आणि म्हणूनच प्रगल्भ अशा प्रतिभेतून झेपावून आली ती 'कुमार गंधर्व गायकी.' त्यांची प्रतिभा इतकी उत्तुंग होती की, परंपरागत गायकीतला तोचतोचपणा, घराण्याची बंधनं ह्या चौकटीतून ते बाहेर पडले. या चौकटीच्या बाहेर खूप काहीतरी आहे याचं आत्मज्ञान त्यांना झाले. त्यांनी बाहेरच्या विश्वात झेप घेतली व ही त्यांची झेप यशस्वी झाली. त्यामुळेच संगीतात एक नवे पर्व निर्माण झाले. या सर्व कार्यामुळे त्यांना 'बंडखोर गवई' म्हणून नावाजलं व हिणवलं गेलं. पण पंडित कुमारजी धीरगंभीर होते. त्यांना माहीत होते की, आपल्या ह्या नवीन बदलाचा परिणाम होणारच, तथापि 'स्काय इज दि लिमिट' असा प्रचंड आवाका असलेल्या संगीत कलेत नवेनवे प्रयोग व्हायला हवेत तरच ते खऱ्या अर्थाने समृद्ध होईल अशी त्यांची ठाम धारणा होती. आणि याच नवनिर्मितीच्या ध्यासातून त्यांनी रसिकांसमोर अनेक कार्यक्रम सादर केले.

सर्वावर शिरपेच ठरावा असा १३६ बंदिशी समाविष्ट असलेला महान ग्रंथ 'अनुपराग विलास' ह्या ग्रंथाची निर्मिती ही खऱ्या अर्थाने क्रिएटीव्हिटी आहे. ती स्वनिर्मित आहे, संपादन नव्हे. या गृहस्थानं केलेलं हे कार्य खरोखरच महान आहे किंबहुना तुलनाही करता येणे असंभव.

प्रा. बी. आर. देवधर, मिरज; यांच्याकडे ग्वाल्हेर घराण्याचं शास्त्रशुद्ध शिक्षण घेणारे कुमारजी अगदी लहान वयात मोठमोठ्या गवयांच्या हुबेहूब नकला करायचे त्यामुळे अनेकांनी 'संगीतातला चमत्कार,' 'संगीतातला मजेदार कूट प्रश्न,' 'संगीतातील एक उद्‌गार चिन्ह,' संगीतातील एक प्रश्न चिन्ह' अशी विशेषणे देऊन त्यांच्या बद्दल गौरवोद्‌गार काढले.

कुमारजींना ऐन उमेदीच्या वयात क्षयासारखा असाध्य रोग जडला, या रोगावर त्याकाळी प्रभावी औषधाची व्यवस्था नव्हती. त्यामुळे माळव्याच्या देवास गावी त्यांना अज्ञातवासात राहावे लागले. पण वाईटातूनच चांगलं निघतं ह्या न्यायाने तो अज्ञातवास कुमारजींना लाभदायक ठरला. फुप्फुस निकामी झाले असले तरी ते गाऊ शकत होते. आजाराच्या या कालावधीत त्यांनी संगीताचं अखंड मनन व चिंतन करुन माळव्यातील असंख्य लोकगीते ऐकून त्यातून अतिशय मोहक व सौंदर्यपूर्ण अशी नवीन संगीतशैली निर्माण केली. माळवा देवास या गावांना त्यांच्या आयुष्यात फार महत्वाचे स्थान आहे. कोणतीही नवीन गोष्ट लोक सहजासहजी मान्य करीत नाहीत, विशेषत: परंपरा व रुढी यांना जुगारून केलेली नवीन कृती तर लोक सहजासहजी पचवून घेत नाहीत. अशा परिस्थितीत कुमारजींच्या गायनशैलीवर जाणकार रसिक, शास्त्रज्ञ यांनी कडाडून टीका केली, पण एकेकाळचे टीकाकार हेच आज त्यांचे चाहते आहेत. यातच कुमारजींच्या शैलीचं श्रेष्ठत्व आहे.

लौकिक अर्थाने सर्व मानसन्मान, अ‍ॅवॉर्ड, पुरस्कार पंडितजींना लोकांकडून मिळाले, त्यांची वादग्रस्त

गायनशैली विद्वानांनी स्विकारली. चालू पिढीचे गायक-गायिका कुमारजींचे अनुकरण करण्यात धन्यता मानतात. यश म्हणतात ते यापेक्षा काय वेगळं असतं ! त्या अर्थाने त्यांचे जीवन कृतार्थ झालं असेच म्हणने योग्य होईल.

कुमारजींनी केलेल्या अनेक रचनांबरोबर त्यांची पुढील रचना आपल्याला गुणगुणाविशी वाटते–

सब सुर साधे जब भयो पार
मिल नर नारी तब कर गान
सुरलय साथ करो दोऊ एक ।
तरो सूर–सिंधु जब भयो पार ।।
शोक तज आज सूरतसी नाम ।
करो रट नाम करे तब पार ।।

अभिजात संगीताला सर्वस्व अर्पण केलेले कुमारजी वागण्या–बोलण्यात खानदानी; दिलदार होते. त्यांच्या गप्पांची बैठक म्हणजे गाण्याच्या मैफलीसारखीच रंगतदार असे. अत्यंत चपळ तान असलेले व अतिशय गोड व मधूर कंठ लाभलेले कुमारजी म्हणजे एक मनस्वी कलावंत होते.

शोधक वृत्तीचा हा बुद्धीमान कलावंत परंपरेच्या खोड्यात अडकला नाही. रागदारी संगीताच्या मर्यादेतही बद्ध झाला नाही. स्वरांच्या प्रदेशात मुलुखगिरी करताना, वैविध्याची ओढ असलेल्या कुमारांनी 'आज अचानक गाठ पडे', 'अजुनि रुसुनी आो', 'कोणा कशी कळावी वेडात काय गोडी', 'ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी' या भावगीतांनाही आपला अस्सल स्वर दिला. भजनानाही त्यांनी आपल्या स्वरसंपदेत मानाचं स्थान दिलं. ओबडधोबड संगीताला आपल्या परीसस्पर्शानं त्यांनी प्रतिष्ठा दिली.

अशा या थोर माणसाबद्दल व जीवनात यशस्वी ठरलेल्या संगीतातील महान सम्राटाबाबत अनेक नेत्यांनी, लेखकांनी व इतर सामान्य जनांनी अनेक भावपूर्ण दुःखोद्गार काढले. खरोखरच 'कुमार गंधर्व यांचे निधन म्हणजे एका असामान्य सृजनशील गायकीचा अस्त आहे.'

अशा या नश्वर जगात संगीत नभांगणातील हा तेजस्वी तारा देहरूपाने निखळून पडला असला तरी त्यांनी संगीतात केलेले कार्य व एक दर्जेदार गायक म्हणून असलेलं संगीत क्षेत्रातील त्यांचं स्थान ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ आणि अमर आहे.

अशा या थोर माणसाचे नांव संगीताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनीच नोंदवावं लागेल.

★★★



# मिळेल का ती आजी !

**शैलेश राऊळ**

बारावी वाणिज्य

'ये ग गाई गोठ्यात
बाळाला दूध दे वाटीत
बाळाची वाटी मांजर चाटी ........'

असं म्हणत रडणाऱ्या सोनुल्याला क्षणातच हसायला लावणारी ती आजी. पण आज स्त्रीचेच स्वरुप अंतर्बाह्य इतके बदलले आहे की आजीतर कशी पूर्वीचीच राहील? आज आजी दिसते ती समाजकार्य करणारी, पत्ते खेळत वेळ काढणारी, संध्याकाळी फिरायला जाणारी, दूरदर्शनचे कार्यक्रम नियमीतपणे पाहणारी आणि महिला मंडळाच्या विविध सहलींचे आयोजन करणारी. आजी प्रगतीशील असली तरी ती शुभंकरोती शिकवत नाही, ओव्या, अभंग उखाणे, जुनी गाणी म्हणत नसल्याने या आजीविषयी दुरावाच वाटतो.

म्हणतात की, घरातील वृद्धव्यक्ती म्हणजे कुटुंबाचा एक महत्वाचा घटक असतो. निष्ठा, रितीभाती आचार-विचार, अनुभवाचे बोल यांचा आजीकडे असणारा साठा पाहता ती एका शिक्षकाचीच भूमिका पार पाडत असते. आज ही संपत्ती नातवंडांच्या वाट्याला न येण्याचे कारण म्हणजे बाबांच्या आईशी-आईचे पटतच नाही. सतत भांडणे नाहीतर धुसफूस.

पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी वाघ, सिंहासारख्या प्राण्यांना मारण्याची बंदी आहे. कारण त्यांची जात पृथ्वीवरुन नाहीशी होईल अशी भीती वाटते. आजोच्या बाबतीत असे काही ठरवता येणार नाही का? नातवाला दुधावरची साय म्हणणारी आजी त्याचा केवढा मोठा गौरव करते. हे गौरवोद्गार आता कोण काढणार!

नातवाच्या जीवनाला परिपूर्णता मिळवून देणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे आजी, नातवाच्या यशाने सर्वात प्रथम फुलून येणारी ती आजीच. प्रेमाचा मधूर स्पर्श करणारी ती केवळ आजीच. या आजीचा रुपेही अनेक. घरात कुणाला खोकला; शिंक जरी आली तरी ती अस्वस्थ होईल आणि लगेच आपल्या बटव्यातील मात्रा दुधात उगाळून देईल. गोष्टी सांगताना तर आजीचे कथनकौशल्य खऱ्या अर्थाने जाणवते. तिची गोष्ट सांगण्याची पद्धत, सर्वांना त्यात गुंतवून ठेवण्याचे कौशल्य, कथानकात रंग भरण्याची हातोटी तर अप्रतीम! 'आणि मग...काय झालं माहितंय, मग तिकडून आला वाघ, आणि मग......?' असं म्हणून जेव्हा आजी वातावरण निर्मिती करेल तेव्हा खरेच कुठल्यातरी जंगलात एखाद्या वाघाच्या तावडीत आपणच सापडलेलो आहोत असे वाटून सगळी नातवंड आजीजवळ सरकतील. परिकथा सांगताना त्या उमद्या राजपुत्राचे तिने केलेले वर्णन, परिराणीचे सौंदर्य ऐकून तर नातवंड इतकी गुंग होऊन जातील की, क्षणभर आपणच त्या अबलख घोड्यावर स्वार झालो आहोत असे त्यांना न वाटले तरच नवल. बिरबलाच्या गोष्टींचा जसा आजीकडे खूप साठा तसेच इसापनीतीच्या कथांनाही तोटा नाही. रामायण महाभारत सांगताना आजीच्या रसाळ आणि मधाळ शब्दांनी कधीच संस्कार केलेले असतात.

आज काळाच्या बदलाप्रमाणे कुटुंबाचे स्वरुप बदलले आहे विभक्त कुटुंबपद्धतीत नोकरी करणारे आईवडील, पाळणाघरात कोंडलेली मुले, त्यागाची नष्ट झालेली भावना, यात आजीला घरात जागाच नाही. वृद्धाश्रम तिच्यावर लादला गेलाय. पण घरातील प्रत्येक गोष्ट ओळखीची असणाऱ्या आजीला वृद्धाश्रम मानवेल का? मुलांच्या भविष्याची चिंता वाहणाऱ्या

पालकांना, आजीपासून दुरावणाऱ्या मुलांच्यात आपण फार मोठी पोकळी निर्माण करत आहोत हे समजेल का? रडणाऱ्या सोनुल्याला शांत करण्यासाठी घराघरातून पुन्हा हे ऐकू येईल का–

ये ग गाई गोठ्यात..........

★ ★ ★

---

# सुधारकांचे अग्रदूत लोकहितवादी

**संजय कोळंबकर**

द्वितीय वर्ष कला

पेशवाईची इतिश्री होऊन इ. स. १८१८ मध्ये शनिवार वाड्यावर इंग्रजी राज्याचे निशाण फडकू लागले. मराठ्यांच्या पराभवानंतर साऱ्या भारतावर इंग्रजांचा अंमल चालू झाला. तत्कालीन भारतीय समाज अंध:श्रद्धा आणि दुष्ट रुढीत गुरफटलेला होता. एकूण ह्या समाजात एकीचा आत्यंतिक आळस, औदासिन्य, अज्ञान, सामाजिक आणि राष्ट्रीय दृष्टीचा अभाव दिसत होता. 'ठेविले अनंते तैसेची राहावे' अशी एकूण सर्वसामान्य जनतेची मनोवृत्ती झाली होती. अशा या सुस्त होवून पडलेल्या समाजाला पराणी टोचून उठविण्याचे महान कार्य ज्या युगपुरुषांनी केले त्यात लोकहितवादींचा सिंहाचा वाटा आहे.

लोकहितवादी–गोपाळ हरी देशमुख यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८२३ मध्ये पुणे येथे झाला. पुण्यातच त्यांचे शिक्षणही झाले. विद्यार्थी दशेत इंग्रजी व इतिहास या विषयात त्यांनी उत्तम प्राविण्य मिळवले. शालेय शिक्षण १८४४ मध्ये संपले. लोकहितवादींनी संतवाङ्मयाचा आणि जुन्या मराठी साहित्याचा उत्तम परिचय करुन घेतला. साहित्याच्या वाचनातून त्यांची जीवन जाणीव प्रगल्भ झाली. संतकाव्याने त्यांच्या मनावर मानवतावादी विचारांचा प्रभाव पडला. व्यापक दृष्टी मिळाल्यावर लोकजीवनाचे निरीक्षण केल्यानंतर लोकजागृतीची ललकारी मारल्याशिवाय गत्यंतर नाही, हे त्यांनी जाणले. शालेय वयातच त्यांना जे जग दिसले त्यामुळे ते अस्वस्थ झाले. पाश्चात्य विद्येने त्यांना शोधक दृष्टी दिली या समाज अभ्यासकाला असे वाटू लागले की, लोकांची उदासिनता, अज्ञान दूर करुन त्यांना आपल्या स्थितीगतीची जाणीव करुन दिल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारणार नाही. त्यानंतर त्यांनी लोकहितवादी हे नाव धारण करुन समाजाच्या उद्धारासाठी अखंड लेखणी चालविली.

लोकहितवादींनी आपल्या वयाच्या ऐन पंचविशीत 'शतपत्रे' लिहिली. लोकहितवादींची 'शतपत्रे' इ. स. १८४८ ते १८५० या दोन वर्षात 'प्रभाकर' मधून प्रकाशित झाली. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात आणि महाराष्ट्राच्या मराठी निबंधवाङ्मयात लोकहितवादींच्या 'शतपत्रांना' अनन्य साधारण महत्व आहे. या लेखनाने समाजाला जबरदस्त वैचारिक हादरे दिले.

१९ व्या शतकाच्या पुर्वार्धात भारतीय समाजात अनेक राक्षसी रुढी प्रचलीत होत्या लहान लहान बालकांना मागे सोडून स्त्रीला सती जावे लागत असे. पतीच्या मृतशरीरावर, जिवंत स्त्रिला बसवून चिता पेटवली जात असे व धर्मरक्षक हातात काठ्या घेवून आजुबाजूला उभे असत. शरीराचा दाह झाल्यानंतर एखादी स्त्री चितेबाहेर उडी घेत असे. तिला परत चितेत ढोसण्याचे कार्य तत्कालीन धर्मरक्षक करीत असत. तिची आरोळी ऐकू येवू नये म्हणून मोठी

वादचे वाजवली जात असत. इतक्या निर्घृणपणे स्त्रियांची हत्या होत होती. नरबळी वगैरे राक्षसी प्रथा समाजात रुढ होत्या. या सर्व कालबाह्य रुढींवर लोकहितवादींनी कडाडून हल्ला चढविला.

धर्मविषयक प्रगतदृष्टी त्यांनी मांडली. धर्मवेडेपणावर त्यांनी कडक ताशेरे मारले. परंतु संकुचित बनलेल्या समाजाला हे पटले नाही. इ. स. १८७० मध्ये पुण्यात शंकराचार्यांच्या नेतृत्वाखाली एक अविस्मरणीय वादविवाद झाला. विधवा स्त्रियांनी पुनर्विवाह करणे सशास्त्र आहे की अशास्त्र? हा विषय होता. लोकहितवादी, न्या. रानडे, विष्णुशास्त्री पंडीत यांच्या सुधारणावादी पक्षाने विधवांना पुनर्विवाह करण्याची संमती असलीच पाहिजे ही भूमिका घेतली होती. पण त्यात या पुरोगामी सुधारकांना योग्य प्रतिसाद मिळाला नाही. ही चर्चा वादळी स्वरुपाची ठरली होती. जुन्या शास्त्रवचनांची आज्ञा जुगारुन देण्याचे धैर्य तत्कालीन अनेक सनातनी विद्वानांत नव्हते. हा जुलूम दूर करण्यासाठी जुनाट शास्त्रे निधाराने बाजूला केली पाहिजेत. सारासार बुद्धीच्या कसोटीवर घासून पाहता जुने जर हिणकस ठरले तर ते बुद्धीवादी लोकांनी दूर केले पाहिजे. ही योग्य पण तत्कालीन परिस्थितीत बंडखोर ठरलेली भूमिका लोकहितवादींनी घेतली. त्याकाळी जन्माला आलेली पिढी आधुनिक ज्ञानाचा लाभ झाल्याने लोकशाहीमूलक इंग्रजी विचार व विषमतामूलक वर्ण विचार यातील तफावत कळल्याने ही पिढी मानसिकदृष्टचा बदलून गेली. आपल्या साऱ्या जुन्या श्रद्धा, सांस्कृतिक मूल्ये, धर्मकल्पना यांची फेरतपासणी केली पाहिजे असे या सुशिक्षितांना वाटू लागले. कालबाह्य झालेल्या रुढींचा त्यांनी धिक्कार केला. स्त्री आणि पुरुष समान आहेत हे प्रतिपादन करुन सामाजिक न्यायाच्या व व्यक्तीच्या जन्मसिद्ध स्वातंत्र्याच्या दृष्टीतून स्त्रिजीवन-विषयक समस्यांचा विचार मांडला. परंपरागत चालत आलेल्या शास्त्रपुराणांना न भिता युगपरत्वे शास्त्रही फिरवले पाहिजे असे विचार मांडले.

निरर्थक कर्मकांडाचे व निरर्थक विधिचे स्तोम माजल्यामुळे पुरोहितवर्गाने सामान्य माणसाचे शतकानुशतके शोषण चालविले. धर्म हा त्यांच्या धंद्याचा एक भाग झाला. त्यामुळे लोकहितवादींनी पुरोहित वर्गावर प्रहार केले. शद्बप्रामाण्याला कडवा विरोध केला. नीतीप्रधान धर्माचा पुरस्कार करतांना एकाच घरात हिन्दू धर्मीय पुत्र, इस्लामधर्मी कन्या, खिश्चन धर्मीय पत्नी आणि सर्वसाधारण सत्यधर्मी पिता हे सुखाने कसे नांदतील हे पाहिले व कालपरत्वे धर्मशास्त्रही बदलले पाहिजे हे खडसावून समाजाला सांगून माणूस जागा करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय समाजाने ज्या विविध अंधश्रद्धा व दुष्टरुढी जोपासल्या त्यावर कडाडून टिका केली. परमार्थाभोवतीच पिंगा घालत बसलेल्या धर्मकल्पना निरुपयोगी आहेत असे लोकहितवादींनी स्पष्ट केले. प्रारब्धवादी विचारसरणीला बाजूला सारुन पुरुषार्थप्रवण विचारांचा पुरस्कार त्यांनी केला. धर्म नीतीप्रधान असावा, समाजजीवन आणि धर्म यांची सुव्यवस्थित सांगड घालण्यासाठी धर्माला बुद्धीवादाचा आधार दिला पाहिजे हे त्यांनी स्पष्ट केले.

पाश्चात्य विद्येच्या अध्ययनातून विज्ञाननिष्ठा लोकमनात रुजावी, भौतिक शास्त्रे अभ्यासली जावीत, कालानुरुप निरर्थक जुन्या विद्या अभ्यासण्यात काही अर्थ नाही ही भूमिका त्यांनी मांडली. व्यक्तीच्या मूलभूत प्रतिष्ठा, स्वातंत्र्य आणि बुद्धीवाद या मूल्यांच्या आधारावर समाजाची बांधणी व्हावी, लोक शहाणे व ज्ञाननिष्ठ झाले म्हणज त्यांनी इंग्रजांकडे स्वातंत्र्याची मागणी करावी. हिंदुस्थानच्या दारिद्र्याची कारणे शोधून इंग्रजांनी चालविलेले या देशाचे आर्थिक शोषण थांबवले पाहिजे असा विचार मांडला.

लोकहितवादी हे दूरदृष्टी आणि राष्ट्रवादी व्यक्तीमत्व होते. आर्थिक व औद्योगिक उत्कर्ष व्हावा म्हणून नवनवीन उद्योगधंद्यांची कास धरावी व राष्ट्रीय उन्नती घडवून आणावी ही राष्ट्रवादी जाणीव त्यांनी जोपासली.

'शतपत्रां'ची निर्मिती होऊन आता दिड शतक होत आले तरीही ते विचार आज आपणास अत्यंत आवश्यक आहेत, कारण २१ व्या शतकात पदार्पण करणाऱ्या भारतात अजूनही धर्मभोळेपणा खोलवर रुजला आहे. कित्येक रुढींचे पालन कळत नकळत

आपला भारतीय समाज करीत आहे. अंधश्रद्धेने अजूनही समाजाची मानगूट सोडलेली नाही. कोडग्या भूतासारखं दिर्घकाल समाजाच्या मानेवर बसलेला आळस आणि अज्ञान आता कुठे कमी होत चालले आहे. अशा या भारतीय समाजात त्यांनी जो समाजविचार, राष्ट्रउन्नतीचा विचार मांडला त्याची आजही विसाव्या शतकाच्या शेवटच्या काळातही नितांत गरज आहे असे निश्चितच म्हणावे लागते.

★★★

---

# मराठी संस्कृतीचा उपासक : शाहीर

**संगीता जाधव**
तृतीय वर्ष कला

" जी हृदयाला चटका लावून जाते ती लावणी." लावणी हा शाहिरी वाङमयातील एक काव्यप्रकार. पोवाड्याप्रमाणे लावणीची पुर्वपरंपरा फार मोठी आहे. लावणीचा विकास पेशवाईच्या उत्तरार्धात झाला. शिवकाळापासून पोवाडा व लावणी हे दोन्ही कलाप्रकार मराठी रसिकांपुढे आले आहेत. शाहिरी वाङ्मयाची पहिली डफावर थाप खऱ्या अर्थाने शिवकाळात कडाडली. पोवाडा म्हणजे कीर्तीकाव्य तर लावणी म्हणजे सामुदायीक ठिकाणी मनोरंजनासाठी विविध विषयांवर तालबद्ध, लयबद्ध शब्दांनी साकार केलेली सुबक काव्यरचना होय. सामान्यजनांचे मनोरंजन हा लावणीचा महत्वाचा हेतू आहे. गौळणी, गोंधळ, भारूडे व पदे यांपासून लावणीचा विकास झालेला दिसतो.

शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास करताना ज्या काळात हे शाहिरी वाङ्मय निर्माण झाले, तत्कालीन परिस्थितीचे चित्रण शाहिरांनी आपल्या लावणी व पोवाड्यातून केलेले पहायला मिळते.

### रामजोशी –

'रामजोशी' हे शाहिरी वाङ्मयात मानाचे पान मिळविणारे शाहिर होऊन गेले. रामजोशींचा जन्म इ. स. १७५८ मध्ये झाला. रामजोशी सर्व शाहिरांपेक्षा वडील धारे नसले तरी किर्तीच्या दृष्टीने श्रेष्ठ होऊन गेले. रामजोशींनी लावणीला प्रतिष्ठा मिळवून दिली. शाहिरी वाङ्मयात रामजोशींनी आपले स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे. रामजोशी म्हणजे संतकवी व पंडितकवी यांचा सुंदर समन्वय साधणारा कवी होय.

त्यांनी अनेक प्रकारच्या लावण्या लिहिल्या. प्रतिभा पूर्तीसाठी गणेशदेवतेच्या मंगलमूर्तीची आराधना काव्यात केली. आपल्या प्रतिभासंपन्न वाणीने स्त्री सौंदर्याचे वर्णन लावणीतून पेश केले आहे. ठुमकणाऱ्या चमकणाऱ्या बिजलीप्रमाणे दिसणाऱ्या सुंदरीचे उत्कृष्ट वर्णन करताना–

"सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली
हवेलीत शिरली. मोत्याचा भांग। अरे
गड्या हौस नाही पुरली...."

अशी रचना करतात. वरील लावणी म्हणजे शृंगाररसाचा मधुरोत्कट घट आहे. शृंगार हा तर मानवी स्थायीभाव, त्यामुळे अशा प्रितीभक्तीचे दर्शन रामजोशींनी आपल्या लावणीतून घडविलेले आहे. शृंगाररसाने रसरसलेल्या लावण्या लिहिणाऱ्या रामजोशींनी भक्ती रसात्मक लावण्याही लिहिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे तमाशाच्या फडात रंगलेले

रामजोशी किर्तनरंगातही रंगलेले दिसून येतात.

अशाप्रकारे सुडौल भाषाशैली, उत्कृष्ट अलंकरण, रसपरिपोषातील उत्कटता, वर्णन शैलीतील सहजता व सजीव स्वभाव वर्णने यामुळे रामजोशींच्या लावण्या अतिशय देखण्या झालेल्या आहेत. म्हणून रामजोशींनी–

'कविराय चमकला हीर; लोकजाहीर इतर शाहीर काजवे वांग।'

ही केलेली गर्वोक्ती बऱ्याच अंशी सार्थ ठरते.

## परशराम –

शाहीर परशराम हा एक उल्लेखनीय असा शाहीर होऊन गेला. त्याचा जन्म सन १७५४ साली झाला. परशरामांनी अध्यात्मपर लावण्या रचलेल्या आहेत. या अध्यात्मपरंपरेत परशरामांचे खास वैशिष्टच उमटलेले दिसून येते. यामुळे त्यांचे वेगळेपण उठून दिसते. 'अध्यात्म' हा शाहिरांचा खास विषय नव्हे; पण संतवाङ्मयाचा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे त्यांच्या वाङ्मयावर झालेला हा परिणाम आहे. परशराम यांना मनापासून असलेली भक्तीरसाची गोडी, अध्यात्माची आवड त्यांच्या एका लावणीतील दोन ओळीतून अधिक स्पष्ट होते–

' पोट भराया उभारीला ना तमाशाचा धंदा...
रुची मनाची गायन करुनी आळवावे गोविंदा–
कर्म आमुचे हरीगुण गावे नाम न विकरी परीक्षा !'

हे वर्णन त्यांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारे आहे. परमेश्वर भक्तीचे, अध्यात्माचे त्यांनी ठायी-ठायी दर्शन घडविले आहे.

परशरामाचा विनोद हा त्यांच्या लावण्यांचा महत्वाचा गुण होय. विनोदाबरोबर करुणरसाचाही उठाव करण्यात ते यशस्वी झाले आहेत. विशेषत: 'सती सुलोचना,' 'निपुत्रिका' अशा लावण्यातून हे विशेष दिसून येतात. करुण आणि अद्‌भूत रसाचा उत्कृष्ट उठाव त्यांच्या लावणीत साधलेला आहे.

## होनाजी बाळा –

शाहीर होनाजी बाळा म्हणजे शाहिरांतील एक ललामभूत असे लेणे आहे. पेशवाई काळात होऊन गेलेल्या शाहिरात होनाजी बाळा हा शाहीर मोठ्या नावलौकिकाला पोहोचलेला होता. होनाजीचे घराणे नंद गवळयाचे, त्यामुळे घरचा गवळयाचा धंदा करीत आपल्या आवडीच्या शाहिरीच्या धंद्याकडे ते वळले.

मराठी शाहिरात आपल्या प्रतिभेची दौलत उधळणाऱ्या शाहिरांचे जन्ममरणाचे शक मात्र आपणास निश्चितपणे कळू शकत नाहीत. काळाच्या कुशीत होनाजी बाळा निद्रिस्त झालेले असले तरी दररोज अरुणोदयाबरोबर 'घन:शाम सुंदरा श्रीधरा' या अमरभूपाळीने माराठी रसिकाला त्यांची स्मृती झाल्याशिवाय रहात नाही.

## अमर भूपाळी –

होनाजी बाळाची अमर भूपाळी ही लावणी म्हणजे महाराष्ट्र शारदेचे सौभाग्य चिन्ह असलेला सुंदरसा कुंकुमतिलकच होय. होनाजीची ही 'अमर भूपाळी' मराठी काव्यातील अमोल रत्न आहे. ही भूपाळी ऐकताना आपण जणू मंत्रमुग्ध होतो. होनाजी बाळाची ही लावणी म्हणजे एक दिव्य रसायन आहे. त्यामुळे ही लावणी म्हणजे आनंदाची खाणी आहे.

"घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला।
उठो लौकरी वनमाळी उदयाचळी मित्र आला।"

या 'अमर भूपाळी' बरोबर होनाजी बाळाचे नांव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले आहे. ही भूपाळी म्हणजे भक्तीरसाचा परमोत्कर्षच! कवीमनाच्या होनाजीला पडलेले हे एक शुभकमळरुपी सुरेख स्वप्न होय.

होनाजी बाळाने अनेक प्रकारच्या लावण्या लिहिल्या. त्यांच्या शृंगारपर लावण्याचे दालन वैविध्याने विणलेले आहे. स्त्रिसौंदर्य व स्त्रिमनातील विविध भावछटा या लावण्यात होनाजीने दाखविल्या आहेत. होनाजीची शृंगारपर लावणी रसिकांना मनमोहक वाटते.

'लटपट लटपट तुझं चालणं मोठ्या नखऱ्याचं
बोलणं ग मंजुळ मैनेचं।'

येथील रुपवतीच्या डौलाचे वर्णन रसिक मनाला भुलविणारे आहे. तत्कालीन स्त्रीचे विविधांगी दर्शन आपणास या लावणीत घडते.

विषयवैविध्य, रसवैचित्र्य आणि अलंकरणचातुर्य याचबरोबर नाट्यमयता हा त्यांचा लावण्यांचा एक महत्वाचा विशेष आहे. होनाजीची वर्णनशैली सरळ सपाट नाही त्यामुळे त्याच्या रसोत्कर्षात उत्कटता साधलेली आहे.

## सगनभाऊ –

शाहिरात सगनभाऊचे नाव आवर्जून घ्यावे एवढा दबदबा सगनभाऊने आपल्या लावण्यांनी निर्माण केला आहे. सगनभाऊ हा जातीने मुसलमान असला तरी त्याला महाराष्ट्राबद्दल, मराठी भाषेबद्दल, मराठमोळ्या संस्कृतीबद्दल मराठ्यांच्या देवदेवतांबद्दल कमालीची आपुलकी होती. सगनभाऊ यांचा जन्म इ. स. १७७८ च्या दरम्यान झाला.

उत्तर पेशवाईत विशेषत: दुसऱ्या बाजीरावाच्या काळात सगनभाऊच्या लावाण्या फुलल्या, बहरल्या विकसित झाल्या असे दिसते. दुसऱ्या बाजीरावाबद्दल त्याला फार जिव्हाळा होता असे त्याच्या काही लावण्यांवरुन दिसून येते.

" जन्मा येऊनी नामस्मरण विठ्ठल जागवाल काय?
सगनभाऊचे कवन रावबाजीला ऐकवाल काय? "

या लावणीतील उल्लेखावरुन आपणास कल्पना येते. त्यांच्या लावण्या 'अस्सल मराठी मनाची भावना' व्यक्त करणाऱ्या आहेत. 'चाल तुझी मराठी मोळचाची' या लावणीत सगनभाऊंना प्रातिनिधिक मराठी तरुणीचे चित्र रेखाटले आहे. केवळ सौंदर्याची, शृंगाराचीच लयलूट त्यांच्या लावणीत नाही तर मराठमोळ्या संस्कृतीचेही सुंदर दर्शन सगनभाऊनी घडविले आहे.

सगनभाऊंना मराठी मनाबद्दल, मराठेशाहीबद्दल वाटणारा स्नेह व जिव्हाळा आपल्या लावणी व पोवाड्यातून चित्रत केला आहे. त्यांनी मराठी जीवनाशी, मराठी मनाशी जवळीकतेचे नाते जोडलेले होते. त्यामुळेच त्यांच्या साहित्यातून मराठी भावभावनांचे मोहक चित्रण साकार झाले आहे.

सगनभाऊंची लावणी इष्काची आहे. क्वचित ईश्वरभक्तीची स्मृती जागी ठेवणारी आहे. प्रेमाची प्रचीती देणारी आहे त्यांच्या लावण्यांत शृंगार फार आहे. म्हणूनच प्रा. जोग म्हणतात. "सगनभाऊनी निर्मळ शृंगारच लिहिला."

## प्रभाकर –

प्रभाकर जनार्दन दातार, शाहिरी वाङ्मयात 'प्रभाकर' नावाने प्रसिद्ध आहेत. यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील गंगापूर या ठिकाणी इ. स. १७६९ साली झाला. प्रभाकरांना त्यांच्या प्रतिभेने साथ दिली आणि थोड्याच काळात शाहीर म्हणून ते प्रसिद्धीला आले. दुसऱ्या बाजीरावांच्या कारकीर्दीत तर प्रभाकरांची कीर्ती खऱ्या अर्थाने शंभरभरच नव्हे तर त्याहीपेक्षा अधिक नगरात दुमदुमू लागली. सामाजिक परिस्थिती व्यक्त करणाऱ्या त्यांच्या लावण्या तत्कालीन सामाजिक जीवनावर विविधांगी प्रकाश टाकणाऱ्या अशा आहेत. रावबाजीच्या कारकिर्दीतील विलासी जीवनाचे दर्शन त्यांच्या लावणीतून घडते.

शाहिर प्रभाकर यांनी शृंगारिक लावण्याबरोबर ईश्वरवर्णनपर व पौराणिक आख्यानांवर लावण्या लिहिल्या आहेत. भक्तीरसात्मक हा मंगल कलशच त्यानी रसिकांना भक्तीभावाने अर्पण केला आहे.

"उठ उठ झडकरी हरी गोविंदा मुरारी।
अरुण उदय होऊ पाहे सरली रात्र सारी"

ही लावणी होनाजीबाळांच्या 'अमर भूपाळी' शी साम्य साधणारी आहे. प्रभाकरांचे शृंगारिक लावण्यांचे दालन समृद्ध आहे. इतर शाहिरांच्या मानाने प्रभाकराच्या शृंगारिक लावण्यांची संख्या अधिक आहे. त्यांनी स्त्रिभावनेच्या विविध अवस्था शृंगारिक लावण्यांतून व्यक्त केलेल्या आहेत.

'शृंगारिक लावण्या' हे प्रभाकरांचे खास वैशिष्टय आहे. त्यांच्या लावण्यात स्त्री–पुरुषांच्या शृंगारदर्शनाचाच भाग मोठा आहे. संख्येच्यादृष्टीने त्यांच्या शृंगारिक लावण्या इतर शाहिरांच्या लावण्यांपेक्षा जास्त आहेत. त्यांच्या पोवाडयातून वीर, करुणरसांचे उत्कट दर्शन घडविले आहे तर लावणीतून शृंगाररसाची लयलूट मुक्तहस्ताने केलेली आहे. शाहीर हे तत्कालीन समाजजीवनाचे 'बोलके चितामणी' आहेत. त्यांनी समाजमनातील विविध भावनांचे तांडवनृत्य या वाङ्मयाद्वारे जीवीत केले आहे.

★★★

---

# कॅन्सर


**वैजनाथ कदम**

द्वितीय वर्ष विज्ञान


कॅन्सर (कर्करोग) म्हणजे नेमके काय, तर शरीरात पेशीची होणारी अनियंत्रित व अतिवेगाने वाढ होय. की ज्यामुळे शरीराला हानीकारक असे अर्बुद किंवा गाठ उत्पन्न होते. यालाच कर्करोग असे म्हणतात.

कॅन्सर हा महाभयंकर रोग आहे. कारण कॅन्सर व त्याच्यामुळे उत्पन्न झालेल्या समस्या अजून पूर्णपणे समजलेल्या नाहीत. जगातील सर्व देशात या रोगाबद्दलचे संशोधन चालू आहे. कर्करोगाची कारणे अजून बरीचशी अज्ञात असली तरी त्यांचे सर्वसाधारण दोन प्रकार केले जातात.

## १) अनुवंशीक कारणे–

यामध्ये अनुवंशिकता, वंशभेद, वय, लिंग वगैरे कारणांचा अंतर्भाव होतो. या कारणांमुळेच कर्करोग होतोच असे नाही परंतु तो होण्याची प्रवृत्ती या कारणांवर अवलंबून असावी असे मानण्यात येते. कर्करोग आईबापापासून मुलांना होतो असे नाही. परंतु तो होण्याची प्रवृत्ती मात्र अनुवंशीक असावी असे दिसते. आई व वडील या दोघांनाही कर्करोग असल्यास मुलांना कर्करोग होण्याची शक्यता अधिक असते. काही विशिष्ट मानववंशामध्ये विशिष्ट जातीच्या कर्करोगाचे प्राबल्य दिसते. उदा. जपानी लोकांत जठराचा कर्करोग अधिक प्रमाणात दिसतो. तर त्वचेचा कर्करोग निग्रोमध्ये अधिक दिसतो. कर्करोग हा कोणत्याही वयात होवू शकतो. स्त्रियांमध्ये स्तन व गर्भाशय या ठिकाणी कर्करोगाचे प्रमाण जास्त असते.

## २) प्रेरक कारणे –

कर्करोग विषाणूमुळे होत असावा असे मत अलीकडे शास्त्रज्ञांना मान्य होत असले तरी सर्व कर्करोगात विषाणू सापडत नाहीत. त्यामुळे त्यासंबधी निश्चीत असे विधान करता येत नाही. विषाणू शरीरातील कोशिकांमध्ये घुसून त्या कोशिकांतील जीवनद्रव्य व केंद्रक याचा नाश करतात.

प्रारणजन्य किरण म्हणजे क्ष–किरण, जंतू पार किरण (वर्णपटातील जांभळ्या रंगाच्या पलीकडील अदृश्य किरण) किरणोत्सर्ग (विशिष्ट मूलद्रव्यांपासून बाहेर पडणारे कण वा किरण) इत्यादी किरणांचा प्राण्यांच्या शरीरात वारंवार संबंध आला तर कर्करोग झाल्याची उदाहरणे दिसतात, त्यावरुन अशी प्रारणे हे एक प्रेरक कारण मानले जाते.

काही रासायनिक पदार्थ कॅन्सर निर्माण करणारे

ठरलेले आहेत. डांबर, पेट्रोल व तंबाखू यांचा धूर, धूळ आणि कारखान्यात वापरण्यात येणारे अनेक पदार्थ कर्कजन्य आहेत.

अतिघात (शॉक) एखाद्या अवयवावर वारंवार होत राहिल्यास कर्करोगाची उत्पत्ती झाल्याची उदाहरणे दिसतात. उदा. थंडीपासून संरक्षण म्हणून शरीराजवळ शेगडी बाळगण्याची पद्धत हिमालयातील लोकांत आहे. त्यांच्यामध्ये त्वचेच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक दिसते.

### सुरुवातीची लक्षणे–

१) स्तनात गाठ निर्माण होणे.
२) दीर्घकालीन खोकला, आवाज घोगरा होणे आणि गिळताना त्रास होणे.
३) अकारण वजन घटणे.

### संभाव्य कारणे–

१) तीक्ष्ण दात, कवळी, तंबाखू खाणे (चघळणे) पान खाणे यापासून होणाऱ्या क्षोभामुळे मुख-कर्करोग होण्याची शक्यता असते.
२) प्रदीर्घ धूम्रपानाने (विशेषतः त्यातील तंबाखूमुळे) घसा आणि फुफ्फुसाचा कर्करोग होऊ शकतो.
३) डांबर साधिते (Coal–tar derivation) रंजके (dyes) व उद्योग धंद्यात वापरली जाणारी कर्कजनक रसायने यांमुळेही कर्करोग होऊ शकतो. तसेच हा रोग कोणत्याही वयांत होवू शकतो.
४) आण्विक स्फोट (atomic–Explossion) जंबुलातीत किरणे (Ultraviolet rays) व क्ष–किरणे (x–rays) ह्यामुळे होणाऱ्या किरणीयनाने (irradiation) कर्करोग होऊ शकतो.

### वैद्यकीय तपासणीची गरज–

कर्करोगाचे लवकरात लवकर निदान होण्यासाठी कर्करोगाच्या लक्षणांची शंका येताच वैद्यकीय तपासणी करुन घेणे फार आवश्यक असते. अगदी प्रथमावस्थेत जर कर्करोगाचे निदान होऊ शकले तर पन्नास टक्क्याहून अधिक रुग्णांमध्ये कर्करोगावर परिणामकारक उपचार होणे शक्य असते. अशा रुग्णांवर केमोथेरपी ,रेडिओथेरपी आणि शस्त्रक्रिया पद्धतींनी उपचार करता येतात.

### संशोधन

जगातील सर्व प्रगत देशांत कर्करोगावर (कॅन्सर) संशोधन चालू आहे. या संशोधनामध्ये मुख्यतः कोशिकांची अनियंत्रीत उत्पत्ती का नाहीशी होते ? हे समजून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. शरीराबाहेर कोशिकांचे संवर्धन करुन त्यावर विविध प्रयोग करुन कोशिकांच्या प्रचूर जनना-संबंधी ज्ञान मिळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. इतर प्राण्यांवर प्रयोग करुन कर्करोग उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालू असून त्यामुळे कर्करोगाच्या कारणांवर प्रकाश पडण्याची शक्यता वाटते. विषाणू व त्यांच्यामुळे होणाऱ्या विकृतीसंबंधी संशोधन चालू असून त्यातूनच कर्करोगासंबंधी काही निश्चित ज्ञान मिळवण्याची शक्यता आहे. कोशिकांमधील डी. एन. ए. आणि आर. एन. ए. या न्यूक्लीइक आम्लांचा परस्पर संबंध व विकृती याबद्दलही पुष्कळ संशोधन चालू आहे. अणुसर्गामुळे कॅन्सर होतो हे आता सिद्ध झाले आहे. परंतु त्यातूनही या रोग कारणांचा काही धागा हाती लागेल अशी शास्त्रज्ञांची कल्पना आहे. अशा तऱ्हेने अनेक देशांनी कर्करोगांचे संशोधन चालू केले आहे. भारतात कर्करोगाविषयक संशोधन व चिकित्सा करण्यासाठी टाटा विश्वस्त मंडळाने टाटा मेमोरिअल हॉस्पीटल १९४१ मध्ये मुंबई येथे स्थापन केले. हैद्राबाद, मद्रास, कलकत्ता येथेही कर्करोगाचे निदान व चिकित्सा करणाऱ्या संस्था स्थापन झालेल्या आहेत. १९५२ मध्ये कर्करोग विषयक संशोधन करण्यासाठी मुंबई येथे 'इंडियन कॅन्सर रिचर्स सेंटर' ही संस्था स्थापन झाली. इंडियन रिचर्स सेंटर मार्फत येथील अनेक संशोधनावर आधारलेले निबंध प्रसिद्ध झालेले आहेत. या संशोधनाबरोबरच कर्करोगासंबंधी साधारण जनतेत ज्ञान प्रसार करुन शिक्षण देणे व कर्करोगाचे निदान शक्य तितक्या लवकर करुन त्वरित उपाय करणे यासाठी केंद्रे स्थापन करणे वगैरे गोष्टींवर भर देणे जरुरीचे आहे. तसेच धूम्रपान, तंबाखू इत्यादी गोष्टी शरीरास कॅन्सर निर्माण करण्याच्या दृष्टीने पूरक आहेत असे आता खात्रीने

माहित झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात स्त्रियांमध्ये आणि पुरुषांत याबद्दलची वैज्ञानिक माहिती पुरविणे आवश्यक आहे. सामाजिक संस्थांनी यासाठी प्रयत्न करावयास हवेत.

★★★

# भारतातील दहशतवाद

**ज्योती खाडये**

प्रथम वर्ष वाणिज्य

आज दहशतवादाच्या विळख्यात काश्मीर, पंजाब, आसाम, बिहार, मध्यप्रदेश, तामिळनाडू आणि संपूर्ण भारतच सापडला आहे. काश्मीर अतिरेकी, पंजाबातील खलिस्तानवाद्यानी, आसामधील उल्फानी, बिहार, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेशातील नक्षलवाद्यांनी आणि तामिळनाडूतील एल. टी. टी. ई. इत्यादीनी अहिंसेचा संदेश देणाऱ्या माझ्या मातृभूमीला पोखरून टाकलय.

गौरवशाली इतिहास सांगणारी माझी मातृभूमी आज जातीयता, दहशतवाद यांच्या भोवऱ्यात सापडली आहे. व आपल्या उज्ज्वल इतिहासाला तडा लावून बसली आहे. एवढेच नव्हे तर संपूर्ण भारतात दहशतवाद वाढला आहे. आणि आपला समाज उघड्या डोळ्यांनी हे सर्व पाहात आहे.

आज सूज्ञपणे विचार करता एक गोष्ट लक्षात येते की या दहशतवादाचे मूळ हे आमच्या धर्मांधतेत आहे. परंतु काश्मीरमध्ये फोफावलेल्या दहशतवादाचे स्वरूप वेगळे आहे. काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक असून सध्या काश्मीर सारखा 'निसर्गरम्य' प्रदेश आपल्याकडे असावा या खुळचट भावनेपोटी पाकिस्तानने आज काश्मीरच्या भागातील लोकांच्या भावना भडकवून त्यांना प्रशिक्षण देऊन अतिरेकी, हिंसाचारी कृत्यांनी काश्मीर रक्तबंबाळ करून टाकला आहे. सततच्या हिंसाचारी कृत्यामुळे इथल्या गुलाबाबरोबर मातीलाही रक्ताचा रंग आला आहे. अर्थात काश्मीरी दहशतवाद्यांना पाकिस्तान पाठीशी घालत आहे. हे सर्वस्वी घडत असताना आपले शासन अजुनही गप्प का बसले आहे ? हेच काही कळत नाही.

आजवर दहशतवाद्यांनी आपले कुटील हेतू साध्य करण्यासाठी हिंसाचारी मार्गाने अनेक निरपराध स्थानिक लोकांचे बळी घेतले परंतु केवळ याच मार्गाने हेतू साध्य होणार नाही. म्हणून त्यांनी आपल्या उद्दीष्टांच्या पूर्ततेसाठी परदेशी पर्यटकांचे, उच्च पदस्थ भारतीय अधिकाऱ्यांचे आणि राजकीय व्यक्तींचे अपहरण केले. अपहरण केलेल्या व्यक्तींच्या सुटकेसाठी सरकारने आपल्या मागण्या पूर्ण न केल्यास त्यांची हत्या करण्याचे कुटील कर्म चालू आहे.

३ फेब्रुवारी १९८४ रोजी जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट या काश्मीरी अतिरेकी संघटनेने लंडनच्या भारतीय राजदूताचे सहाय्यक उच्चायुक्त श्री. रविंद्र म्हात्रे यांच अपहरण केलं. ही देशातील अतिरेक्यांनी केलेली पहिली अपहरणाची घटना होती. त्यासाठी फाशीची शिक्षा झालेल्या अतिरेक्यांचा एक खतरनाक नेता मकबुल भट्ट याची सुटका केली जावी अशी त्यांची मागणी होती. परंतु त्यावेळी सरकारने अतिरेक्यांच्या या कृत्याविरुद्ध ताठर धोरण स्विकारून मकबुल भट्ट यास फासावर चढविले आणि त्याचा परिणाम म्हणून अतिरेक्यानी

श्री. रविंद्र म्हात्रे यांची क्रूर हत्या केली आणि एक अपहरणनाट्य पूर्ण झाले. १९८९ ला सरकार बदलल्यावर अतिरेक्यांनी पुन्हा एकदा झेप टाकली ती त्यावेळेचे गृहमंत्री यांची कन्या रुबिया हिचे अतिरेक्यांनी अपहरण केले. सरकारने कसलाही विचार न करता अतिरेक्यांच्या सर्व अटी मान्य करुन रुबियाची सोडवणूक करुन घेतली. तत्कालीन सरकारची ही फार मोठी चूक होती. अतिरेक्यांना जे यश अपेक्षित नव्हते ते सहजासहजी मिळाले आणि मग सुरु झाली एक अपहरण मालिका ! त्यांनी त्यानंतर अपहरणाचा सपाटा सुरू केला. काश्मीर विद्यालयाचे उपकुलगुरु यांचे सचिव अब्दुलगाणी तसेच दोरायस्वामी यांचे अपहरण या ताज्या घटना आहेत.

या सर्व घटनांचा आढावा घेता काश्मीर जनता या कृत्यात होरपळून निघाली आहे आणि या सर्वांचा परिणाम म्हणून १९९१ च्या जून अखेरीस जवळजवळ ७१,००० काश्मिरी कुटुंबानी स्थलांतर केले आहे. अर्थात याला आपल्या सरकारची डळमळीत व वेळकाढू धोरणही जबाबदार आहेत. काश्मीरमध्ये लागू केलेले ३७० कलम जाचक व मतभेद करणारे आहे. अशा प्रकारचे कलम रद्द करण्याची आवश्यकता असूनही व त्याला मोठ्या प्रमाणावर विरोध होत असताना ते तसे का केले गेले नाही ? हेच काही कळत नाही.

थोडक्यात आपल्या सरकारने काश्मीरबद्दल वेळीच ठोस पावले उचलली नाहीत तर काश्मीर भारताला गमवावे लागेल.

पंजाबमधील दहशतवादाचे स्वरुप काश्मीरपेक्षा भिन्न आहे. त्यांची उद्दीष्टयेही वेगळी आहेत. सार्वजनिक क्षेत्रात स्वतःचा फायदा, स्वार्थ पहाण्यासाठी धर्माचा, धार्मिक भावनांचा फायदा उठविला जातो. त्यातून जातीय धार्मिक भांडणे निर्माण होतात व दहशतवादाला चालना मिळते. त्यातूनच माझी भूमी, माझा पंथ यासाठी वेगळी राज्यघटना हवी असा आशावाद निर्माण होऊ लागतो. पंजाबच्या दहशतवादासारखे दहशतवादी कारवायांचे धगधगते कुंड निर्माण झालेत.

त्याने कित्येक निरागस बालकांचे, निष्पाप नागरीकांचे, मजूरांचे बळी घेतले जात आहेत. तरीही त्यांची समाप्ती होत नाही आणि या सर्व गोष्टीसाठी आधार घेतला जात आहे तो लोकांच्या धार्मिक भावनांचा, धार्मिक स्थळाचा ! किती लाजीरवाणी आहे ही गोष्ट !

इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांनी पंजाबमधील सुवर्णमंदिरात जो ' ऑपरेशन ब्लयू स्टार ' नावाने मुकाबला दिला तो संपूर्ण देशहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा निर्णय होता. कारण ते मंदिर अतिरेक्यांचे शस्त्राचे कोठार होवून बसले होते. यातूनच पुढे इंदिरा गांधींचा खून झाला. राजीव गांधी पंतप्रधान झाल्यावर त्यांनी पंजाबमधील प्रमुख नेते लोंगोवाल यांच्याकडून आम्ही स्वतंत्र पंजाब किंवा खलिस्तानची मागणी करणार नाही. अशा आशयाचा करार करुन घेतला. शेवटी अतिरेक्यांनी त्यानाही आपले भक्ष्य बनविले.

या सर्व पार्श्वभूमीवर आज पंजाब हा भाग संपूर्ण अशांत म्हणून जाहीर करुन तेथे लष्कराची तैनात केली आहे व परिस्थिती निवळताच तेथे निवडणूका घेतल्या जातील असेही सरकारने जाहीर केले आहे. असे जरी असले तरी पंजाबमधील अतिरेकी कारवायांना आज शह बसणार नाही. त्यासाठी सरकारला धोरणांचा आदेशांचा उल्लेख याचसाठी करावा लागतो की पंजाबमधील अतिरेक्याना पडद्याआडून पाकिस्तान मदत करत आहे. याचे किती तरी अस्सल पुरावे आपल्याकडे आहेत आणि हे सर्व जर थांबवण्याचे असेल तर सरकारकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर आवाज गेला पाहिजे !

युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम म्हणजे 'उल्फा' ही संघटना आसाममधील फार मोठी डोके-दुखी ठरली आहे. आसामात उल्फाच्या वाढत्या कारवायांना आळा घालण्यासाठी सरकारने तेथे २७ नोव्हेंबर ९१ रोजी राष्ट्रपती राजवट जारी केली परंतु उल्फांनी आपला मोर्चा अपहरणाकडे वळविला आहे. १ जुलै रोजी त्यांनी नैसर्गिक वायू आयोग आणि सरकारी अधिकारी मिळून १६ जणांचे अपहरण केले. एवढेच नव्हे तर तेथील

सध्याच्या मुख्यमंत्र्यांचा भाऊ व दोन कुटुंबियांची उल्फाने क्रूर हत्या केल्यानंतरही अटकेत असलेल्या सर्व (४०) उल्फा अतिरेक्यांना बिनशर्त सोडून दिले. असा जुगार का खेळला असावा ? लोकांची ! की उल्फाची सहानुभूती मिळविण्यासाठी ? आणि म्हणूनच की काय त्यांनी रुमानियाचे भारतातील राजदूत 'राडू' यांचे अपहरण केले. अर्थात अतिरेक्यांनी त्यांची तब्बल ४० दिवसांनी का होईना बिनशर्त सुटका केली. तीसुद्धा भारतातील सरकारच्या विनंतीला मान देऊन नव्हे तर सौ. राडू यांच्या विनंतीला मान देऊन. इथे आपल्या सरकारची प्रतीमा निश्चितच उघडी पडली.

उल्फाच्या वाढत्या कारवायांना आपल्या सरकारचे दुहेरी धोरण जबाबदार आहे लष्करी कारवाईमुळे बंडखोर नाक घासत वाटाघाटीला येतील अशी समजूत सरकारची आहे. आणि म्हणूनच गृहमंत्री असे निवेदन देऊन गेले आहेत की 'आसाममध्ये लष्करी कारवाई पूर्ण झाल्याखेरीज कोणत्याही स्तरावर उल्फाशी वाटाघाटी घडवून आणता येणार नाहीत.'

इकडे तामिळनाडूमध्ये लिबरेशन टायगर ऑफ तामिळ इलम (L. T. T. E.) चे उग्रवादी गळ्यात सायनाईडच्या कॅप्सूल्स बांधून अतिरेकी कारवाया करीत आहेत. राजीव गांधी यांची केलेली निर्घृण हत्या
ही ह्या कारवाईचे ज्वलंत उदाहरण आहे.

सद्या महाराष्ट्रातही नक्षलवाद्यांनी थैमान घातले आहे. परंतु त्याची व्याप्ती मर्यादित आहे तोपर्यंतच यावर आळा घालणे गरजेचे आहे.

या सर्व गोष्टींचे गांभीर्य लक्षात घेता आपण सर्वांनी राष्ट्रीय एकात्मता मजबूत करुन समाजात लोकजागृती करुन मानवधर्माव्यतीरिक्त कोणताही धर्म श्रेष्ठ नाही. अशी उदात्ततेची भावना सर्वसामान्य लोकांच्या मनात निर्माण केली तरच दहशतवादाच्या भस्मासुरास आपण रोखू शकू. त्याची अवतार समाप्ती करु शकू !

***







# कविता

## कृपाळू

देवाजीने करुणा केली
शेते पिकूनी पिवळी झाली
देवाजीचे नाव घेता
बरकत येते बहुतची हाता.

कापा कापा झटूनी सारे
कंबर बांधुनी तयार व्हारे
खसा खसा मग विळा चालवा
चूड कापुनी घाला आडवा
चुडावरती चूड ठेऊनी
कडपे बांधू खसा खसोनी
उचलूनी डोकीवरती घेऊ
चला खळ्यावर झपझप जाऊ.

झोडा भारे खळे भरेल
भाताची मग रास पडेल
घ्या घ्या आता हाती सुपाला
वारा वाहे वारवण्याला
पळींद कचरा उडून जाई
निवळ खाली भातच राही
मोजून मग कणग्यात साठवा
देवाजीचे उपकार आठवा.

**कल्पना पळसुले**
तृतीय वर्ष कला

## अनाम पक्षी

निष्पर्ण फांद्या पहुडल्या दोन
आला अनाम पक्षी;
वळवित लटकी मान
इवलीशी चोच लहान
धरी तोरा फार महान,
मोरपिशी रंगाची उधळण
कंठावरी गुलाबी शान;
झाक पिवळी छान
उदावरी पांढुरकी तान
करी रंगछटा बेभान

चिक्‌चिक् करीत टुकुटुकू पाहत
गिर्‌कन फिरत तुरुतुरू चालत

इवलाले ते पंख चिमुकले.
गमतीने ते हळूच फुलले

तरारुन उलले
झेपेतच उडाले

शोधती गर्द आमराई
पाहती अपुली जीवनमाई
चहुकडे गात मधूर गान
चारी दिशा करीत कंपमान.

**मृणाल काळे**
प्रथम वर्ष कला

# गुलाब पुष्प

जिवे जपुनी लावीले मी रोपटे
एक सुंदर गुलाबाचे;
बालपणी गच्च पर्णी
शृंगाराने नटलेले
हिरवी शाल ल्यालेले......
दिवस जाती कौतुकाते
बनले झाड रोपाचे
नाजुक काटयासह
तारुण्याने बहरलेले
साऱ्यानाच हवेहवेसे
गुलाब पुष्पाचे......
पण—
फिरले सारे विश्व
कोमेजून गेले पुष्प
झाले झाडच शुष्क
कारण ..
तिथे उभारले एक
वारुळ उन्मत क्रमांचे.

**ज्योती घाडी**
तृतीय वर्ष वाणिज्य

# मध्यान्ही नंतर

धुंदीची रात्र जेव्हा नभ उतरुन जाते
अन् सूर्यप्रकाश जाणिवांची पालखी घेऊन येतो
मनप्राचीच्या दारातून माझ्या; कळत नकळत
घडलेल्या चुकांची पश्चात्तापाची आग
मध्यान्ही मनाला भिडते.
उरलेला संचित दिवस
मनाची धार बोथट होते
पुन्हा त्याच मोहासाठी,
अन् जाणीव घसरू लागते
घसरणाऱ्या सूर्यप्रकाशाबरोबर
पुन्हा होणाऱ्या कळत नकळत चुकांसाठी.

**हेमंत कुळकर्णी**
बारावी विज्ञान

# कैफियत

कैफियत लिहीताना माझ्या डोळयात येतात आसू
कारण माझ्या आयुष्यातील हरवले आहे हसू.
कैफियत अशी की माझे कुणीही नसे
सर्वस्व सारे लुटले गेले आता काय उरे?
हाक नाही, साथ नाही, विनाश फक्त दिसे
जगावे कुणासाठी हाच संभ्रम बसे.
जिवंतपणी मरणयातना भोगत मी असे
स्त्रिच्या कपाळी देवाने मारिले असे ठसे,
कैफियत ऐकताना आसू कुणाचे दिसतील का?
सांगा कुणीतरी दुःख माझे पुसेल का ?

**स्वाती देवघर**
अकरावी विज्ञान

# कधी पाहतो...

कधी पाहतो त्या निळसर धुक्यापलीकडे
सावली तुझी वेडावते, बघून मजकडे.

होतेचि अंतर
परि निरंतर
छेडिली ती तार
न विरले स्वर.

निसर्ग बघून हसला, खेळ हे माझे वेडे
सावली तुझी वेडावते, बघून मजकडे.

स्वप्न होते उरी
उंच ती भरारी
करी यत्न तरी
पर गेले जरी

कटू हास्य पसरे, मजभोवती चहूकडे
सावली तुझी वेडावते, बघून मजकडे.

झाडे ही अबोल
निस्तब्ध हे जल
कधी तो येईल
पवन चंचल

टक लावूनी बसे, नित्य कुणाच्या वाटेकडे
सावली तुझी वेडावते, बघून मजकडे.

**समीर जाधव**
प्रथम वर्ष विज्ञान





# पुन्हा तू यावास !

युगांची तटबंदी आणि कोंडी फोडीत
आलास नव्या वाटेने आणि
वेशीबाहेरच्या क्षितीज रेषेवर
सूर्यफुल फुलले,
तेव्हा पाण्याचा प्रश्न पेटू लागला
जगण्याची अस्मिता आकाश व्यापी झाली.
त्याचा थेंब–थेंब, कण–कण तू चेतविलास
तुझ्या घनगर्भ येण्याने,
गावकुसाच्या ओसाडीत नवे अंकुर
थरारुन, तरारुन आले.
लक्तरातलं ठिगळी जिणं; प्रेषिता...!
तुझ्या आकाश वाटेकडे डोळे लावून तेव्हा होते
आणि आताही यावास या शताब्दी वर्षात
क्रांतीप्रवण शस्त्रास्त्राने सज्ज होवून
आमच्या काळजाच्या पायघड्या अंथरल्याहेत रे
तुझ्या पाऊल वाटेवर.
वाट पहाताहेत गवई बंधूचे डोळे, विवस्त्र मातेची धिंड
बस्ती वस्तीत छपरासहीत पेटलेली मुकी माणसे
सामाजिक बहिष्काराचे कारस्थानी सापळे
राजकारण्यांचे तुकडे फेकणे;
बाबा अद्याप सावणे देवळाजवळ मरून पडतो आहे;
पाण्याचा प्रश्नही अजून तसाच पेटतो आहे!
अजून तसाच पेटतो आहे ..!
म्हणून बाबा ! – तू पुन्हा यावास !

**अजित पुरळकर**
द्वितीय वर्ष कला

# दुर्भागी जीवन

तू चालत होतास,
तेव्हा तुझी पावले
उजेडाकडे होती.
सवर्णीयांच्या छळवादात
सुद्धा तुझी नजर
भविष्याकडे होती.
उच्चारात जरब होती
कर्तृत्वाची चमक होती.
बंडखोरांच्या शाब्दिक
माराने मनावर प्रचंड
आघात होत होता.
पण, तरीही तू
प्रतिज्ञा केली होतीस;
मुक्या समाजाला वाचा फोडण्याची......
पण अजूनही,
आयुष्याच्या खडतर चाकोरीत
आमचं दुर्भागी जीवन जगतोय
भाग्योदय गाठण्यासाठी !

**सुनीता जाधव**
द्वितीय वर्ष कला





# भरकटलेली कविता

रंग हे नभाचे ओळखू न येती।
त्या विराट रंगात माझे
अवशेष ते
मिसळून जाती. ।।धृ।।

बाचल्या चारी दिशा
शोधिले ब्रह्मांड सारे
सापडेच ना ती निशा
शोध होती व्यर्थ सारे.

आर्तता माझ्या मनाची
स्वप्न ते उधळून टाकी
त्या विशाल रंगात माझे
अवशेष ते
मिसळून जाती ।।१।।

एकटी फिरलेच स्वप्नी
साद आली कुठून कानी
धाऊनी गेले जुईशी
शुभ्र तो चंदा अकाशी

रम्य त्या दृष्यात सारे
रंग ते मिसळून जाती
रंग हे नभाचे,
आज माझे मित्र होती. ।।२।।

**विद्यागौरी ओगले**
बारावी कला

## दुःख

हे जीवन आहे माझें
अधांतरी नाव;
कुठे शोधु मी किनारा
नसे स्थिर एक गाव.
भरकटले आयुष्य सारे
थरथरत्या तरंगावाणी;
ओरबाडले सुखी तारे
दुःख भरल्या वेदनांनी.
केंव्हा येणार न कळे मजला
लाट जीवघेणी;
तेंव्हा तरी जवळ असतील का ?
हव्याहव्याशा आठवणी !

**ज्योती घाडी**
तृतीय वर्ष वाणिज्य

## पुण्य

असं म्हणतात की
पुण्य केव्हातरी फळाला येतं
पण पुण्य कसं असतं
हेच समजत नाही.
पाप व पुण्य यांच्यातील रेषाच
जिथे स्पष्ट होत नाहीत.
कारण—
सत्कार्य करणाऱ्यालाच येथे
होत आहे देहशासन;
आणि दुष्कृत्य करणाऱ्याला
सौख्य मिळत आहे,
मग पाप आणि पुण्य
यांची तुलनाच कशी करणार ?

**दिलीप मेस्त्री**
अकरावी विज्ञान

## मनःस्ताप

मनोविकारांचा तरुण–तरुणींना,
होतो कॅन्सर
भावी आयुष्याच्या दिशा विसरतात
ते त्या सीमेवर.
शिक्षणाच्या वाटेवर पुस्तकातील;
किडे व्हायला नाकारतात
गर्द, गांजा, चरस व अफू यांना,
ते आदरणीय मानतात.
सडकेने जाण्यास विसरुन,
ते आडवाट पत्करतात
पण आडवाटाही त्यांना
व्यसनाने गुरफटतात.
आयुष्याच्या शिदोरीतील अन्न,
पचविण्याची ताकद नसते,
पूर्वायुष्याच्या आठवणीने मन,
खिन्न करुन सोडते.
आशेच्या किरणांचा सुर्य,
लांबवर गेलेला असतो !
तिकडे दृष्टीक्षेप टाकण्याचा,
काळ उरलेला नसतो;
तरुण तरुणींचा आशावाद,
संपलेला असतो !
मनःस्ताप करण्यात
काहीच अर्थ नसतो !

**आनंद कदम**
प्रथम वर्ष कला

## साग

वाढलो तव संगती
नव्हती जाण विरहाची
लाख मिळती तुजसम
उगी भांडलो तुझ्याशी ॥१॥
भोवली संगत मज
विदीर्ण होई क्षण न् क्षण
सौंदर्या पळवी रावण
होई देह पत्थरासम
वसंता, धाव सख्या झडकरी
पाहे वाट तुझी मी चातकापरी ॥२॥

**भाग्यवती राजम**
प्रथम वर्ष कला

## अंत माणुसकीचा

जिकडे तिकडे रक्त सांडले
माणुसकीला बळी दिले
हे रक्ताचे पाट वाहती
धरणीवरती चहुकडे,
माणूस आणि राक्षस यातील
फरक कुणी का सांगू शके ?
जो तो म्हणतो असुरा शिगे
मजला त्याची उणिव असे,
पहा पहा हो अंतःकरणी
माणुसकीचा अंश नसे
झाले आता राक्षस सारे
यात नसे माणूस कुठे !

**पुष्पलता इळकर**
बारावी कला

## तू अशीच यावीस....

तू अशीच यावीस की,
आकाशातील तारका लाजून जाव्यात
आणि, धडाधड खाली झेपाव्यात.
तू अशीच यावीस की,
उन्मादक वातावरणात सुगंधाचे थैमान असावे
आणि, वाऱ्याच्या झुळकेसरशी आसमंतात पसरावे.
तू अशीच यावीस की,
अमावास्येची रात्र पौणिमा भासावी
आणि चंद्रफुले तुझ्यावर बरसावीत.
तू अशीच यावीस की,
वनराई जोमाने फुलावी
आणि, जशी काय श्रावणाची किमया व्हावी.
तू अशीच यावीस की,
जसा दुःखाच्या अंती आनंद सापडावा
आणि, तुझा माझा सुखद मिलाफ व्हावा !

**आनंद कदम**
प्रथम वर्ष कला

# नवयुग

सुटले वारे अराजकाचे
तोड मानवा पाश जगाच्या नाशाचे !

नुपुर वाजती अन्यायाचे
कभिन्न काळे मेघ दाटले
सुरु जाहले तांडव भीषण
गळे घोटण्या मानवतेचे
युग अवतरले आता तमाचे
तुडवी मानवी किडे मनाचे
सुटले वारे अराजकाचे !

वृक्षतोड ही चाले भीषण
दुष्काळाचे भयाण रिंगण
फिरली चक्रे दारिद्र्याची
मानवतेच्या आक्रोशाची
प्रभुत्व आले संपत्तीसी
गळे कापले दीन–दुबळ्यांचे
सुटले वारे अराजकाचे !

घोंघावे हुंड्याचा वारा
स्त्री शीलावर फेकी भाला
डाव टाकिते फासे मोहक
पहा दाविते कितीक विभ्रम
आक्रंदन हे केविलवाणे
हलबल दुबळ्या त्या नारींचे
सुटले वारे अराजकाचे !

विज्ञानाचे पिशाच्च भीषण
जगी चालले त्याचे नर्तन
यंत्रयुगाचा मंत्रही जपता
बंदीवान तो मानव झाला
काळ काम वेगाचे बंधन
यात गुरफटे जीवन अमुचे
सुटले वारे अराजकाचे !



सुरुंग लागे मानवतेला
बंधुत्वासी तडाही गेला
नव्या युगाच्या नव्या मनुपरी
बंधुत्वाच्या बरसू दे सरी
शस्त्र तळपुदे मानवतेचे
तत्व जाण हे तू सत्याचे
सुटले वारे अराजकाचे,
तोड मानवा पाश जगाच्या नाशाचे !

**मृणाल काळे**
प्रथम वर्ष कला

# व्यथा

अधीर मन हे झाले
तुझ्याच चाहुलीने
का मजसी कळेना
हृदय हेलावले हे,

अधिर भावनांनी
नेत्रात केली दाटी
का मजसी कळेना
विलंब आता करसी,

व्याकुळता मनाची
वर्णावी मी कैसी
का मजसी कळेना
उत्सुकता ताणवीसी

चाहूल नष्ट होते
शोधू तुला कुठे मी
का मजसी कळेना
केलेस आभास खोटे !

**पुष्पलता इळकर**
बारावी कला

## सागर

अथांग सागर पसरुनी राहे शांतपणा बापुडा
दूरुनी भासे अविचल मनोहर निळसर क्षितिजकडा
दूरुनी अविचल जवळून चंचल
फेसाळत हा अतिशय सुंदर
भासे हृदयनयनास मनोहर
खवळता बेफाम होई, सद्‌गुणी हा रांगडा ॥१॥
वरुनी भासे सुस्त अजगर
अविचलता ही टिकते पळभर
वादळ येता होई भयंकर
मग त्या रागास राहीना, माग ना पुढा ॥२॥
इतर ऋतुंना शांत राहतो
वर्षाऋतूने अती आनंदतो
हर्षभराने उड्या मारतो
आनंदे मस्त होई जो, वाटे शांत बापुडा
अथांग सागर पसरुनी राहे शांतपणा बापुडा ॥३॥

**निळकंठ मराठे**
बारावी वाणिज्य

## जीवन

जीवन म्हणजे केवळ मोती
चमचमणारे झगमगणारे,
कुणा वाटते जीवन म्हणजे
अपेक्षा भंगाचे रडगाणे.
जीवन म्हणजे केवळ फुले
सुगंधीत, सुवासिक-तृप्त होतील मने
अनेकांना वाटते जीवन म्हणजे
आशा आकांक्षांचे रडगाणे.
मला वाटते जीवन म्हणजे केवळ संगीत
सातसुरांनी नटलेले
सूर छेडले जातात तेव्हा
उमटते समृद्धीचे गाणे
हेच आहे यथार्थ जीणे.

**सुमन वरवडेकर**
अकरावी विज्ञान

## मीलन

अंथरलेली उन्हे तृणावर
हिरव्या झुळुकांची अंगाई
कडेकपारी फुटती लाह्या
चाहूल घेत राई ॥१॥
बींब रेशमी आभाळावर
ओठावर अन् हसते जाई
श्वासामधुनी श्वास मिसळता
गर्द जाहली निळी निळाई ॥२॥
घोस टेकता करवंदीचे
हसले अवखळ पाणी खळखळ
अशीच हवा अन् अशी हवी तू
आनंदाला आली भोवळ ॥३॥

**मिलींद करंगुटकर**
बारावी वाणिज्य,

# लोकहितवादी स्मृती शताब्दी

**(जन्म मार्च १८२३, मृत्यु ऑक्टो. १८९२)**

आज दोन वर्षे लोकांस त्यांची स्थिति, रीती कशी आहे ती अगदी भीड न धरिता उघड करुन सुचविली. (शतपत्रे १८४८ ते १८५०) त्यात एखादे अक्षर अधिकउणें, शुद्ध अशुद्ध, कोणास वाटलें तर त्यांनी क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे की, जो कोणी या पत्रांचे अवलोकन करील आणि विचार करुन पाहील, त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असे वाटेल.

